

# माझी कहाणी

महर्षी कर्वे यांच्या संस्थेतील
कार्यकर्तीचे आत्मकथन

पार्वतीबाई आठवले

SNDT W.U. Library, Churchgate
M920.7(54) 171257
Ath

M920.7(54)
Ath
171257

THE LIBRARY

SNDT
WOMEN'S UNIVERSITY
MUMBAI

राजहंस प्रकाशन प्रा. लि.

SNDT WOMEN'S UNIVERSITY
KNOWLEDGE RESOURCE CENTRE

6 JUN 2017

15/4/2013
XVI, 100 P
₹ 100/-

# माझी कहाणी

पार्वतीबाई आठवले

SNDT W.U. Library, Churchgate
M920.7(54) 171257
Ath

M 920.7(54)/Ath

Add
171257

राजहंस प्रकाशन

या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुन:प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी मूळ संस्था आणि प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

माझी कहाणी
पार्वतीबाई आठवले

संपादक : विनया खडपेकर

प्रकाशक
दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन प्रा. लि.
१०२५, सदाशिव पेठ
पुणे - ४११ ०३०
फोन - (०२०) २४४७३४५९
फॅक्स : २४४३३७१९
E-mail : rajhansprakashan1@gmail.com
Website : www.rajhansprakashan.com

मुद्रक
रोहन एंटरप्रायझेस
१६/२, 'स्वोजस'
सहवास सोसायटी
कर्वेनगर
पुणे - ४११ ०५२

Mazee Kahanee
Parvatibai Athavle

अक्षरजुळणी
मानस एंटरप्रायझेस
अंकिता अपार्टमेंट्स, विठ्ठलवाडी,
हिंगणे, पुणे ४०० ०५१
फोन : ९७६५६३२१२४

मुखपृष्ठ : लीना सौमित्र

मुद्रितशोधन : ज्योत्स्ना बोर्डे

आवृत्ती पहिली : जानेवारी २०१३

ISBN 978-81-7434-601-8

**किंमत : ₹ १००/-**

*या पुस्तकाच्या पुन:प्रकाशनासाठी 'महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थे'ने अनुमती दिल्याबद्दल त्यांचे आभार*

*स्त्रियांच्या व विशेषत: विधवांच्या*
*उन्नतीसाठी खटपट करणाऱ्या*
*सर्व बंधु-भगिनींस*
*ही 'माझी कहाणी'*
*अत्यंत प्रेमाने अर्पण केली आहे.*

# ‘राजहंस’च्या दृष्टिकोनातून

पार्वतीबाई आठवले यांनी १९२८ मध्ये लिहिलेले ‘माझी कहाणी’ हे आत्मकथन पुनर्मुद्रित करून आमच्या वाचकांसाठी आम्ही आवर्जून सादर करत आहोत. ‘पॉप्युलर बुक डेपो’, पुणे या संस्थेचे संचालक माधव गाडगीळ यांनी हे पुस्तक आम्हांला सुचवले. हे सादर करताना सामाजिक जबाबदारी अंशत: सांभाळण्याची भावना आमच्या मनात आहे. जुन्या साहित्याच्या पुनर्मुद्रणाचा विचार करताना या पुस्तकाने आमचे लक्ष अनेक कारणांनी वेधून घेतले.

अवघ्या एक्याण्णव पानांचे हे आत्मकथन ‘बिंदूत सिंधू’ म्हणावे असे आहे. यात *कोकणच्या खेड्यातील निरक्षर मुलगी ते भारतभर किंबहुना जगभर हिंडणारी समाज-कार्यकर्ती* हा पार्वतीबाईंचा व्यक्तिगत जीवनप्रवास तर कळतोच, पण त्याखेरीज यातून तत्कालीन महाराष्ट्रातील आणि काही प्रमाणात महाराष्ट्राबाहेरील विधवांची स्थितीही कळते. आज ज्याला बृहन्महाराष्ट्र म्हटले जाते, त्या इंदूर, देवास, बनारस वगैरे ठिकाणच्या महाराष्ट्रीय माणसांच्या जीवनाची झलक या पुस्तकात दिसते. १९१८ ते १९२० या काळातील अमेरिकेमधील सॅनफ्रॅन्सिस्को, वॉशिंग्टन, न्यूयॉर्क या शहरांच्या पार्श्वभूमीवर, तेथे वावरणाऱ्या महाराष्ट्रीय माणसांचेही जीवन समजते. अमेरिकन जीवनाचा घटक झालेली ज्यू, आयरिश कुटुंबे दिसतात. स्त्रियांना आधार देणाऱ्या ‘यंग वूमन ख्रिश्चन असोसिएशन’, सेवानिवृत्त ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे निवासस्थान असलेले ‘होम ऑफ पीस’ या संस्थांचे ओझरते दर्शनही होऊन जाते.

या पुस्तकाचे आणखी एक महत्त्व आहे. पार्वतीबाईंच्या आसपासच्या काळातल्या, आजच्या महाराष्ट्राला परिचित असलेल्या स्त्रिया म्हणजे – सुप्रसिद्ध विदुषी पंडिता रमाबाई, डॉक्टर झालेल्या आनंदी गोपाळ जोशी, समाजकार्यकर्त्या रमाबाई रानडे, लेखिका (कथा-कादंबरीकार) काशीबाई कानिटकर, ‘स्मृतिचित्रे’ लिहिणाऱ्या लक्ष्मीबाई टिळक! काळाच्या ओघात या स्त्रियांची नावे टिकून राहिली, याचे कारण त्यांचे

स्वयंसिद्ध कर्तृत्व हे तर आहेच, पण त्याबरोबरच त्यांनी स्वत:च्या आठवणी लिहून ठेवल्या, त्यांचा पत्रव्यवहारही बराच होता, हेही आहे. त्यातून पुढील काळातील अभ्यासकांनी त्यांची चरित्रे लिहिली, आत्मचरित्रे प्रकाशझोतात आणली. ललित लेखकांनी त्यांच्यावर कथा-कादंबऱ्या-नाटके रचली. आजच्या जमान्यात त्यावर दूरचित्रवाणीवरून मालिका प्रक्षेपित होत आहेत. याच काळात इतरही काही कर्तृत्ववान स्त्रिया महाराष्ट्रात होऊन गेल्या. कोणी डॉक्टर झाल्या होत्या. क्वचित एखादी संपादक होती. जुन्या नियतकालिकांत कुठेतरी त्यांचा एखादा लेख किंवा त्यांच्याविषयी चार ओळी छापलेल्या दिसून येतात. त्यातून केवळ अभ्यासक श्रेणीतल्या लोकांना त्यांचे अस्तित्व जाणवते एवढेच. परंतु त्यांनी स्वत: काही लिहून ठेवले नाही किंवा त्यांच्याविषयी कोणी काही लिहिले नाही. म्हणून त्या काळाच्या उदरात लोप पावल्या. ते अपरिहार्यच होते. 'आर्यभगिनी' (१८८६ ते १८८९) मासिकाच्या संपादिका आनंदीबाई लाड, माणिकबाई लाड, 'सीमंतिनी' (शके १८१७) मासिकाच्या संपादिका कृष्णाबाई माळवदकर ही अशी नावे म्हणता येतील. स्त्री-सुधारणेच्या वाटचालीत त्यांचेही योगदान होतेच, पण त्यांचे कर्तृत्व अज्ञात राहिले; अशी खंत व्यक्त करण्यापलीकडे आज काहीही करता येत नाही. पार्वतीबाई आठवले यांच्या बाबतीत असे नाही. त्यांनी आत्मचरित्र लिहून ठेवले. त्यातील अनुभवविश्व चाकोरीबाहेरचे आहे, कसदार आहे. काळाच्या दृष्टीने पाहिले, तर रमाबाई रानडे यांच्या १९१० मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या पहिल्या स्त्री-आत्मचरित्रानंतर, आत्मचरित्राचे पुस्तक प्रकाशित होण्यात कालानुक्रमाप्रमाणे पार्वतीबाई दुसऱ्या आहेत. आश्चर्य याचे वाटते की, असे असूनही त्यांचे आत्मचरित्र म्हणण्यासारखे प्रकाशझोतात आले नाही.

याची काही कारणे संभवतात. त्या काळाचा विचार करताना दिसते की, पार्वतीबाईंपेक्षा ९ वर्षांनी मोठ्या असलेल्या रमाबाई रानडे या त्यांच्या समकालीनच म्हटल्या पाहिजेत. न्यायमूर्ती रानडे यांच्या पत्नी असल्यामुळे रमाबाईंचा आर्थिक स्तर खूपच वरचा. त्यांच्या घरी येणाऱ्या-जाणाऱ्या व्यक्तीही वरच्या स्तरातल्या. त्यांच्या अभ्यासाला, समाजकार्याला पतीचा नित्य पाठिंबा. स्वत: रमाबाई सौजन्यमूर्ती. त्यामुळे रमाबाईंचा समाजात दबदबा मोठा. त्यांच्या आत्मचरित्राच्या केंद्रस्थानी न्यायमूर्तीच. न्यायमूर्तींच्या पूर्वजांची माहिती सांगण्यापासून सुरू झालेले त्यांचे आत्मकथन १९०१ मधल्या पतिनिधनापाशी थांबून जाते. पुढे रमाबाई कृतिशील समाजकार्यकर्त्या होत्या, तरी त्याबद्दल त्यांनी काहीही लिहिले नाही. कोणत्याही स्थळीकाळी वलयांकित व्यक्तीच्या गृहजीवनाबद्दल जनतेला कुतूहल असते. त्यामुळे रमाबाईंच्या आत्मचरित्राचे साहजिकच स्वागत झाले.

याउलट पार्वतीबाईंजवळ काय होते? रमाबाई शहरातील मूठभर अभिजनातल्या. पार्वतीबाई खेड्यांपाड्यांत पसरलेल्या रूढिग्रस्त सर्वसामान्य समाजातल्या एक.

त्यांच्या माहेरी-सासरी कोकणातले दारिद्र्य. स्त्रीची निरक्षरता. पायाने अधू असलेला कस्टम खात्यात सामान्य नोकरी करणारा पती. वैधव्य, केशवपन. ज्यांच्या पुनर्विवाहाला समाजाची मान्यता नव्हती, अशी बहीण आणि मेहुणे म्हणजे बाया आणि धोंडो केशव कर्वे यांच्या आश्रयाने राहणाऱ्या पार्वतीबाई. सोवळेपणीची आलवणे नेसून मोठ्या वयात शाळेत शिकायला जाणाऱ्या! गावोगावी फिरून अनाथ बालिकाश्रमासाठी वर्गणी गोळा करणाऱ्या! स्वत:च्या मनानेच पुन्हा केस वाढवणाऱ्या आणि वेषांतर करणाऱ्या! अमेरिकेत जाऊन मोलकरणीची कामे करणाऱ्या! हे सारे आज कौतुकाचे वाटत असले, तरी तत्कालीन समाजाला ते मानवणारे नव्हते. पार्वतीबाईंची जिथे-तिथे उपेक्षा होत होती, क्वचित कुचेष्टाही होत होती. कदाचित अशा स्त्रीने रमाबाई रानडे यांच्याप्रमाणे आत्मचरित्र लिहावे, हेही त्यावेळच्या समाजाला रुचले नसू शकेल. म्हणून हे आत्मचरित्र दुर्लक्षित राहिले असू शकेल. मग एकदा मागे पडल्यावर मागेच राहिले असेल.

दुसरे म्हणजे रमाबाई रानडे यांच्या आत्मचरित्रापासून आजच्या जमान्यातील कृष्णाबाई सुर्वे यांच्या 'मास्तरांची सावली'पर्यंतच्या (२००९) म्हणजे शंभर वर्षांतल्या आत्मचरित्रांवर नजर टाकली, तर काय दिसून येते? एवढ्या काळात सुमारे शंभर-सव्वाशे स्त्री-आत्मचरित्रे प्रकाशित झालेली आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात अभिनेत्री, समाजकार्यकर्त्या, लेखिका, प्रसिद्ध पुरुषांच्या पत्नी, सर्वसामान्य गृहिणी, दलित अशा सर्व क्षेत्रांतील स्त्रियांनी आत्मचरित्रे लिहिली आहेत. परंतु आत्मचरित्रे गाजली, चर्चेची झाली ती अभिनेत्रींची आणि प्रसिद्ध पुरुषांच्या पत्नींची. हंसा वाडकर यांचे 'सांगत्ये ऐका', सुनीताबाई देशपांडे यांचे 'आहे मनोहर तरी' ही त्यांतील काही उदाहरणे. अनसूया लिमये यांचे 'आम्ही बि घडलो', कमला भागवत यांचे 'न संपलेली वाट', कमलाबाई अष्टपुत्रे यांचे 'जीवनसंघर्ष' या समाजकार्यकर्त्या स्त्रियांच्या आत्मचरित्रांची गुणवत्ता सर्व बाजूंनी उत्तम असूनही ती वाचकांनी उचलली नाहीत. महिला मंडळांतून स्त्री-आत्मचरित्रे हा व्याख्यानांसाठी लोकप्रिय विषय आहे; परंतु कोणत्या आत्मचरित्रांवर बोलू, असे विचारले असता, पहिली पसंती प्रसिद्ध पुरुषांच्या पत्नींच्या आत्मचरित्रांना असते, असे आढळून आले आहे. जे खपते, ते प्रकाशित होते. त्यामुळे प्रकाशकही प्रसिद्ध पुरुषांच्या पत्नींची आत्मचरित्रे विशेषत: प्रकाशित करतात. पार्वतीबाई आठवले यांचे 'माझी कहाणी' उपेक्षित राहण्यामागचे एक कारण हेही असावे.

पुढच्या जमान्यातील कथा-कादंबऱ्या-नाटक-चित्रपट-मालिका यासाठी आवश्यक असलेले पतिपत्नी सहजीवन, प्रेम-कलह या आत्मचरित्रात नाहीत. म्हणून या जमान्यातही त्याकडे कोणाचे लक्ष गेले नसावे. आज मागे वळून पाहताना म्हणावेसे वाटते की, पतीच्या आधाराशिवाय, रूढीविरुद्ध बंडखोरी करून, कर्तृत्व गाजवणाऱ्या स्वयंसिद्ध स्त्रीचे हे पहिले आत्मचरित्र आहे. हे आत्मचरित्र कौटुंबिक परिघ ओलांडून,

त्यापलीकडचे समाजचित्र एका विधवेच्या दृष्टिकोनातून दाखवते. म्हणूनच सामाजिक इतिहासात आणि स्त्रीसाहित्यात त्याचे महत्त्वपूर्ण स्थान आहे.

पार्वतीबाईंची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आणि लेखनशैली सरळसोट आहे. जे डोळ्यांना दिसले, मनाला ठोसपणे जाणवले, काळजाला अगदी भावले, हृदयाला सहजपणे टोचले, ते त्या लिहीत गेल्या. ते अनुभव नटवून सजवून सादर करण्याच्या भरीला त्या पडल्या नाहीत. या दृष्टीत सूक्ष्मता नाही, तरी प्रांजळपणा आहे. या शैलीत चित्रमयता नाही, तरी स्पष्टता आहे. म्हणूनच ८०-९० वर्षांपूर्वीचे हे अनुभव वाचकाला आजही भिडतात.

रत्नागिरी जिल्ह्यातील देवरुख गावी १८७० मध्ये त्यांचा जन्म झाला. माहेरचे नाव कृष्णा बाळकृष्ण जोशी. रत्नागिरी जिल्ह्यातील देवरुख गावच्या कृष्णाच्या बालपणापासून या आत्मकथनाला आरंभ होतो आणि अमेरिका, लंडन, पॅरिस फिरून हिंदुस्थानात परत येणाऱ्या पार्वतीबाईंपाशी या आत्मकथनाचा शेवट होतो. या दोन टोकांच्या मध्ये अडखळत, ठेचकाळत, रक्तबंबाळ होत सुधारणेच्या दिशेने वळणे घेत घेत पुढे गेलेले पार्वतीबाईंचे जीवन आहे. विशेष म्हणजे साधारण १० वर्षांचा संसार करूनही या अल्पशिक्षित स्त्रीने संसाराबद्दलचे लेखन अवघ्या चार-पाच पानांत आटोपते घेतले आहे. एकंदर तीन बाळंतपणे, त्यातील दोन बाळंतपणे अपुऱ्या दिवसांची झाल्यामुळे दोन बाळांचे पाहावे लागलेले मृत्यू, घरातल्या अडीअडचणी... यांचा तपशील लिहिण्याची गरज त्यांना वाटलेली दिसत नाही. अनेकजणींच्या आत्मचरित्रांत हे तपशील सविस्तर येतात. संसारातील रागलोभ, गोडवा-कटुता याबद्दलही रंगून जाऊन किंवा त्रासून जाऊन त्यांनी काहीही लिहिलेले नाही. परंतु पुण्याला आल्यावर, त्यांची आधीची शिक्षण आणि संस्थाकार्य यासंबंधीची उदासीनता, नंतरची उत्सुकता, त्यातले अनुभव सारे काही सविस्तर लिहिताना त्या रंगून गेल्या आहेत. याचा अर्थच संसारी जीवनापेक्षा, त्यांना सामोऱ्या आलेल्या ध्येयजीवनात त्या रमून गेल्या. त्याविषयी त्या भरभरून सांगतात. त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये जाणवतात.

बहीण बाया कर्वे यांच्या प्रेमळ दबावातून निरक्षर-खेडूत पार्वतीबाईंवर आरंभी शिक्षण जरा लादलेच गेले. पुढे बहिणीच्या दबावाबरोबरच अण्णा कर्वे (महर्षी धोंडो केशव कर्वे) यांच्या वागण्या-बोलण्याचा प्रभाव पार्वतीबाईंवर पडू लागला. त्यामुळे संस्थेच्या कार्याबद्दल त्यांना आस्था वाटू लागली. पार्वतीबाईंचे वैशिष्ट्य हे की, एकदा या क्षेत्रात उतरल्यावर त्यांनी समोर आलेले शिक्षण आणि संस्थाकार्य दोन्हीही स्वत:च्या कुवतीनुसार तडीला नेले. एकदा त्या मार्गावर पाऊल टाकल्यावर तिथे उद्‌भवणाऱ्या समस्या त्यांनी स्वत: सोडवल्या. गाऱ्हाणी सांगत, 'मला हे काम नको, ते हवे' म्हणून कुरकुरत किंवा आक्रस्ताळेपणाने रडत-ओरडत त्या पुन्हा मदत मागायला, दाद मागायला बहीण आणि मेहुण्यांकडे आल्या नाहीत. ते

आपल्या मागे उभे आहेत, एवढा आधार पार्वतीबाईंना त्यांच्या मार्गावर पुढे जाण्यास पुरेसा होता. हाच बाणा परदेशी अमेरिकेतही टिकून होता. सॅनफ्रॅन्सिस्कोमध्ये धर्मानंद कोसंबी यांनी 'यंग वुमेन्स ख्रिश्चन असोसिएशन'मध्ये पार्वतीबाईंची सोय करून, आजारपण वाढल्यास त्यांची हिंदुस्थानात परत पाठवण्याची व्यवस्था करण्यास त्या सेक्रेटरीला सांगितले. बऱ्या झाल्यास त्यांच्याकडे बोस्टनला पाठवण्यास सांगितले. पण पार्वतीबाई पुन्हा कोसंबींकडे मदतीसाठी वळल्या नाहीत. त्या पूर्णपणे स्वबळावर स्वत:चा मार्ग शोधत गेल्या.

स्वत:च्या मर्यादा पार्वतीबाई व्यवस्थित ओळखून होत्या. म्हणूनच त्यांची अफाट जिद्द फाजील आत्मविश्वासाकडे वळली नाही किंवा ती आत्मप्रौढीकडे झुकली नाही. वास्तविक हिंदुस्थानातली त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी मोलकरणीची कामे करण्याची नव्हती. वृत्तीने त्या पारंपरिक होत्या. पोशाख आणि आहार या बाबतीत अमेरिकेतही त्यांनी परंपरा सोडली नाही. पण उच्च कुलीन पार्श्वभूमीचा बाऊ न करता, त्यांनी मोलकरणीची कामे शोधली आणि केली. इंग्रजी येत नाही, शिक्षण बेताचे, पैसा अगदी जेमतेम, अशा परिस्थितीत दुसरा तरणोपाय नाही, हे त्यांनी जाणले होते. म्हणून मोलकरणीची कामे इमानेइतबारे करून पैसे मिळवले. दुसऱ्याच्या घरी, संस्थेत किंवा हॉस्पिटलमध्ये कपबशा धुणे, फर्निचर, गालिचे साफ करणे, यांसारख्या कामांत त्यांना कमीपण वाटला नाही, हे त्यांच्या शब्दाशब्दांतून जाणवते. 'कुठून यात सापडले, काय हे नशिबी आले', या प्रकारचा खेदोद्गार अप्रत्यक्षपणेही कोठे जाणवत नाही, कारण आपण एका उच्च ध्येयासाठी हे सारे करत आहोत, याविषयी त्या नि:शंक होत्या. याहून विशेष दखल घेण्याजोगी बाब म्हणजे आपण तिकडे जाऊन मोलकरणीची कामे केली, हे त्यांनी लपवून ठेवले नाही किंवा भावनांचे फुगे फुगवून, ध्येयवादाचा झूला झुलवून त्याचे उदात्तीकरणही केले नाही. 'मी मोलकरणीची कामे केली', हे त्या फार सहजतेने जाहीरपणे या 'माझी कहाणी' आत्मकथनात मांडून गेल्या आहेत. एका ब्राह्मण स्त्रीने परदेशी मोलकरणीची कामे केल्याचे जाहीरपणे लिहिणे म्हणजे १९२८ मध्ये निश्चितच कमालीचे मनोधैर्य होते. जेव्हा त्या अमेरिकेस जाण्यास निघाल्या, तेव्हा निकटवर्तीयांमधले अनेकजण म्हणाले होते, 'या वयात तिथे जाऊन या काय शिकणार? आणि त्याचा काय उपयोग होणार? अण्णांनी यांना मरण्यासाठी तिकडे पाठवले की काय?' या उद्गारांच्या पार्श्वभूमीवर हे मनोधैर्य अधोरेखित होते.

या आत्मकथनात दोन ठिकाणी धूसरता आहे. प्रथम म्हणजे ज्या धर्मानंद कोसंबींच्या आधारावर विसंबून त्या अमेरिकेत गेलेल्या होत्या, त्यांच्याशी पार्वतीबाईंनी स्वत:चे सुरळीत चालू झाल्यावर किंवा हिंदुस्थानात परत निघतानाही मुळीच संपर्क साधलेला दिसत नाही. याचे कारण आत्मकथनात येत नाही. दुसरे म्हणजे बंगाली बंधू पार्वतीबाईंची हिंदुस्थानात पाठवणी करू लागल्यावर, परतीचे तिकीट काढेपर्यंत

त्यांची मजल गेली, तरी पार्वतीबाई निमूटपणे त्यांचे ऐकत कसे राहिल्या? त्या स्वत: डळमळल्या होत्या आणि त्यांनाच परत जावेसे वाटत होते, असे त्यांच्या उद्‌गारावरून वाटत नाही. स्वामी बोधानंद, सुरेंद्रबाबू आणि डॉ. हर्डीकर मध्ये पडले नसते, तर इतक्या कणखर पार्वतीबाई एका परक्या माणसाच्या मर्जीखातर स्वत:च्या मनाविरुद्ध हिंदुस्थानात परत जाणार होत्या? 'माझ्या मनात जरी अमेरिकेतून जावयाचे नव्हते, तरी माझ्या जाण्याने एका बंगाली बंधूचे समाधान होत असल्यास आपण आपल्या स्वार्थावर पाणी सोडण्यास तयार झाले पाहिजे, असे मी माझ्या मनाशी ठरवले होते,' हे त्यांचे स्पष्टीकरण पटणारे नाही; कारण बंगाली बंधूंचा आणि त्यांचा पूर्वपरिचय नव्हता, कोणत्याच दृष्टीने दोघांची एकमेकांशी बांधीलकी नव्हती.

पार्वतीबाई धडाडीच्या कार्यकर्त्या होत्या, परंतु त्यांची वैचारिक पातळी सामान्य होती. याच आत्मकथनाच्या अखेरीस 'आमची विवाह पद्धती' किंवा 'अबलोन्नतीची भावी दिशा' इत्यादी विषयांवर पार्वतीबाईंनी जे विचार व्यक्त केले आहेत, ते अगदीच जुजबी आहेत. त्यात सामाजिक प्रश्नांची खोलवर गेलेली मुळे तपासण्याची आणि त्यावर उपाय शोधण्याची ताकद नाही. उदाहरणार्थ : 'गरीब आईबापांना शिक्षणामुळे उत्पन्न झालेली बेकारी डोळ्यांपुढे दिसत असता, ते आपल्या मुलींना अथवा बायकांना पुढे नोकऱ्या करता येतील, या मोहाने मुलांच्या कॉलेजांत पाठवत असतात. विवाहेच्छू मुलींना नोकऱ्या लावून दिल्यामुळे त्या मुलींची धड ना प्रपंच, ना परमार्थ अशी स्थिती होते. स्त्रियांच्या विवाहित स्थितीपेक्षा त्यांची नोकरी ही त्यांची मोठी गुलामगिरी आहे...' यातील प्रत्येक शब्दावर वाद होऊ शकतो. गरीब कोण? शिक्षण आणि बेकारी यांचा सबंध कशा प्रकारचा आहे? आर्थिक स्वावलंबन स्त्रीसाठी आवश्यक नाही का? इत्यादी.

काही प्रसंगाची धूसरता आणि विचारांच्या मर्यादा यामुळे या आत्मकथनाचा कस मुळीच उणावत नाही. कोणत्याही प्रांजळ आत्मकथनात अशा जागा असतातच. पार्वतीबाईंची बलस्थाने आणि मर्यादा अण्णा कर्वे व्यवस्थित ओळखून होते. मूळ जुन्या पुस्तकात नसलेली, अण्णा कर्वे यांच्या 'आत्मवृत्ता'तील पार्वतीबाईंबद्दलच्या मजकुराची परिशिष्टे (क्र. ३ ते ५) आम्ही या पुनर्मुद्रित आवृत्तीत मुद्दाम सादर केलेली आहेत. त्याशिवाय हे पुस्तक पूर्ण होऊ शकत नाही. पार्वतीबाईंचे पणतू शेखर आठवले आणि त्यांच्या पत्नी शैलाताई यांनी त्यांच्या संग्रहातील पार्वतीबाईंची छायाचित्रे पुस्तकासाठी अगत्याने दिल्याबद्दल त्यांना धन्यवाद!

या सर्वांसकट हे आत्मचरित्र हा आपल्या सामाजिक इतिहासाचा एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे. तो वाचकांपुढे सादर करताना 'राजहंस'ला आंतरिक समाधान होत आहे.

**विनया खडपेकर**

# चार प्रास्ताविक शब्द

श्रीमती पार्वतीबाई आठवले यांची महाराष्ट्रीयांना ओळख करून देण्याची जरूर आहे असे मला वाटत नाही. हिंगण्याच्या अनाथ बालिकाश्रमाशी ज्यांचा थोडा तरी संबंध आलेला आहे, त्यांना पार्वतीबाईंची माहिती आहेच! वर्गणीसाठी गावोगावी हिंडण्याचे त्यांचे नेहमीचे काम असल्यामुळे, पुष्कळांशी त्यांचा प्रत्यक्ष परिचयही झालेला आहे. पुढील कहाणीत त्यांच्याबद्दल आणखी विशेष माहिती मिळेलच. तेव्हा पार्वतीबाईंच्या अंगी विशेष गुण कसे आले व त्यांच्या चरित्रापासून शिकण्यासारखे काय आहे याचाच विचार मी मुख्यत: करणार आहे.

कोकणात पूर्वीच्या काळी जी अनेक घराणी आपल्या सद्‌गुणाने व कर्तबगारीने उदयास आली, त्यापैकी देवरुख गावी स्थायिक झालेले जोशी यांचे घराणे आहे. पार्वतीबाईंचे वडील हे सर्व भावंडांत मोठे. ते १८ वर्षांचे झाले तेव्हा सर्व कुटुंबाचा भार त्यांच्यावर पडला. घराणे घरंदाज परंतु हळूहळू गरिबीस येत चालले होते. अशा वेळी त्यांचे घर जळून गेले. घरांतील देव व थोड्या दिवसांच्या बाळबाळंतिणीसह सर्व माणसे एवढीच बाहेर निघाली व चीजवस्तू वगैरे सर्व जळून खाक झाले. पार्वतीबाईंचे आजे त्याच धक्क्याने पुढे थोड्यांच दिवसांत वारले. गरिबी ही शाळा, ज्यांच्या अंगात गुप्त सामर्थ्य बऱ्याच प्रमाणात असते, त्यांना शिक्षण देण्याला फार उत्तम. या शाळेत पार्वतीबाईंना, त्यांच्या वडील-मातोश्रींना व सर्व भावंडांना चांगले शिक्षण मिळाले. पार्वतीबाईंच्या माहेरची जर सुस्थिती असती तर आपल्या मुलाला घेऊन समाजाने वाळीत टाकलेल्या आपल्या पुनर्विवाहित बहिणीकडे येऊन राहण्याची बुद्धी पार्वतीबाईंना झाली नसती आणि पार्वतीबाईंकडून व त्यांच्या मुलाकडून जी बहुमोल सेवा घडत आहे तिला समाज मुकला असता.

पार्वतीबाईंचे वडील व मातोश्री ही उभयता जुन्या परंपरेच्या वातावरणांत वाढलेली होती. साधी राहणी, करारीपणा, काटकपणा, दीर्घायुष्य, इत्यादी गुणांबद्दल

त्यांची पिढी प्रसिद्ध आहे. अशा पिढीत आणि अशा वातावरणात पार्वतीबाईंचा जन्म झाल्यामुळे त्यांच्या अंगीही वरील आनुवंशिक गुण उत्पन्न झाले आहेत. या गुणांमुळेच त्यांना संधी मिळाल्याबरोबर नवीन परिस्थितीचा फायदा घेता आला व बरेच काम करून दाखवता आले.

वयाच्या २६व्या वर्षी शिक्षणाला सुरुवात करून, ट्रेनिंग कॉलेजचा अभ्यास पुरा करणे, सुमारे २० वर्षे सतत प्रवास करून वर्गणीचे कठीण काम करणे, दोन तीन वर्षे केवळ निष्कांचन स्थितीत स्वावलंबनाच्या बळावर अमेरिकेचा प्रवास करून संस्थेला थोडीफार मदत मिळवून परत येणे, या गोष्टींवरून त्यांचा धाडसी स्वभाव व कोणत्याही संकटांना तोंड देण्याची तयारी हे गुण दिसून येतात. या सर्व गुणांचे रहस्यदेखील त्यांच्या करारीपणातच आढळून येईल.

पुनर्विवाहित बहिणीकडे राहावयास गेल्यानंतर पार्वतीबाई आपल्या बहिणीचेच अनुकरण करणार ही भीती त्यांच्या आप्तेष्टांस वाटली; पण ती निराधार होती. मुलेबाळे झालेल्या, विशेषत: मुलगा हयात असणाऱ्या विधवांनी पुनर्विवाह केल्याची उदाहरणे आपल्या समाजातच काय, पण या गोष्टीचा विधिनिषेध न मानणाऱ्या पाश्चात्त्य समाजातदेखील विरळाच-अपवादात्मकच आढळून येतील. आप्तांच्या भीतीला भीक न घालता व लोकनिंदेला न जुमानता पार्वतीबाईंनीं आमच्याकडे येण्याचा धीर केला ही गोष्ट त्यांच्या आयुष्याक्रमात परिवर्तन घडवून आणणारी अत्यंत महत्त्वाची झाली, यांत शंका नाही.

पार्वतीबाईंच्या अंगीदेखील मनुष्यस्वभाव या दृष्टीने काही दोष आहेत. पण स्वत:ला लावलेली शिस्त, स्वानुभव व स्वार्थत्याग या दिव्यांतून पार्वतीबाईंना जावे लागल्यामुळे त्यांचे दोष मागे पडून गुणांचाच उत्कर्ष अधिक झालेला दिसतो.

मनुष्याच्या अंगी कळकळ असली व कार्यासंबंधी दृढ व्यासंग असला म्हणजे न आवडणाऱ्या गोष्टींकडेही लोक कानाडोळा करतात. आश्रमाचे काम करीत असता पार्वतीबाईंनी केलेले वेषांतर लोकांना पसंत नव्हते. पार्वतीबाईंची हाती घेतलेल्या कार्याबद्दल इतकी कळकळ दिसून येत असे व त्यासाठी त्या इतकी जिवापाड मेहनत घेत असत की, लोकांना त्यांनी केलेल्या वेषांतराचे विस्मरण होऊन त्यांना मदत करण्याची तयारी जुन्या विचारांच्या लोकांमध्येही दृष्टोत्पत्तीस येऊ लागली. कोणतीही गोष्ट आपल्या मनाला पटली म्हणजे लोकनिंदेला न जुमानता ती गोष्ट व्यवहारात आणण्यासाठी बराच आत्मविश्वास अंगी असावा लागतो. या आत्मविश्वासाला शिलाची व दृढ निश्चयाची जोड मिळाली, तर तो किती परिणामकारक होऊ शकतो हे पार्वतीबाईंच्या वेषांतराने प्रत्ययास येण्यासारखे आहे.

जुन्यातील चांगले कायम ठेवून, नव्यातील गुणांची त्याला जोड देणे हे अतिकठीण काम ज्यांनी साध्य केले अशा व्यक्तींत पार्वतीबाईंची गणना केली पाहिजे. पार्वतीबाईंना जुन्या परंपरेचा जसा अभिमान आहे, तशी त्यांना जुन्या परंपरेतील

दोषांचीही जाणीव आहे व ते नजरेस आणून देण्याचे काम पार्वतीबाई आपल्या व्याख्यानांतून करीत असतात. त्याचप्रमाणे नव्यातील दोषांवर कडक टीका करून चांगल्या गुणांचे अनुकरण करण्याची प्रवृती उत्पन्न करण्याकडे त्यांचे लक्ष आहे. पार्वतीबाईत झालेल्या नव्या-जुन्याच्या गोड मिलाफामुळे त्यांचे वजन जुन्या व नव्या अशा दोन्ही पंथांच्या लोकांवर पडते व त्यामुळे वर्गणी जमविण्याचे कठीण काम त्यांच्याकडून चांगल्या रितीने होते. साधी राहणी, हलकी मानलेली कोणतीही कामे करण्याची सदैव तयारी, जुन्या मतांच्या लोकांची विटंबना अगर अवहेलना न करता, त्यांच्याशी वागताना त्यांच्या अंगी दिसून येणारी सहिष्णुता, या गुणांनी पार्वतीबाई जेथे जातील तेथे त्या दुसऱ्यांचे मन आपणाकडे ओढून घेतात. सुशिक्षित स्त्रियांनी हे गुण आपल्या अंगी आणण्याचा बुद्धिपुरस्सर यत्न केल्यास स्त्रीजातींच्या उन्नतीचे कार्य बरेच सुकर होईल. ज्या स्त्रियांची सुधारणा करावयाची आहे, त्यांच्यात मिळून मिसळून वागून आपल्यापैकीच या आहेत अशी भावना त्यांच्या मनात उत्पन्न झाल्यावाचून या कार्याला यश यावयाचे नाही. या दृष्टीने पार्वतीबाईंचे आचरण अत्यंत अनुकरणीय आहे.

पार्वतीबाई आठवले यांनी आपला स्वार्थ साधून परमार्थ साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे. स्वार्थ व परमार्थ यांची सांगड घालणे फार कठीण असते. हे त्यांना किती साध्य झाले याचा निर्णय वाचकांनी करावा.

उच्च ध्येय व महत्त्वाकांक्षा या दोहोंच्या बळावर साधारण माणसालाही विशेष शिक्षणाच्या अभावीदेखील किती कार्य करता येण्यासारखे आहे, हे पार्वतीबाईंच्या चरित्रावरून शिकण्यासारखे आहे. पार्वतीबाईंसारख्या कितीतरी स्त्रिया आपल्या समाजात कोनाकोपऱ्यांत दडून राहिलेल्या सापडतील. योग्य संधीच्या अभावी त्यांच्यामधले गुप्त सामर्थ्य वाया जात आहे. अशा स्त्रिया उजेडात आल्या तर त्यांच्याकडून केवढे तरी राष्ट्रकार्य होण्यासारखे आहे. सामान्य सामर्थ्यांच्या, निरपेक्ष बुद्धीने काम करणाऱ्या स्त्रियांची आज आपल्या राष्ट्राला अत्यंत जरुरी आहे. सामान्यत: स्त्रियांच्या उन्नतीचे आणि विशेषत: स्त्रीशिक्षण प्रसाराचे केवढे तरी काम होणे आहे. पार्वतीबाईंचे चरित्र वाचून अथवा ऐकून 'आता आपल्या हातून काय होणार?' या मंत्राचा जप करीत अज्ञातवासात असणाऱ्या काही प्रौढ विधवांना जर बाहेर उजेडात येऊन आपल्याला झेपेल तेच कार्य करण्याची बुद्धी झाली तर पार्वतीबाईंच्या कहाणीचे चीज होईल.

एरंडवणे, महिला विद्यापीठ, **धोंडो केशव कर्वे**
१२ मार्च १९२८

# वाचकांस नम्र विनंती

मी आपल्या आयुष्यात अनाथ बालिकाश्रमाच्या प्रचारिकेचे काम केले आहे. मला लेख लिहून प्रसिद्ध करण्याचा कधीच प्रसंग आला नाही. माझी कहाणी लिहून काढली असता तिचा बराच उपयोग होईल अशी आग्रहाची सूचना मला माझ्या अनेक हितचिंतकांकडून करण्यात आली. ही सूचना मला योग्य वाटली. पण मला लिहिण्याची सवय नसल्यामुळे माझ्या कल्पना लिहून काढून या कार्यात मदत करण्याची जबाबदारी कोण घेणार, असा मला प्रश्न पडला. तथापि आमच्या संस्थेचे आजन्म सेवक प्रो. बापूसाहेब चिपळूणकर यांनी हे काम करण्याची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेतली व या कार्यास गेल्या वर्षी सुरुवात केली. प्रो. चिपळूणकर यांनी मला या कामात जी मदत केली ती त्यांच्याकडून झाली नसती, तर 'माझी कहाणी' वाचकांच्या हातात इतक्या लवकर पडली नसती. म्हणून त्यांचे आभार मानावेत तितके थोडेच आहेत.

या पुस्तकात चुका व दोष आहेत असे मला वाटते. पण हा एका फारसे न शिकलेल्या बाईकडून केलेला प्रयत्न आहे हे लक्षात घेऊन, तो वाचकांनी गोड करून घ्यावा अशी त्यांना नम्र विनंती आहे.

आश्रमाकरिता मला जी थोडी फार सेवा करण्याची संधी परमपूज्य गुरुवर्य अण्णांच्या कृपेने मिळाली, त्यांना परमेश्वर चिरायुषी करो व त्यांच्या प्रयत्नाने तरी आम्हा विधवांमधील कर्तबगारी देशकार्यी लागो अशी परमेश्वराची प्रार्थना करून मी वाचकांची रजा घेते.

मार्च १९२८ **पार्वतीबाई आठवले**

# अनक्रम

माझे आईबाप / १

माझे लग्न / ४

माझे वैवाहिक आयुष्य / ६

बायाचा पुनर्विवाह / ८

शिक्षणाची तयारी / १०

माझे मतांतर / १४

आश्रमाच्या कामास आरंभ / १६

वर्गणी मिळविण्याचे काही अनुभव / २०

प्रवासातील अडचणी / २२

माझे वेषांतर / २५

नानाचे लग्न / ३०

इंग्रजी शिकण्याकरिता धडपड / ३४

अमेरिकेत जाण्याची तयारी / ३७

बोटीतील प्रवास / ३९

ख्रिस्ती भगिनी मंडळामधील पहिले अनुभव / ४३

मिशनऱ्यांचे शांतिसदन / ४६

महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा सहवास / ४९

सहा दिवसांचा आगगाडीतील प्रवास / ५३

सिनक्टडी येथील अनुभव / ५५

अमेरिकेतून उचलबांगडी होण्याचा प्रसंग / ६१

न्यूयॉर्क येथील अनुभव / ६६

आंतरराष्ट्रीय मजूर परिषद / ७०

ओरेयलीच्या घरी / ७३

मातृभूमीस परत / ७९


सामाजिक प्रश्नांवर माझे काही विचार / ८२

आमची विवाहपद्धती / ८७

स्त्रियांच्या संस्था व त्यापुढील प्रश्न / ८९

अबलोन्नतीची भावी दिशा / ९१

परिशिष्टे / ९४



अनाथ बालिकाश्रम
– आरंभीची झोपडी

*(कर्वे संग्रहालयाच्या सौजन्याने. छायाचित्रकार – भरत केतकर)*




अण्णा कर्वे आणि बाया कर्वे


*(कर्वे संग्रहालयाच्या सौजन्याने. छायाचित्रकार – भरत केतकर)*



पार्वतीबाई आठवले



आठवले कुटुंब परिवार (१९४९)
बसलेल्या रांगेत उजवीकडून तिसऱ्या पार्वतीबाई



पार्वतीबाईंचे पुत्र
नारायण महादेव आठवले
खुर्चीवर बसलेल्या :
पार्वतीबाई, त्यांच्या सूनबाई
सुशीला, मांडीवर प्रभा
खाली बसलेली : पार्वतीबाईंची
नातवंडे – अरविंद, उषा,
कुमुद



पार्वतीबाई अमेरिकेतील कामगार परिषदेत.

*(कर्वे संग्रहालयाच्या सौजन्याने. छायाचित्रकार – भरत केतकर)*



अमेरिकेत पार्वतीबाई

*(कर्वे संग्रहालयाच्या सौजन्याने. छायाचित्रकार – भरत केतकर)*



महर्षी धोंडो केशव कर्वे

*(कर्वे संग्रहालयाच्या सौजन्याने. छायाचित्रकार - भरत केतकर)*



पार्वतीबाई आठवले

*(कर्वे संग्रहालयाच्या सौजन्याने. छायाचित्रकार - भरत केतकर)*

# माझे आईबाप

रत्नागिरी जिल्ह्यात देवरुख गावी १८७० साली माझा जन्म झाला. माझे वडील कै. ती. बाळकृष्ण केशव जोशी यांचे देवरुखास स्वत:चे घर असे. थोडी शेती सांभाळून ते देवघेवीचा व्यवहार करीत असत. आमचे घर पूर्वीच्या पद्धतीचे म्हणजे घरावर गवताचे छप्पर, एक मजली, पुढे अंगण, सोपा व पडवी अशा थाटाचे होते. आम्ही एकंदर अकरा भावंडे होतो. या सर्व भावंडांतून सध्या चार हयात आहेत. तीन बहिणी व एक भाऊ. माझ्या बहिणी म्हणजे प्रो. कर्वे यांच्या पत्नी सौ. आनंदीबाई कर्वे व नाशिक हायस्कूलचे रिटायर्ड हेडमास्तर श्री. रामचंद्र काशिनाथ भिडे यांच्या पत्नी सौ. यशोदाबाई भिडे या होत. बंधू श्री. वामन बाळकृष्ण जोशी हे देवरुख येथेच वकिलीचे काम करीत होते. सर्वांत वडील बंधू श्री. नरहर बाळकृष्ण जोशी हे भावनगर येथे आपल्या मुलाजवळ सुखवस्तू म्हणून राहत होते, ते गेल्या मे महिन्यात ७८ वर्षांचे होऊन वारले. आमच्या मातोश्री ७५ वर्षे वयाच्या होऊन वारल्या व आमचे वडील वयाच्या ९२ व्या वर्षी वारले.

आमच्या गावी त्यावेळी म्हणण्यासारखी मुलांचीच शाळा नव्हती मग मुलींची कोठून असणार? त्यावेळी मोठ्या घरच्या मंडळींत बायकांनी शिकावे की नाही या विषयाची चर्चादेखील कधी होत नसे. स्त्रीशिक्षणाचा प्रश्न तेव्हा फारसा उत्पन्न झाला नव्हता. आम्हा लहान मुलींना पूजेची तयारी करिता आली, तांदूळ कांडता येऊ लागले, उष्टे-खरकटे काढता येऊ लागले, लहान मुलांना अंघोळ घालून त्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था करता येऊ लागली, म्हणजे आम्हांला मिळावयाचे ते सर्व शिक्षण मिळाले, असा त्यावेळी समज असे. आमची त्यावेळची मॅट्रिक परीक्षा म्हणजे भात-पिठले करता येऊन दोन पानांचा स्वयंपाक करता येणे ही असे. मी माझ्या ११व्या वर्षी या परीक्षेत पास झाले होते.

आमच्या आईला मुलांकडे बघण्याखेरीज गवत कापणे, शेतांत भाताची लावणी

करणे, घरांत तांदूळ कांडणे, दळणे, रहाटाचे पाणी ओढणे, ही सर्व कामे करावी लागत. ही कामे करून आई फार दमून जात असे व अशा स्थितीत मुलांवर रागावण्याचा प्रसंग अनेक वेळा येत असे. आमची आई आम्हांला जरी कित्येक वेळा रागे भरे तरी तिचा स्वभाव कामसू असल्यामुळे आमचे लहानपणी खाण्यापिण्याचे हाल झाले नाहीत. आमच्या घरात सात-आठ मुले, दोन-तीन गाई, तीन-चार म्हशी अशी स्थिती असे. घरांत नोकर काय तो एक व तो गुरे राखण्याचे काम करी. अशा स्थितीत आमच्या आईने सर्वांचा सांभाळ कशा रितीने केला असेल, याची कल्पना वाचकांनीच करावी.

आमची आई घरांतील सर्व व्यवस्था बघत असे, वडील किरकोळ देव-घेवीचा व्यवहार व परड्यातील शेतीकडे बघत असत. ते धार्मिक वृत्तीचे असून रामोपासक होते. जरी ते किरकोळ देवघेवींचा व्यवहार करीत तरी त्यांचे लक्ष प्रपंचात नव्हते. त्यांचा बहुतेक वेळ नामस्मरण करण्यात जाई. आमच्या गावात जे महार, मांग वगैरे लोक भाऱ्या व मोळ्या घेऊन येत असत, त्यांना आमचे वडील बहुतेक नियमाने घरांतील माठांत ठेवलेले पाणी पाजत असत; व त्यांना ताक-लाह्या देत. आमचे गावापासून नदी दोन मैलांवर लांब आहे. गावातील इतर लोक त्यांची सावली पडेल म्हणून त्यांना जवळ उभे करीत नसत. आमचे वडील मात्र महार-मांगांना पाणी मिळण्यास अडचण पडते, म्हणून घरातील रांजण त्यांच्याकरता मुद्दाम भरून ठेवत. हे लोक भारे घेऊन आले म्हणजे आमच्या घराजवळ थांबून "बाबा घरात आहेत का?" म्हणून चौकशी करीत व त्यावेळी वडील जरी पूजा करीत असले तरी अर्ध्या पूजेतून उठून सोवळ्याने पाणी घालीत असत. "महारांना सोवळ्याने कसे पाणी घालता," असे विचारले असता "सर्वच आम्ही रामाची लेकरे आहोत, त्यांचा आत्मा पाणी पिऊन थंड झाला की आमचा होईल." असे ते म्हणत. त्यांना पाणी पाजल्यावर गूळ, भाजलेले वाटाणे व मूठ मूठ चणे देत असत व त्यांनी दिलेली ओली भाजी घेऊन त्यांच्याजवळ सुखदु:खाच्या गोष्टी सांगत असत. गावात कोणापाशी जरी अस्पृश्यांनी पाणी मागितले तरी 'बाबा पाणी घालतील, बाबांकडे जा.' असं इतर लोक सांगत असत. बाबांच्या या पाणी घालण्याच्या सवयीने बाबा हा गावात एक थट्टेचा विषय झाला होता. मोहरमच्या दिवसांत घरोघर मुसलमानांचे खेळ येत असून, त्यावेळी त्या खेळात खेळणाऱ्या मंडळींना देखील आमचे वडील मोठ्या प्रेमाने वागवीत. मेळ्यातील लोकांना घरी बोलावून त्यांना अनेक वेळा वडलांनी गूळपाणी दिलेले आहे. गावात येणारे बैरागीदेखील आमच्या घराचा पाहुणचार घेतल्यावाचून जात नसत. बैरागी आले की त्यांना आमचे वडील दूध प्यावयास देऊन त्यांची योग्य संभावना करण्याची काळजी घेत. आमच्या आईला वडलांचे हे आदरातिथ्य विशेष आवडत नसे; पण तिचे या बाबतीत काही चालत नसे; आमच्या वडलांचा स्वभाव फार प्रेमळ होता. त्यांना

लोकांची विचारपूस करणे, त्याच्याशी  सुखदु:खाच्या चार गोष्टी सांगणे या गोष्टीचे एक वेडच लागून गेले होते. त्यांचा बहुतेक वेळ लोकांना गूळपाणी वाटण्यात व बोलण्यात जाई. कामाचा बहुतेक बोजा आईवर पडत असे. आईला घरातील मुलांचे पाहून परड्यातील शेती व देवघेवीच्या व्यवहारासंबंधीदेखील कित्येक गोष्टी पाहाव्या लागत. या कारणामुळे आईला जिवापाड श्रम करावे लागत व आम्हां मुलांचे पुढे कसे होईल, नीटपणे स्थळे मिळून यांची लग्ने कशी होतील, याची काळजी वाहावी लागे. लहानपणापासून आईला कशी मदत करता येईल व आईला तिच्या काळजीतून कसे सोडविता येईल यासंबंधी माझ्या मनात सारखे विचार येत; पण मला त्या नुसत्या विचारांपलीकडे आईला विशेष मदत करता आली नाही.

✿ ✿

# माझे लग्न

सासरी लवकर जाऊन आईची जबाबदारी थोडी हलकी करता आली तर बरे असे मला नेहमी वाटे. त्यावेळी मुलींची ५ व्या वर्षापासून लग्न होत. मला आता ११वे वर्ष लागले होते. माझ्या थोरल्या बहिणीचे लग्न ७ व्या वर्षी झाले होते. माझी दुसरी बहीण बाया हिचे लग्न ९व्या वर्षी झाले होते. मी ११ वर्षे वयाची झाले त्यावेळी शेजारच्या बायका माझ्याकडे पाहून "किती मोठी झाली आहे लग्नाला!" असे म्हणत असत. बंधूचे लग्न झाल्यावर माझे वडील आजारी होते म्हणून त्यांना माझ्याकरता स्थळ पाहावयास वेळ मिळाला नाही. मी लहानपणी अंगापिंडाने बरी दिसत असल्याने ११ वर्षे वयाच्या मुलींपेक्षा अधिक वयाची अशी दिसत असे. त्यामुळे माझ्याविषयी माझ्या आईला मोठी काळजी वाटत असे.

आमच्या शेजारी श्री. भिकाजीपंत पटवर्धन या नावाचे एक मामलेदार राहत असत. त्यांचे कुटुंब कोकणात 'नऊ पटवर्धन' या नावाने प्रसिद्ध आहे. त्यांचा एक मुलगा सध्या रत्नागिरीस 'बलवंत' पत्र चालवीत आहे. माझी आई मामलेदाराच्या बायकोची वेणी घालावयास जात असे. त्यावेळी ही चाल कोकणांत असे. तेव्हा वेणी घालता घालता मामलेदारीण काकूंनी माझ्या लग्नाची गोष्ट काढली. तेव्हा माझी आई म्हणाली, 'मुलगी लग्नाला मोठी झाली आहे, बायका तोंड खुडे करतात, आमच्या मंडळींना स्थळ पाहावयास वेळ नाही." मामलेदारीणबाई म्हणाल्या, "आम्ही आश्रय दिलेला एक मनुष्य आहे, त्याला कस्टम खात्यात गोव्याला नोकरी लावून दिलेली आहे. तुम्ही त्याला मुलगी दिलीत तर दोन्ही मांडवांचा खर्च आम्ही करू. तुम्हांला तोशीस पडू देणार नाही. मात्र मुलाचा पाय लंगडा आहे." नंतर वेण्या आटोपल्या. आईने वडलांच्या पूजेच्या वेळी ही हकिकत त्यांना सांगितली. आमचे वडील म्हणाले, "हे स्थळ रामाने चालून घरी आणले आहे तेव्हा हे स्थळ खचित करावे." त्यांनी पूजा आटोपली व ते लगेच मामलेदारांकडे गेले. गण-गोत्र

पाहून पत्रिका पाहिल्या व लग्न निश्चित केले. मला स्वत:ला हे स्थळ मनातून पसंत नव्हते तरी मी काही बोलले नाही. घरी यासंबंधी चर्चा चाले. त्यावरून मला असे कळले की, पाय लंगडा आहे. नोकरी १५ रुपये* दरमहाची आहे. नातलग सासू-सासरा वगैरे कोणी नाही. त्यावेळी लहान मुलींना आपले लग्नात ताशेवाजंत्री वाजणार म्हणून आनंद वाटत असे. मला मात्र त्यावेळी आनंद झाला नाही. आपले लग्न होणार म्हणून मला काळजी वाटू लागली. लग्न हवे किंवा नको म्हणण्याचे सामर्थ्य अंगी नव्हते. लग्नाचा मुहूर्त ठरून सहा दिवसांच्या रजेवर गोव्याहून आमची मंडळी देवरुखास आली. त्यावेळी भावी वधूवरांनी लग्नापूर्वी एकमेकांस पाहण्याची चाल नव्हती. पुढे योग्य मुहूर्तावर माझे लग्न झाले. श्री. भिकाजीपंत पटवर्धन यांचे घर मला सासरच्या घराप्रमाणे वाटू लागले.

माझे लग्न लवकर होत नव्हते म्हणून ज्या बायका आईला येऊन बोलत असत त्याच बायका लग्न झाल्यावर आईला म्हणू लागल्या की, "आपली मुलगी अशा ठिकाणी वैरलीत. स्थळ असे कसे पाहिलेत? घरी सासू-सासरा नाही, पायाने नवरा अधू. १५ रुपयांची नोकरी. मुलगी काय तुमची व्यंग होती की, तिला दुसरे स्थळ मिळाले नसते, म्हणून तिला तुम्ही अशा रीतीने पिवळी केलीत?" एकूण आईला माझे लग्नामुळे माझ्याविषयी काळजी कमी न होता ती उलट वाढू मात्र लागली.

✿ ✿

* कस्टम खात्यांत नऊ महिने दरमहा १५ रुपये मिळत असत व ३ महिने पगारावाचून काढावे लागत असत.

# माझे वैवाहिक आयुष्य

आमच्या शेजारी भिकाजीपंत पटवर्धन मामलेदार यांच्या घरी-सासरी म्हणून मी जात असे. तेही मला वडील सुनेप्रमाणे वागवीत असत. वयाच्या १४ व्या वर्षी मला आमच्या मंडळींच्या नोकरीच्या गावी म्हणजे पणजीजवळ असणाऱ्या वेरेगावी पोहोचवण्यात आले. त्या गावी आमच्या स्वतंत्र बिऱ्हाडास सुरुवात झाली. आमच्या बिऱ्हाडात आम्ही दोघेच राहत नव्हतो. आमच्या पुरुषांचे एक परममित्र श्री. बाळाजी भास्कर जोशी व त्यांच्या पत्नी रमाबाई अशी दोन माणसे राहत होती. एकाच चुलीवर दोन जोडपी स्वयंपाक करून खात होतो. आम्ही दोघी जावांप्रमाणे राहत असू. आमच्यामध्ये भांडणे कधीच झाली नाहीत. दोन्ही कुटुंबे एकत्र राहत असल्यामुळे आमच्या अडचणी कमी होऊन सुखसोयी अधिक वाढल्या होत्या. आम्ही पाळीपाळीने स्वयंपाक व इतर कामे करून दोघीजणी मोठ्या आनंदात राहत होतो.

मला १५ व्या वर्षी मुलगा झाला. पण तो अपुऱ्या दिवसांचा होऊन वारला. माझे पहिले बाळंतपण फारच लहानपणी म्हणजे वयाच्या १५ व्या वर्षी झाल्यामुळे माझे फार हाल झाले व डॉक्टर आणण्यापर्यंत पाळी आली. माझ्या वयाच्या १८ व्या वर्षी मला सध्या हयात असलेला मुलगा झाला. त्याचे नाव नारायण. हा प्रो. कर्वे यांनी स्थापन केलेल्या अनाथ बालिकाश्रम संस्थेचा आजन्म सेवक असून भारत वर्षीय महिला विद्यापीठाचा रजिस्ट्रार व महिला पाठशाळेचा प्रिन्सिपॉल होता. आता तेथेच पदार्थविज्ञानशास्त्राचा प्रोफेसर म्हणून काम करीत आहे. त्याच्या पाठीवर सव्वा वर्षाने मला आणखी एक मुलगी झाली पण ती अपुऱ्या दिवसांची होऊन वारली. मला २० वर्षांच्या आत तीन मुले झाली. आमच्या पुरुषांची बदली होऊन त्यांना भाइंदरनजीक राई मुक्कामी कामावर जावे लागले. अशा रितीने आमची दोन कुटुंबे विभागली गेली व आमचे चार माणसाचे कुटुंब दोन माणसांचे झाले.

आमच्या पुरुषांचे आयुष्य बहुतेक गोव्याच्या हवेत गेले होते. गोव्याच्या कोरड्या

हवेची सवय झाल्यामुळे वसईनजीक असणाऱ्या गावातील तापसरीची हवा त्यांना बाधली. त्यांना मलेरियाचे दुखणे जडले. शेवटी अशक्तपणा होऊन उदररोग झाला व माझ्या वयाचे २०व्या वर्षी देवरुखास, माझ्या माहेरीच त्यांना देवाज्ञा झाली. त्यांनी १८८० पासून १८९० च्या महिन्यापर्यंत गोवे येथे नोकरी केली. त्यांची वृत्ती लहानपणापासून परोपकारी असे.ते परोपकार हीच देवपूजा समजत असत. ते आपल्या वरिष्ठांशी हांजी हांजी कधी करीत नसत, तरीदेखील त्यांच्या वरिष्ठाकडून त्यांच्या कामगिरीबद्दल अनेक वेळा शाबासकी मिळत असे.

आमच्या पुरुषांजवळ शिल्लक काही नव्हती. शिवाय स्वत:चे घरदार व आप्तेष्ट असे कोणी नव्हते. अशा स्थितीत मला वैधव्य स्थितीतील आयुष्य माहेरीच काढावे लागले. यावेळी माझी वडील बहीण रँग्लर परांजपे यांची सासूही विधवा होऊन सहा वर्षे झाली होती; व ती अतिशय आजारी होऊन माहेरीच राहावयास आली होती, माझी तिसरी बहीण प्रो. कर्वे यांची पत्नी बाया ही तिच्या ९ व्या वर्षी विधवा झाली. तरी ती सासरी राहत असे. अशा रितीने तिघी बहिणी वैधव्य स्थितीत असल्यामुळे, माझे आईबाप अत्यंत दु:खी असत. मला कोणी सासरचे नसल्यामुळे माझा भार सर्वस्वी त्यांच्यावरच पडला होता. मला वैधव्यदु:ख होत नसे असे नाही, पण ते सर्व विसरून मी आईबापांपुढे आनंदी राहून दाखवीत असे.

जुन्या रीतीप्रमाणे पुरुष मरताच मला सोवळे करण्यात आले, कारण केस व बांगड्या शवाबरोबरच गेल्या पाहिजेत अशी त्यावेळी समजूत असे. त्यावेळी माझ्या मुलाला साडेतीन वर्षे झालेली होती. माझी अशी विद्रूप स्थिती पाहून तो प्रश्न करी की, "तू तांबडे लुगडे का नसतेस? तुझे केस कुठे आहेत?" मी शोकाकुल वृत्तीने सांगे "तुझ्या वडलांबरोबर गेले आहेत." तो मला म्हणे "आपणही तिकडे जाऊ" अशा वेळी माझ्या मनाची काय स्थिती होत असेल त्याची कल्पना मुले असणाऱ्या विधवेनेच करण्यासारखी आहे. इतरांस ती होणे शक्य नाही.

अशा तऱ्हेने मनातल्या मनात वैधव्यदु:ख जाळून शक्य तेवढे माझ्या आईस व वडलांस सुखी ठेवण्याचा मी प्रयत्न करी, अशा स्थितीत माहेरच्या घराण्यात माझ्या वैधव्याची ५ वर्षे गेली व माझ्या वयाला २५वे वर्ष सुरू झाले. त्यावेळी दैवयोगाने जी एक गोष्ट घडली त्यामुळे माझ्या आयुष्याला अगदी निराळे वळण लागले. ती गोष्ट म्हणजे माझी बहीण बाया हिचा प्रो. कर्वे यांच्याबरोबर झालेला पुनर्विवाह होय.

✿ ✿

# बायाचा पुनर्विवाह

माझे वडीलबंधू नरहरपंत व प्रो. कर्वे हे बी.ए. झाल्यापासून मुंबईस एकत्र राहत असत. बायाला २२ वे वर्ष लागले त्यावेळी आमच्या बंधूंनी तिला मुंबईस शिकावयास आणून ठेवली. प्रो. कर्वे यांनी आपणाजवळ शिकणारी पाच मुले ठेवली होती. नरहरपंतांची मंडळी व प्रो. कर्वे यांच्या कुटुंबातील मंडळी एकत्र राहत असत व हे कुटुंब जवळजवळ पंधरा मंडळींचे होते. अमेरिकेतून पंडिता रमाबाई आल्यावर त्यांनी 'शारदासदन' या नावाची संस्था काढली. त्या संस्थेत बायास पहिली विद्यार्थिनी म्हणून आमच्या बंधूंनी पाठविले. बायाचे पंडिता रमाबाईंवर मोठे प्रेम होते व पंडिता रमाबाईदेखील 'शारदा सदना'तील पहिली विद्यार्थिनी म्हणून तिच्यावर मोठा लोभ करीत असत.

आमचे दादा प्रो. कर्वे यांच्याकडे मुरुडला नेहमी जात असत व प्रो. कर्वे हेदेखील कित्येक वेळी देवरुखला दादांबरोबर येत असत. आमचे बंधू व प्रो. कर्वे हे दोघेही बरेच दिवस विधूर झाले होते. आमच्या वडलांची व प्रो. कर्वे यांची ओळख होती. प्रो. कर्वे व आमचे बंधू हे मिळवते असून त्यांनी अविवाहित राहावे हे आमच्या वडलांना संमत नव्हते. एकदा प्रो. कर्वे यांना आमच्या वडलांनी विचारले, "आपण लग्न का करीत नाही?" तेव्हा प्रो. कर्वे यांनी सांगितले, "ब्राह्मण कुळातील बालविधवा मुलगी मिळेल व ती माझ्या गरिबीत राहण्यास कबूल असेल, तर अशा मुलीबरोबर पुनर्विवाह करण्याची माझी इच्छा आहे. अशी विधवा मुलगी न मिळाल्यास आजन्म अविवाहित राहावयाचे असे मी ठरवले आहे." आमचे वडील म्हणाले की, "असा तुमचा निश्चय असल्यास मग आमच्या बायाबरोबर का लग्न करीत नाही?" प्रो. कर्वे यांनी सांगितले की, "मुलीची तयारी असल्यास माझी त्याला हरकत नाही."

आमचे वडील स्वत: 'शारदासदनात' गेले व त्यांनी बायाला सांगितले की,

''प्रो. कर्वे यांच्यासारखा पवित्र ब्राह्मण तुजबरोबर लग्न करण्यास तयार आहे. तू त्यांच्याबरोबर लग्न करशील तर मला त्यापासून दु:ख होणार नाही.'' अशा रितीने बायाची संमती मिळवून तिचा प्रो. कर्वे यांच्याबरोबर माझ्या वडलांच्या प्रोत्साहनामुळेच पुनर्विवाह झाला.

आमच्या वडलांची मते पुनर्विवाहास अनुकूल झाली याचे कारण असे की, बायाला ९ व्या वर्षी वैधव्य आले यामुळे बाबांला वैराग्य प्राप्त होऊन ते काशी यात्रेला जावयास निघाले व त्यांनी वाटेत पुण्यात मुक्काम केला. त्यावेळी पुण्यात शास्त्रीपंडितांची पुनर्विवाहाबद्दल चर्चा करण्याकरिता एक सभा भरली होती. त्या सभेस बाबा हजर होते व तेथील शास्त्रार्थ ऐकून बाबांचे मत कुलीन बालविधवांनी पुनर्विवाह करावा, असे झाले होते. म्हणून त्यांनी बायाच्या पुनर्विवाहास संमती दिली. आमचे वडीलबंधू सुशिक्षित असल्यामुळे त्यांचे या कार्यास साहाय्य झाले.

बायाचा पुनर्विवाह पुण्यास झाला. वर्तमानपत्रांत वधूचे वडील व वडीलबंधू यांच्या संमतीने पुनर्विवाह झाला असे छापले होते. हे प्रसिद्ध झाल्याबरोबर देवरुखास माहेरचे घर वाळीत पडले. न्हावी, धोबी बंद होऊन घरावर पूर्ण बहिष्कार पडला. आमच्या बाबांना मात्र या बहिष्कारामुळे मुळीच दु:ख झाले नाही. ते आमची अशी समजूत घालीत की, ''सर्व मुलींनी व मुलांनीही संसार म्हणून काय आहे याची सुखदु:खे अनुभविली आहेत. पण बाया संसारास पूर्णपणे आचवली होती. तिने पुनर्विवाह केला व तसे करण्यास आपण तिला परवानगी दिली यांत काही पाप घडले नाही. मला लोक खुशाल नावे ठेवोत.'' बहिष्कार एका वर्षापर्यंत चालला व आमचे फार हाल झाले. शेवटी गावातील तीन देवळांच्या जीर्णोद्धाराकरता म्हणून बाबांनी १०० रुपये दिले व त्यांनी ग्रामस्थांच्या पाया पडून त्यांची मर्जी सुप्रसन्न करून घेतली व घरावरील बहिष्कार उठविला.

✿ ✿

# शिक्षणाची तयारी

बायाचा पुनर्विवाह झाल्यावर दीड पावणेदोन वर्षांनी आमचे वडील व आई मला घेऊन काशीयात्रेस जावयास निघाली. वाटेत पुण्यात प्रो. कर्वे यांच्या घरी बाया व तिला झालेला नवीन मुलगा शंकर, जो सध्या आफ्रिकेत डॉक्टरचे काम करीत आहे, त्याला पाहण्याकरता आम्ही सर्व उतरलो. बायाचा पहिला मुलगा शंकर लहानपणी गुटगुटीत, अंगाने सुदृढ व सुस्वरूप होता. त्याला पाहून आमच्या वडलांना मोठा आनंद झाला. त्यांनी मुलाला मांडीवर घेतले व त्यांना त्यावेळी आनंदाश्रू आले. ते म्हणाले, ''रामाची लीला काय अगाध आहे पाहा. आज त्याच्या कृपेने आमच्या बायाला असे सुंदर पुत्ररत्न झाले. अशी सुंदर रत्ने, की जी पुढे देशाचा आधारस्तंभ होतील. ती विधवांच्या कुशीत दडवून ठेवली जातात. काय ही दुष्ट चाल. माझ्या पोरीचे रामाने फार चांगले केले.'' पुण्यास असताना बायाने आईबरोबर मला प्रो. कर्वे यांच्या जवळ शिकण्याकरिता ठेवण्याविषयी वादविवाद करण्याला सुरुवात केली. बाया म्हणे, ''कृष्णीला व तिच्या मुलाला मी तुमच्या बरोबर काशीस पाठवणार नाही, कारण यात्रेच्या ठिकाणी कॉलऱ्यासारखे रोग होतात. कधीकधी यात्रेकरू मरतात. मी कृष्णीला तिच्या मुलासाठी यात्रेला जाऊ देणार नाही, कारण आम्ही सर्व बहिणींत तिला एकटाच मुलगा आहे.'' आमची आई अतिशय जुन्या मताची होती. बायाने केलेला पुनर्विवाह तिला पसंत नव्हता. दुसरे तिला अशी भीती पडली की, एकीने पुनर्विवाह केला, दुसरीचही त्याच मार्गाला लागेल म्हणून आई म्हणे की, ''बाया तुझे उदाहरण कृष्णी गिरवील व आमचे कुळाला बट्टा येईल. म्हणून यात्रेच्या ठिकाणी ही कॉलऱ्याने मेली तरी बेहेत्तर आहे. आम्ही हिला घेऊन जाणार!'' असा वादविवाद एक दिवस रात्री १२ वाजेपर्यंत चालू होता, असे वादविवाद नेहमीच चालत. मला माझी इच्छा काय आहे, हे न विचारता या सर्व गोष्टी चालत असत व मला देखील माझी खरी इच्छा आईजवळ

बोलून दाखवता येत नसे. "आई म्हणे, "तू देवरुखला परत जा अथवा आमच्याबरोबर काशीस ये, तू जर बायाजवळ राहिलीस तर मी जीव देईन." ती बायाला सांगे की, "आम्ही निश्चितपणे काशीला जावे, अशी तुमची इच्छा असल्यास कृष्णीला देवरुखला पोहोचवा." शेवटी मला देवरुखला पोहोचती करण्याचे आईला कबूल करून, बायाने आईबाबांची रवानगी काशीला करून दिली. आई व बाबा गेल्यावर बाया मला म्हणू लागली की, तू मजजवळ राहून शाळेत जा. पण मी आईपाशी बायाजवळ राहाणार नाही म्हणून शपथ घेतली होती व याप्रमाणे बायाचे मन वळवून मी सोबत मुलाला घेऊन देवरुखला गेले.

आई, बाबा काशीहून परत आल्यावर त्यांनी मला देवरुखला पाहिले व त्यांना मोठा आनंद झाला. त्यावेळी नानाला ७ वे वर्ष लागले होते. मिरजेस माझे दीर असत, त्यांना मी बोलावले व त्यांनाच देवदेवक ठेवावयास सांगून मुलाची मुंज देवरुखला उरकून घेतली. माझे दीर मिरजेला राहत असत. त्यांना तेथे आठ रुपये दरमहाची नाकेकारकुनाची नोकरी होती. मलाही ५ वर्षे माहेरी राहून कंटाळा आला होता. मी दिराची परवानगी काढून त्यांच्या बरोबर मिरजेस जाण्याचे ठरवले व मिरजेस त्रिवर्ग मिळून यावयास निघालो. मिरजेस येण्याचा दुसरा एक असा हेतू होता की, तेथे मुलाच्या शिक्षणाची व्यवस्था चांगली होईल. तेथे गेल्यावर भातखंडे यांच्या घरी एक लहानशी खोली घेऊन गरिबीचे बिऱ्हाड थाटले व माझा मुलगा नाना तेथे शाळेत जाऊ लागला. दोन महिने झाल्यावर प्रो. कर्वे व बाया – त्यांचे त्यावेळी मिरजेस खाजगी काम असल्यामुळे – मिरजेस आली व मला त्यांनी मुलाचे शिक्षण नीट होईल या उद्देशाने पुण्यास येण्याचा आग्रह केला. मीही माझे आईप्रमाणे जुन्या मताची असल्यामुळे, एकदम सुधारकाचे घरी जाणे मलाही पूर्णपणे पसंत नव्हते. परंतु मुलाची विद्या होते या गोष्टीकरिता मी वाटेल त्या परिस्थितीत राहण्याचे ठरवले व मुलाला बायाबरोबर पाठवून मी एकटीच दिराच्या घरी मिरजेस राहिले.

पाच-सहा महिन्यांनी मुलास भेटण्याकरिता मी पुण्यास गेले. त्यावेळी प्रो. कर्वे यांच्या मनात अनाथ बालिकाश्रम ही संस्था काढण्याचे घोळत होते. एक दिवस हाक मारून त्यांनी ती सर्व कल्पना मला समजावून सांगितली. "विधवाश्रम निघाला तर तू त्यात काय काम करशील?" असे त्यांनी मला विचारले. यावेळी मला शिक्षणाची कल्पना मुळीच नव्हती व आश्रम शब्दाचा अर्थ काय हेही ठाऊक नव्हते. मी सांगितले की, "तुमचा आश्रम निघाला म्हणजे मी त्यांत स्वयंपाक करण्याचे काम घेईन. दुसरे काही मला करता येईल असे वाटत नाही." प्रो. कर्वे म्हणाले, "आश्रम निघावयास अजून अवकाश आहे. तोपर्यंत तू शिक्षकिणीचे सर्टिफिकेट मिळवावे. त्या कामास लागण्याकरिता उद्यापासून होम क्लासेसमध्ये जा."

होम म्हणजे काय व क्लास म्हणजे काय याची मला कल्पना नव्हती. त्या शब्दांचा मराठी अर्थ बायाने मला सांगितला व माझे वयाच्या २६ व्या वर्षी

पुण्यातील गवत्या मारुतीजवळ असलेल्या देवांच्या वाड्यांत होम क्लास भरत असे, त्यात जाण्यास सुरुवात केली.

या होम क्लासात श्रीमंतांच्या बायका बऱ्याच येत असत. मी कोकणातील एक सोवळी केलेली विधवा व माझा पोशाखही विशेष चांगला नसे. अशा स्थितीत होम क्लासातील मास्तरीणबाई श्रीमंत बायकांकडे जितके लक्ष देत असे, तसे माझ्याकडे ती किंवा इतर कोणीच देत नसे. अशा परिस्थितीला कंटाळून मी घरी राहू लागले व बायाला मी तुझ्या घरीच स्वयंपाकाचे काम करून माझ्या मुलाचे शिक्षण करीन असे सांगितले. पण मला घरात कोणतेही काम बाया सांगेना; व मला तिने मुकाट्याने बसण्याची शिक्षा दिली. मला अशा बसण्याचा कंटाळा आला व शेवटी बायाला माझी अशा बंदिवासातून सुटका कर असे सांगितले. बाया म्हणे की, "घरात तरी मुकाट्याने बस अथवा शिकावयास तरी जा. आम्ही तुला मिरजेहून घरकामाकरता आणले नाही. आम्हांला स्वयंपाकिणी वाटेल तितक्या मिळतील. तुला शिक्षकिणीचे काम करावयाचे असेल, तर चुलीजवळ बसण्यापेक्षा तुला तुझा वेळ शाळेतच काढला पाहिजे." अशा रितीने रिकामे बसण्याची झालेली शिक्षा मला आवडेना. याचवेळी कै. प्रो. आगरकर यांच्या बायकोला शिकवण्याकरता पुण्यातील होम क्लासातून एक शिक्षकीण पाठवण्यात येत असे. आगरकरीणबाई माझ्याप्रमाणेच निरक्षर होत्या. तेव्हा मी त्यांच्या घरी त्यांच्याबरोबर शिक्षण घेण्यास जाऊ लागले. तेथे माझे मुळाक्षरे, पहिले पुस्तक, १४ पाढे व १०० अंक, इतके शिक्षण झाले. नंतर माझे मलाच वाटू लागले की, शिकावे तर पुरते शिकावे, अर्धेमुर्धे शिकू नये. पण शाळेत गेले तर लोक हसतील. घरात राहावे तर बहीण घरात शिक्षा म्हणून रिकामी बसवून ठेवू लागली. अशा स्थितीत मला आपल्या मुलाचा भार बहिणीवर घालणे इष्ट वाटेना. अशा रितीने बरेच दिवस माझ्या मनात एक युद्ध चालले होते. शेवटी पुष्कळ विचारांती, पुण्यातील हुजूरबागेत नाव घालावयाचे ठरविले व पहिल्या प्रथम तेथील बोर्डिंगातच जाऊन राहणे मी पसंत केले. मी आपला बेत प्रो. कर्वे यांचे कानावर घातला, तो त्यांना फारच पसंत पडला असे दिसले. त्यावेळी माझ्यासारख्या सोवळ्या झालेल्या बायका शाळेत जात नसत. सर्व ठरलें खरे, पण मलाच माझा निश्चय कसा पार पाडता येईल याविषयी काळजी उत्पन्न झाली. १४ पाढे, १०० अंक, कर, मर, रथ, एवढेच वाचन, मोडीची ओळख नाही, वय २६ वर्षांचे, मुलगा ७ वर्षांचा, माझे शिक्षण संपणार कसे, मी मास्तरीण होणार केव्हा व माझ्या मुलाचे शिक्षण मला कसे चालविता येणार, या काळज्या माझ्या डोळ्यांपुढे दत्त म्हणून उभ्या राहिल्या. शेवटी बायाने धीर देऊन मला हुजूरपागेत नेऊन घातले. त्यावेळी तेथे दुसऱ्या इयत्तेवर गोगटे नावाचे मास्तर होते. त्यांचेपुढे मला नेऊन उभे केले व त्यांना वर्गात घेण्याविषयी विनंती केली. मास्तर म्हणाले की, "या बाईंना पहिलीचा अभ्यास नीटपणे येत नाही, तर त्यांना दुसरीत कसं घेता

येणार?'' वर्गातील मुलीही कुतूहलाने मजकडे पाहू लागल्या. त्यावेळी माझी स्थिती काय झाली असेल, याची कल्पना सध्याच्या शिकणाऱ्या मुलींना करता येणार नाही. शेवटी बायाने मजकरिता बरीच वकिली करून माझे नाव दुसरीच्या वर्गात घातले.

शाळेची वार्षिक परीक्षा जवळ आलेली होती. माझ्या वर्गात ८/१० वर्षांच्या कुमारिका मुली बऱ्याच होत्या. गोडीगुलाबीने मी माझ्या वर्गभगिनींकडून पाढे व जोडाक्षरे यांची माहिती करून घेतली. दुसरीत एकंदर ६० मुली होत्या व त्यात मी एक सोवळी झालेली बाई असा त्यावेळचा देखावा होता. अशा अडचणीत बरेच परिश्रम करून दुसरीत पास झाले. अशा रितीने माझे शिक्षण पुढे चांगल्या प्रकारे सुरू झाले व प्रत्येक वर्गात पास होत शेवटी मला ट्रेनिंगची स्कॉलरशीप मिळून मी तिसऱ्या वर्षात पास झाले व पहिल्या प्रतीचे सर्टिफिकेट मिळविले. तेव्हा प्रो. कर्वे यांना जो आनंद झाला व बायाला जी धन्यता वाटली, त्याचे वर्णन करणे शक्य नाही.

इकडे माझे शिक्षण चालले असता प्रो. कर्वे यांचा विधवाश्रम काढण्याचा विचार मूर्त स्वरूपात आला होता. संस्था हिंगणे येथे सुरू होऊन त्यात मुलींची संख्या १८ झाली होती. माझी परीक्षा केव्हा पास होते व मी हिंगण्यास कामास केव्हा येते याची मार्गप्रतीक्षा प्रो. कर्वे करीत होते व माझी परीक्षा पास झाल्यावर मला सरकारच्या बाँडमधून मुक्त करून घेण्यात आले. या कामी प्रो. कर्वे यांना प्रो. सेल्बी व त्या वेळच्या शिक्षणखात्याचे अधिकारी यांची बरीच मदत झाली, असे मी ऐकले. सरकारी नोकरी ३ वर्षेदेखील करावी न लागता व दुसरा कोणताच दंड न भरता मला आश्रमात काम करण्याची सरकारी अधिकाऱ्यांनी परवानगी दिली. ट्रेनिंग कॉलेजचा अभ्यासक्रम पुरा करीत असताना मी पुष्कळ वेळा शनिवारी सुट्टीचे दिवस घालविण्याकरिता हिंगण्यात जाऊन राहत असे. प्रो. कर्वे (त्यांना आम्ही अण्णा म्हणतो) यांच्याबरोबर हिंगण्यास चालत जाण्याचा प्रसंग येत असे. हिंगण्याची वाट नीट नसल्यामुळे पाटाने बरेच दूर शेतांमधून चालत जावे लागे. त्या वेळी अण्णा माझ्या बरोबर बोलण्यात वेळ खर्च करीत. त्यावेळी हिंदुस्थानातील विधवांची स्थिती व ती सुधारण्याकरिता काय केले पाहिजे या विषयावर बोलणी निघत व मला अण्णांनी विचार करून ठरवलेली त्यांची मते ऐकावयास सापडत. अशा रितीने अण्णांबरोबर मला जे अनेक संभाषण करण्याचे प्रसंग येत असत, त्यामुळे मला मोठे शिक्षण मिळून माझ्या मनाची तयारी आश्रमाच्या कामकरिता करण्यात आली. मी जो पुढे आश्रमाचे आजन्म सेवक होण्याचा निश्चय ठरविला, त्याचे सगळे श्रेय गुरुवर्य अण्णा यांच्याबरोबर केलेल्या संभाषणांनाच दिले पाहिजे, असे मला वाटते.

✿ ✿

# माझे मतांतर

देवरुखहून पुण्यास येऊन आश्रमात काम करण्यास सुरुवात करीपर्यंत माझ्या मनात अनेक फरक होत होते. कोकणात असताना मला शिक्षणाचीदेखील कल्पना नव्हती. मग देशसेवेची कल्पना काय असणार? अनेक विधवांप्रमाणे मीही नशिबाला दोष देऊन माझे सर्व आयुष्य देवरुखासच राहून काढले असते व माझा वेळ इतर अनेक विधवांप्रमाणे देवधर्मात व तीर्थयात्रेत घालविला असता; पण बायाच्या पुनर्विवाहामुळे मला पुण्यास शिक्षणाकरता राहण्याची संधी प्राप्त झाली. शिक्षण मिळाल्यामुळे हिंदुस्थानात देश म्हणजे काय, राष्ट्र म्हणजे काय व आपण राष्ट्रोद्धार करण्याकरता काय केले पाहिजे, हे प्रश्न माझ्या मनात घोळू लागले.

या प्रश्नांचा विचार करीत असता साहजिकच विधवांची स्थिती किती वाईट आहे व ती सुधारण्यांकरिता काय केले पाहिजे, त्यासंबंधी विचार मी करू लागले. विधवांसंबंधी माझे विचार पार बदलून जाऊन विधवांचे कर्तव्य कोणते, त्यांनी धार्मिकदृष्ट्या आपली राहणी कशी ठेविली पाहिजे, हे माझ्या मनात घोळू लागले. या प्रश्नविषयी मी विचार करीत असता विधवांच्या केशवपनाच्या प्रश्नाने माझे लक्ष वेधून घेतले.

देवरुखास असताना केशवपन हा एक धार्मिक आचार आहे, तो चालू ठेवणे एक धार्मिक कर्तव्य आहे, असे मला वाटत असे. हिंगण्यास काम करू लागल्यावर देखील संस्थेतील सोवळ्या झालेल्या एका विधवेने जेव्हा आपले वेषांतर घडवून आणले, तेव्हा मला तिने मोठे पाप केले असे वाटले. पण या गोष्टीचा जेव्हा मी अधिक विचार केला, तेव्हा या केशवपनासंबंधी सक्ती हा एक मोठा अधार्मिक भाग आहे व स्वखुशीने संन्यास-दीक्षा म्हणून कोणी केशवपन करणे हे मला धार्मिक वाटू लागले. केशवपनाच्या सक्तीचा निषेध करून या बाबतीत विधवांनी सत्याग्रह केल्याखेरीज हा प्रश्न सुटणार नाही, ही गोष्ट माझ्या हळूहळू प्रत्ययास येऊ लागली. हे माझे मतांतर हळूहळू होत होते. नवीन मूल जन्मास आले म्हणजे नवीन

अनुभवामुळे जसे त्याचे ज्ञानक्षेत्र वाढत जाते, त्याप्रमाणे माझादेखील शिक्षणामुळे नवीन जन्म झाला व त्या जन्मामुळे माझे ज्ञानक्षेत्र वाढून माझी मतांतरे फार झपाट्याने होत चालली. ही मतांतरे होत असताना माझी सर्व मते सुधारकाप्रमाणे पार बदलली नाहीत. कित्येक बाबतीत मला आपली जुनी राहणी व जुनी परंपरा योग्य वाटे. माझी सामाजिक प्रश्नासंबंधी मते जी मी पुढील एका प्रकरणात देणार आहे. त्यावरून मला जुन्या पुष्कळ चालीरीती व वहिवाटी संग्रहणीय वाटत आहेत, ही गोष्ट वाचकांच्या लक्षात येईल.

अण्णांचे उदाहरण नेहमी पुढे असल्याने, माझ्या मतांना एक विशिष्ट वळण मिळाले व केवळ व्यक्तिस्वातंत्र्य व समता या सुधारकांच्या तत्त्वांचा माझ्या मनावर विशेष परिणाम झाला नाही. माझ्या मातृभूमीची सेवा माझ्याकडून व्हावी असे मला वाटू लागले. पण ही सेवा करावयाची ती मातृभूमीच्या कन्या ज्या अकाली विधवा होत आहेत, त्यांच्या आयुष्यांत आशेचे किरण उत्पन्न करून सेवा करावी, असे मी ठरविले व विधवांच्या उन्नतीच्या द्वारे मातृभूमीची उन्नती घडवून आणण्याचा मी निश्चय ठरविला.

अण्णांच्या बरोबर अनेक वेळा हिंगण्याच्या मार्गाने बोलत जाण्याची संधी मिळाल्याने, वरील प्रकारचे माझे विचार कायम झाले. माझ्यावर मुलाची जबाबदारी पडलेली व मी इतरांच्या जबाबदाऱ्या कशा पार पाडणार असे मला कित्येक वेळा वाटत असे, पण मी या बाबतीत स्वार्थ साधून परमार्थ साध्य करण्याचे ठरविले. बायाचा पुनर्विवाह झाला त्या वेळी वडलांप्रमाणे मलादेखील त्याविषयी आनंद झाला. कित्येक लोकांना मी आता पुढे काय करणार असा जेव्हा प्रश्न पडला तेव्हा मला मोठे नवल वाटले. अण्णांच्या घरी राहून मी बहुतेक बहिणीचा कित्ता लवकरच गिरविणार, असे लोक म्हणत असत. पण या बाबतीत माझे कोणचेच मतांतर न होता अण्णांच्या ध्येयांचा व त्यांच्या साध्या राहणीचा माझ्या मनावर अगदी निराळाच परिणाम होऊन, एका कुटुंबाच्या उपयोगी पडण्यापेक्षा माझे सर्व आयुष्य विधवांच्या सेवेतच घालवावे असे मी ठरवले. एकदा ही गोष्ट निश्चित केल्यावर मी त्या मार्गाला लागले. ज्या विधवांना एक-दोन मुले आहेत व ज्यांना थोडे तरी संसारसुख अनुभवावयास मिळाले आहे त्यांना कोणतेही मोठे कार्य करणे शक्य असल्यास, त्यांची पुन्हा संसारात पडण्याची प्रवृत्ती होणार नाही, असे मला वाटते. त्याप्रमाणे मी आपल्या आयुष्याचे ध्येय निश्चित केले.

शिक्षणामुळे माझ्या मनाची जागृती झाली. माझे पुढील ध्येय मी ठरविले व त्यानंतर ध्येयाची अंमलबजावणी लवकर व्हावी म्हणून अनाथ बालिकाश्रमाची आजन्म सेविका व्हावयाचे ठरविले आणि अण्णांच्या कार्यात त्यांना साहाय्य करण्याकरिता हिंगण्यास जाऊन प्रत्यक्ष कार्यास आरंभ केला.

✿ ✿

# आश्रमाच्या कामास आरंभ

ज्या आश्रमात मी स्वयंपाकिणीचे काम करावयास तयार झाले होते, त्याच आश्रमाची मी आजन्म सेविका होऊन पुढे मोठे काम करीन, असे जर मला कुणी सांगितले असते; तर त्याच्यावर मी कधी विश्वास ठेवला नसता. पण आयुष्यात कित्येक वेळा मोठ्या अभूतपूर्व गोष्टी होत असतात.

१९०२ सालचा आश्रम व सध्याचा आश्रम यामध्ये फार फरक आहे. त्यावेळी आश्रमाच्या माळावर तुरकाठ्यांचे छप्पर असलेली एकच झोपडी होती. त्या झोपडीत तीन खोल्या पाडल्या होत्या. एक खोली स्वयंपाकाकरिता, एक शिकण्याकरिता व एक निजण्याकरिता अशी त्या वेळची झोपडीतील व्यवस्था होती. निजावयाच्या खोलीतच सामान वगैरे ठेवून त्यावर प्रो. कर्वे यांचे अंथरूण घालावयास जागा केली होती. पाणी कालव्याचे आणावे लागत असे. मी जेव्हा आश्रमात गेले तेव्हा आश्रमात १८ मुली होत्या. एक मास्तर व अण्णा मुलींना शिकवीत असत. बाया गावात राहत असे. पहिल्या प्रथम एका वर्षापर्यंत गड्याच्या कामापासून तो लेडी सुपरिटेंडेंटच्या कामापर्यंत सर्व कामे आळीपाळीने करण्याचा मला अनुभव मिळालेला होता. १९०५-०६ साली जेवणाकरिता अर्धा सोपा बांधला गेला. यानंतर श्रीमती काशीबाई देवधर, श्रीमती वेणूबाई नामजोशी, श्रीमती बनूबाई देशपांडे या स्त्रिया आजन्म सेविका म्हणून संस्थेस येऊन मिळाल्या आणि माझ्यावर पडणारा कामाचा बोजा कमी झाला व आश्रमाची निरनिराळी कामे वाढल्यामुळे मला पुढे वर्गणी मिळवण्याचे काम देण्यात आले. हे काम मजकडे येईल व ते मला करावे लागेल याची मला पहिल्या प्रथम कल्पनाही नव्हती. पण एके दिवशी प्रो. कर्वे पुण्याहून छकड्यातून येत असता हिंगण्याची सडक त्या वेळी नीट केलेली नसल्यामुळे छकडा उलटला व प्रो. कर्वे त्यातून पडले व त्यांना बरीच दुखापत झाली. अण्णांना उचलून आश्रमात आणावे लागले व तेथे त्यांना औषधपाणी सुरू करण्यात आले.

अण्णा ज्या खोलीत निजले होते त्या खोलीत जाऊन मी त्यांची विचारपूस करण्याकरिता त्यांच्या जवळ जाऊन बसले. त्यावेळी माझ्या मनात असा विचार आला की, अशाच रितीने पुढे एकादे वेळी अपघात होऊन अण्णांच्या जिवास बरेवाईट झाले, तर संस्थेला वैधव्य येईल व तसा प्रसंग आला, तर आम्हां सर्वांची कोण काळजी घेणार? वर्गणीचे काम अण्णाच करीत असत व त्यामुळे त्यांना अनेक ठिकाणी प्रवासाची दगदग करावी लागत असे. या कार्यात त्यांचा त्रास कमी करता आल्यास पाहावे असे विचार माझ्या मनात येऊ लागले. ते एप्रिल महिन्याचे दिवस होते व आजारांतून बरे झाल्यावर अण्णांना लगेच वर्गणीकरिता फिरतीवर जावे लागणार होते. अशा वेळी आपण काम करून दाखवावे असे मला वाटू लागले. सुट्टीत घरी जाणाऱ्या एका मुलीला खांडव्याच्या रेल्वेचा पास मिळाला होता. त्या पासांत एक नोकर तिच्याबरोबर खांडव्यापर्यंत जाऊ शकला असता. याचा फायदा घेण्याचे मी ठरविले व पहिल्या प्रथम मला वर्गणी मिळविता येईलच, असा अनुभव नसल्याने संस्थेला तरी माझ्याकरिता विनाकारण प्रवासखर्च पडू नये, म्हणून मी खांडव्यास जाणाऱ्या आश्रमांतील मुलीला मला तिच्या बरोबर 'सर्व्हंट' म्हणून घेऊन जाण्याची विनंती केली. या वेळी अण्णा दुखण्यातून बरे होऊन वर्गणीला जाण्याच्या तयारीत आहेत असे मला कळले. लगेच अण्णांना मी आपला बेत निवेदन केला. माझी कल्पना पसंत पडल्याने लगेच त्यांनी मला परवानगी दिली व मीही मोठ्या उत्साहाने जावयाचे ठरवले. पण त्याच दिवशी माझ्या नानाला ताप भरला व तो १०४ डिग्रीपर्यंत वाढला. रात्री मुलगा तापात बडबडू लागला. सकाळी गाडीने निघाले पाहिजे, असे मला मोठे संकट पडले. अशा स्थितीत वर्गणीचे काम करावयास जाऊ का? असे मी अण्णांना विचारले. तू गेलीस तर तुझ्या मुलाला वेणूबाई, काशीबाई, तुझ्याप्रमाणेच करतील असे अण्णांनी मला सांगितले. पुढे विशेष विचार न करता वेणूबाई, काशीबाई यांच्या स्वाधीन मुलाला करून मी सर्व्हंट पास घेऊन, खांडव्यास रवाना झाले. अशा प्रकारचे प्रसंग आश्रमाचे काम करताना जेव्हा जेव्हा आले तेव्हा तेव्हा स्वत:च्या मुलाप्रमाणे नानाची काळजी घेण्यास माझ्या सहकारी सेविका नेहमी तयार असत. तेथे गेल्यावर तेथील पुढारी मंडळींना भेटून "एक सभा बोलवा, मी त्या ठिकाणी संस्थेची हकीगत सांगून वर्गणी मिळवायचे काम करीन," असे सांगितले. पण माझे म्हणणे कोणीच लक्षात घेईनात. "सभेमध्ये तुम्ही का लेक्चर देणार आहा?" अशी माझी कित्येकांनी थट्टा केली. मी सोवळी झालेली असल्याने माझे लेक्चर कसे ऐकावयाचे, अशी शंका कित्येकांच्या मनात उत्पन्न झालेली आहे, असे मला समजले. शेवटी खांडव्याला एक इनामदार आहेत त्यांना मी भेटावयास गेले. त्यांनी माझे म्हणणे ऐकून घेऊन मला सांगितले की, आमचे घरी दररोज रात्री पानसुपारी खावयास व गप्पा मारावयास काही मित्रमंडळी जमतात. त्यावेळी तुम्ही येऊन लेक्चर द्या, म्हणजे तुमचे काम होईल. मी त्यांचे

म्हणणे कबूल केले व ठरलेल्या वेळी त्यांच्याकडे गेले. मंडळी गप्पा मारीत बसली होती. गप्पा मारणारी माणसे १०-१२च असतील. इनामदार यांनी मला आपले भाषण सुरू करावयास सांगितले. मी भाषण सुरूही केले. आता तरी सर्व मंडळी आपल्या बैठकीचा मोर्चा मजकडे वळवतील असे मला वाटले, पण त्यांनी आपले बैठक मुळीच फिरवली नाही व मीही माझे भाषण पुरे होईपर्यंत संपवले नाही. भाषण संपल्यावर वर्गणीची यादी त्यांच्यापुढे ठेवली व त्यावर त्यांनी १३ रुपयांचे आकडे घातले. त्यांच्याकडून एवढी तरी मदत मिळेल अशी मला मुळीच अपेक्षा नसल्यामुळे तेरा रुपये मला एकशेतीस रुपयांप्रमाणे वाटू लागले. खांडव्याहून पत्र घेऊन मी इंदूर येथे एक मोठे सरदार होते त्यांच्याकडे गेले. संस्थानिक बेताप्रमाणे त्यांनी मला आज यांच्या घरी जा, उद्या त्यांचे घरी जा, म्हणजे तुमचे काम चांगले होईल असे सांगितले. त्याप्रमाणे मी निरनिराळ्या मंडळींकडे गेलेही. पण सभा करण्याचे कोणीच पत्करीना व माझ्या कामासही सुरुवात होईना. शेवटी बराच विचार करून इंदूर कॉलेजात अभ्यास करणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांकडे मदत मागावयास जावे असे ठरविले. तेथे श्री. गरुड* व श्री. देव या नावांच्या विद्यार्थ्यांनी बरीच खटपट करून तेथील प्रार्थना समाजात माझे व्याख्यान ठरवले. माझे व्याख्यान त्या ठिकाणी झाले व विद्यार्थ्यांनी बरीच मेहनत घेऊन आश्रमाकरिता १०० रुपये वर्गणी जमविली. इंदूर येथील झालेल्या कामामुळे उमेद येऊन मी इंदूरचे पत्र घेऊन देवास येथे गेले. तेथे दिवाणसाहेबांस जाऊन भेटले व एका प्रोफेसरांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले. व्याख्यानास बरीच मंडळी आली होती. भाषण झाल्यावर ४०० रुपये वर्गणी मिळाली. अशा रीतीने सर्व्हंट पासावर इतक्या लांब एकटे जाऊन मी पुण्यास पहिल्या खेपेस जेव्हा ५०० रुपये वर्गणी घेऊन आले, तेव्हा अण्णांना अत्यानंद झाला. तेव्हापासून त्यांनी आश्रमाच्या प्रचारकाचे काम मजकडे दिले. हे काम मजकडे येईल अशी कल्पना नसताही एका अकल्पिक योगायोगाने हे काम मजकडे आले.

१९०४ साली बेळगावला मला अशाच तऱ्हेचा अनुभव आला. तेथे एका सुप्रसिद्ध वकिलांकडे मी गेले व त्यांना एक सभा बोलवण्याबद्दल विनंती केली. त्यांनी विचारले, "सभेत बोलणार कोण?" "मीच" असे उत्तर ऐकल्यामुळे त्यांना जरा आश्चर्य वाटले. "तुम्ही सांगाल तिथे येऊन मी बोलायला तयार आहे." असे मी त्यांना सांगितले. तेव्हा त्यांनी क्लबांत येण्यास सांगितले. मी माझ्या नेहमीच्या

---

* हे अनाथ बालिकाश्रम संस्थेत काही वर्षे आजन्म सेवक म्हणून काम करीत असत. हिंगणे येथील हवा त्यांच्या पत्नीस न मानवल्याने त्यांनी सेवासदनात नोकरी पत्करली. ते सध्या सेवासदन संस्थेचे आजन्म सेवक असून जनरल सेक्रेटरी या नात्याने तेथील व्यवस्था पाहत आहेत.

वेषात धाबळी पांघरून क्लबात गेले. सगळ्या मंडळींचे आपापले खेळ वगैरे व्यवसाय चालूच होते. सभेची मांडणी काहीच नव्हती व व्याख्यानाला अध्यक्षही कोणी नव्हता. वकीलसाहेबांनी मला बोलायला सांगितले. मी सुरुवात केली व कोणी लक्ष देत आहे किंवा नाही हे न पाहता मला जे सांगावयाचे होते ते सांगितले. मला जरा चमत्कारिक झाले, पण नंतर वर्गणीची वही फिरविली तीत रु. ४०० जमा झाले. नंतर गावातही आणखी रु. २०० जमले.

असे नाना तऱ्हेचे कितीतरी अनुभव वर्गणी मिळवीत असताना गेल्या २५ वर्षांत मला आलेले आहेत. माझ्या प्रयत्नांना यश येऊन जसजशी वर्गणी जमा होऊ लागली, तसतसा माझा पाय आश्रमात राहीनासा झाला.

✿ ✿

# वर्गणी मिळविण्याचे काही अनुभव

१९०४ सालापासून ते आजतागायत मी आश्रमाकरिता वर्गणी मिळविण्याचे काम करीत आहे. अमेरिकेतील ३ वर्षांचा प्रवास, इंग्रजी शिकण्याकरिता घेतलेली ३ वर्षांची रजा, मुंबईच्या कन्याशाळेवर लेडी सुपरवायझर म्हणून केलेले एक वर्षाचे काम, अशी ७ वर्षे वजा जाता अजमासे २५ वर्षे आश्रमाकरता वर्गणी मिळविण्याच्या कामात मी घालवली आहेत. उत्तरेकडील लाहोर, जालंदर, दिल्ली, आग्रा, लखनौ व कानपूरपर्यंत; दक्षिणेकडे राणीबेन्नूर, मंगळूर, रामेश्वरपर्यंत; पूर्वेकडे त्रिवेंद्रम, मच्छलीपट्टण, कोचीन, कालीकत; व पश्चिमेकडे अहमदाबाद, नडियाद, धोलका, धंधुका, भावनगर असा माझा हिंदुस्थानचा प्रवास आतापर्यंत झालेला आहे. दरवर्षी वर्गणी सुमारे ३०००/४००० पर्यंत जमवली आहे व आतापर्यंतची मी आश्रमाकरिता जमवलेली वर्गणी कमीत कमी पाऊण लाख झालेली असावी, असा माझा अजमास आहे.

विधवांची दु:खद स्थिती समाजापुढे मांडण्याकरिता मी अनेक व्याख्याने आतापर्यंत दिलेली आहेत. या व्याख्यानांच्या शेवटी मी आश्रमाची हकीकत सांगून आश्रमाकरिता वर्गणी देण्याविषयी याचना करीत असे. ज्या भागात मराठी भाषा बोलत नाहीत तेथे काम करण्याचा प्रसंग आला, म्हणजे एखादा दुभाषा मिळवून त्याच्या द्वारे काम करीत असे. व्याख्याने कित्येक वेळा शाळा व कॉलेजातील विद्यार्थ्यांपुढे, प्राथमिक शाळांतील मुलामुलींपुढे व केवळ खास स्त्रीवर्गापुढे द्यावी लागत. अशा वेळी मुलांना उपयुक्त होतील असे विषय घेऊन माझा बोलण्याचा परिपाठ असे. स्त्रियांकरता 'वातीज्योति', 'नेमधर्म', 'स्त्रियांची कर्तव्ये' असे विषय मी घेत असे व व्याख्यानाच्या शेवटी आश्रमाची माहिती सांगून, वर्गणीची मागणी करत असे.

वर्गणीचे काम करीत असताना प्रवासात मला पुष्कळ अडचणी आल्या व त्यामुळेच माझ्या अंगी समाधीटपणा हळूहळू येत चालला. मी व्याख्याने देईन, असे

कोणी माझ्या लहानपणी भविष्य केले असते, तर ते मला खरेदेखील वाटले नसते. केवळ सवयीने मी ही कला अवगत करून घेतली. मी मोठी वक्ती अगर विदुषी नसताही मला व्याख्यानाद्वारे विधवांच्या संबंधी लोकजागृतीचे काम बरेच करता आले. १९०४ साली भरलेल्या, मुंबई येथील 'सोशल कॉन्फरन्स'मध्ये मला एका ठरावावर भाषण करावयास सांगितले. त्या वेळी परिषदेचे अध्यक्ष कै. न्या. चंदावरकर होते. माझ्या भाषणाचा त्यावेळी वर्तमानपत्रांतील दिलेला तर्जुमा पुढे परिशिष्टात दिला आहे. तो वाचकांनी अवश्य वाचावा. या भाषणांत बायकांनी फॅशन्सचे अनुकरण करण्याच्या भरात पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करू नये व गरीब स्त्रियांनी आपला पोशाख अगदी साधा ठेवावा व छचोर तऱ्हेचा आपला पोशाख न दिसेल अशाबद्दल काळजी घ्यावी, अशा आशयाचे विचार होते. हे माझे भाषण कॉन्फरन्समधील एकंदर समाजाला फार आवडले असे दिसले. बोलक्या सुधारकांना मात्र ते भाषण झोंबले. माझे भाषण चालू असताना सभेस असलेल्या तरुण मुलांचा उत्साह इतका वाढला की, त्यांनी आपल्या टोप्या काढल्या व सभेतच आश्रमाकरिता वर्गणी मिळविण्याचे काम सुरू केले व त्यावेळी त्यांनी बरीच वर्गणी जमाही केली, असे मला मागाहून समजले. व्याख्यानाच्या वेळी परिषदेचे अध्यक्ष चंदावरकर मजवर फारच रागावलेले दिसले. परिषदेनंतर मी दुसरे दिवशी पुण्यात येऊन जमखिंडीला वर्गणीकरिता निघून गेले. त्यानंतर काही प्रतिष्ठित बायकांचे डेप्युटेशन मला आश्रमाच्या कामावरून दूर करण्याविषयी अण्णांना सल्ला देण्याकरिता आले होते, असे मला समजले. "मी यासबंधी विचार करतो." असे म्हणून अण्णांनी या डेप्युटेशनला परत पाठवले. यासंबंधी पुढे काही दिवस कित्येक सुधारकांचा अण्णांशी पत्रव्यवहार सुरू होता. खरे पाहिले असताना इतर सुधारकांप्रमाणे मीही काही बाबतीत सुधारकच होते व आहे. देवरुख सोडून आश्रमाची आजन्म सेविका झाले, ही केवढी मोठी सुधारणा माझ्या आयुष्यात घडवून आणली आहे. सुधारकांसंबंधी लोकांमध्ये गैरसमज उत्पन्न होऊ देण्यास सुधारकांनी कोणत्याही कारणाने जागा देऊ नये एवढाच माझा त्यांच्यावर टीका करण्याचा हेतू होता व अजूनही माझे तसेच मत आहे. 'सोशल कॉन्फरन्स'मध्ये केलेल्या भाषणाचा परिणाम माझ्या वर्गणीच्या कामावर मात्र फार चांगला झाला, असे मला आढळून आले. 'सामाजिक परिषदेमध्ये भाषण केलेली बाई' अशा नवीन नावाने लोक मला ओळखू लागले.

✿ ✿

# प्रवासातील अडचणी

जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी मी फिरत असे. या वेळी सहज शिकलेल्या स्त्रियासंबंधी लोकमत काय असते याचा अनुभव मला घ्यावयास सापडला. प्रतिष्ठित लोकांनादेखील एखादी मास्तरीण अथवा नर्स अशा बाईला घरी उतरू देणे व तिला काही दिवस घरात ठेवणे हे मोठ्या धोक्याचे वाटत असे. वर्गणीचे काम करीत असता मला धारवाडजवळ असणाऱ्या एका मोठ्या शहरी मुनसफाच्या घरी जाऊन उतरण्याचा प्रसंग आला. मुनसफ व त्यांच्या पत्नी यांच्या मास्तरीण व नर्स यांच्याविषयी वरीलप्रमाणे कल्पना आहेत, असे मला आढळून आले. मास्तरणीला पोशाखी काम हवे असते, त्यांना हलकी कामे करण्याचा कंटाळा असतो, फॅशनची आवड असते, घरात बायकांशी बोलून त्या कलागती लावतात, असे मास्तरणीसंबंधी त्यांचे समज आहेत, असे मला आढळून आले. मी ज्या दिवशी त्यांच्याकडे उतरावयास गेले त्यावेळी रात्रीची वेळ असल्याने त्यांनी मला आपले घरीच उतरून घेतले. पण दुसऱ्या दिवसापासून त्यांच्या शेजारी एक दुसरे घर रिकामे करून त्यात माझी स्वतंत्र राहण्याची व्यवस्था झाली व मला एखाद्या राणीप्रमाणे वागविण्यास सुरुवात झाली. मला कोणतेही काम पडू देत नसत. परंतु याचा मला कंटाळा आला व मुनसफीणबाईंना त्यांनी मला बहिणीप्रमाणे वागवावे व मी त्यांच्या घरात वाटेल ते काम करावयास तयार आहे, हे मी त्यांना घरातील निरनिराळी हलकी कामे करून दाखविले. हे पाहिल्यावर मुनसफ म्हणाले, "तुम्ही तुमच्या परीक्षेत पास झाला व तुम्ही व इतर शाळामास्तरणी यांत खरोखरीच फरक आहे असे दिसते. त्यांच्या परीक्षेत पास झाल्यावर मी घरातल्या माणसाप्रमाणे अनेक वेळा त्यांच्या घरी जाऊन राहिले आहे; व त्यांनी मला वर्गणी मिळविण्याच्या कामी अनेक तऱ्हेची मदत केली आहे.

कोणत्याही गावी गेले म्हणजे सभा भरविण्यास मोठ्या अडचणी पडत. सोवळी

केलेल्या बाईचे व्याख्यान ऐकणे हा एक मोठा कमीपणाच लोक समजत. एका गावाहून दुसरे गावी गेले म्हणजे शिफारसपत्रे घेऊन जाण्याची माझी पद्धत होती. पण एकदा अशी शिफारसपत्रे मला मिळाली नाहीत व अशा अनोळखी गावात एकही मनुष्य ओळखीचा नसताना वर्गणी मिळविण्यास जाण्याचा प्रसंग आला. 37T^.
गावात प्रत्येकाचे घरी जाऊन ओळख करून घेणे, माझ्यासारख्या बाईला अवघड गोष्ट वाटली. बरे, एखाद्या परकी व अनोळखी माणसाशी परिचय करून त्याच्या द्वारे ओळखी करून घेण्याचा प्रयत्न करणेही मला गैरशिस्त वाटले. चांगल्या घरंदाज मंडळींची घरे तरी मला कशी कळणार? शेवटी बराच विचार करून मी घरे शोधून काढण्याची युक्ती योजली. ती अशी, गावातील पोस्टमास्तर मुसलमान सद्‌गृहस्थ होते. त्यांचेकडे जाऊन गावातील प्रतिष्ठित मंडळींचे पत्त मी मिळविले व पोस्टमनने डिलिव्हरीवर जाताना मला त्यांची घरे दाखवून द्यावी, अशी त्यांनाच विनंती केली. त्यांनी मला मोठ्या आनंदाने तशी मदत केली. अशा रितीने फिरत असताना आश्रमाची सहानुभूती बाळगणारे एक गृहस्थ मला भेटले. त्यांनी सभा भरविण्याचे कबूल केले. शेवटी त्या गावी सभा होऊन बरीच वर्गणी जमा झाली.

क्षेत्राच्या ठिकाण विधवांची स्थिती कशी असते, हे माझ्या प्रवासात मी निरनिराळ्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहिले. यासाठी मुद्दाम मी गोकर्ण, महाबळेश्वर व उडुपी या ठिकाणी गेले. तेथे वर्गणीचे काम करून बाकीचा राहिलेला वेळ विधवांच्या स्थितीचे अवलोकन करण्यात घालविला. पुणे, मुंबई येथील लोकांस असे वाटते की, मुलींच्या शाळा निघाल्यामुळे आता विधवांची स्थिती सुधारली आहे. पण तशी वस्तुस्थिती नाही. या शाळा फक्त शहरांतूनच दिसतात, पण इतर सर्व ठिकाणी अज्ञान दिसून येते आहे. उडुपी येथे मध्वस्वामींच्या मठांत विधवा आपला वेळ सकाळपासून सायंकाळपर्यंत घालवितात. या गावी विधवांचे वपन अगदी लहानपणापासून करतात, विधवांना रात्रीचे भोजन करण्याची परवानगी नाही, अंगावर वस्त्रही पुरते अंग भरून नसते. तिकडील विधवा आपली वपन केलेली डोकी संन्याशाप्रमाणे उघडी टाकतात व मग फिरतात. या विधवांनी धार्मिक संप्रदायांत शिरून आपले आयुष्य घालवावे व आपली उन्नती घडवून आणावी, अशी तेथील लोकांची अपेक्षा असते; पण खरोखरी त्यांची उन्नती किती होते हा प्रश्न आहे. तेथील श्रीकृष्णाच्या देवळात रात्रीच्या आरतीला विधवांनी जमावे असे प्रघात आहे. आरती झाल्यावर तेथे प्रसाद म्हणून फराळाकरिता ओंजळ ओंजळ खडीसाखर, लाह्या वगैरे त्यांना देण्यात येतात. हा प्रसाद घेऊन क्षेत्रांतील ओवऱ्यातच त्या खात बसतात व तेथेच बहुतेक त्या निजतात. रात्रीच्या वेळी संन्यासीही देवळात वस्तीला असतात.

विधवांची देवळात निजण्याची निराळी व्यवस्था करावयास हवी. ती तशी केलेली नसते. मलबार वगैरे ठिकाणी तर देवळांतून अन्नछत्रे चालू असतात व त्या ठिकाणी विधवा स्त्रिया व पुरुष लांबून येत असतात. हे लोक अन्नछत्रात फुकटचे

जेवून बाकी वेळी निरुद्योगी असतात. 'रिकामे मन हा पिशाच्चांचा कारखाना होय.' (Empty mind is the devil's workshop) या इंग्रजी म्हणीप्रमाणे त्यांच्या मनाची स्थिती होते. क्षेत्रांतून देवधर्म करीत हिंडणाऱ्या विधवा स्त्रियांची स्थिती फार अनुकंपनीय आहे. त्यांना 'धड ना प्रपंच ना परमार्थ' अशी स्थिती आहे. आफ्रिकेतील हिंदी लोकांची गुलामगिरी नाहीशी करण्याकरिता ज्याप्रमाणे महात्मा गांधी, अँड्रयूज व नामदार शास्त्री अशी मोठमोठी माणसे खटपट करीत आहेत, त्याप्रमाणेच हिंदुस्थानातील क्षेत्रांच्या ठिकाणी परमार्थ साधनाच्या नावाखाली चालू असलेली विधवांची गुलामगिरी नाहीशी करण्याकरिता सुधारकांची चळवळ आता सुरू झाली पाहिजे. केवळ सामाजिक परिषदा व ठराव यांनी हे काम न भागविता निरनिराळ्या क्षेत्रांचे ठिकाणी विधवाश्रमासारख्या संस्था स्थापन करण्याची जरुरी फार आढळून येत आहे.

✿ ✿

# माझे वेषांतर

अनाथ बालिकाश्रमात आजन्म सेविका झाल्यापासून माझे बहुतेक आयुष्य विधवांच्याकरिता संस्थेला वर्गणी मागण्यात गेले. मी एके ठिकाणी राहून शाळेत शिक्षकिणीचे काम करीत राहिले नाही. वर्गणीचे काम मजकडे दिल्यामुळे निरनिराळ्या ठिकाणी जाऊन, विधवांची स्थिती काय आहे, त्यांच्या अडचणी कशा आहेत, याचा मला प्रत्यक्ष अनुभव घेता आला. मीही विधवाच असल्यामुळे, मला तो अनुभव पूर्णपणे पटत गेला; व विधवांची स्थिती समाजापुढे मांडून, त्यांची उन्नती घडवून आणावी, असे मला वाटू लागले.

विधवांच्या अनेक अडचणींपैकी त्यांना सक्तीने देण्यात येणारी संन्यास दीक्षा ही एक मोठी अडचण होय. मलाही तशी दीक्षा देण्यात आलेली असल्यामुळे, त्याचा मला प्रत्यक्ष अनुभव होताच. मला निरनिराळ्या ठिकाणी अशा स्थितीतच प्रवास करावा लागला आहे. म्हणून या स्थितीतल्या सर्व गैरसोयी मी अनुभवलेल्या आहेत. यावरून या चालीचा हिंडीसपणा माझ्या पूर्ण प्रत्ययास आलेला आहे. मला जेव्हा समजावयास लागून मी आश्रमाची आजन्म सेविका झाले, त्या दिवसांपासून ही चाल बंद पडावी व विधवांचे केशवपन पुरुषांनी थांबवावे असे मला वाटत होते व त्याप्रमाणे अनेक नवीन झालेल्या बालविधवांचे सुधारक आईबाप त्यांचे केशवपन करीतनासे झालेले, मी प्रत्यक्ष पाहिले होते. सुधारकांच्या चळवळीचा हा एक चांगला परिणाम आहे, हे केव्हाही कबूल करावे लागेल.

माझ्यापुढे असा प्रश्न उत्पन्न झाला की, विधवांच्या अज्ञानावस्थेत व त्यांच्या इच्छेविरुद्ध केशवपनाची दीक्षा ज्या हजारो विधवांना आज हिंदू समाजात दिली गेली आहे आणि दिली जात आहे, त्यांना सज्ञानावस्था प्राप्त झाली असता व त्यांचे त्यांना बरे वाईट कळू लागल्यावर, त्या मुंडण केलेल्या विधवांनी आपली डोकी दर पंधरा दिवसाला नापिताच्या हाती न देता, सत्याग्रह करून स्वत:चे केस वाढवावेत व

आपली पूर्वीची माणुसकीची अवस्था प्राप्त करून घ्यावी.

या प्रश्नावर मी संस्थेत काम करू लागल्यापासून सारखा विचार करीत होते व माझे असे मत झाले की, या बाबतीत विधवांनी इत:पर हा जुलूम न सोसता, या चालीचा सक्रिय प्रतिकार करावा व आपले डोके हे नापिताच्या हातात देण्याकरिता नसून त्याच्यावर आपली मालकी आहे, हे सिद्ध करून दाखवावे. पहिल्या प्रथम टीका होईल, पण हा मार्ग घालून दिल्यास, पुढील अनेक मुंडण केलेल्या विधवांचे हाल वाचतील व त्या अनुकरण करून त्यांना जो योग्य मार्ग दिसेल तो पत्करतील. १९१२ पर्यंत मी मुंडण केलेल्या स्थितीतच आश्रमाची निरनिराळी कामे केली व नंतर मी माझे स्वत:च्या मनाने वेषांतर घडवून आणले. आश्रमाचे काम त्या दिवसापासून आजतागायत मी सारखे करीत आहे. या माझ्या वेषांतरासंबंधी त्यावेळी फार मोठी टीका झाली.

अजूनही केशवपनाची चाल पुणे, मुंबई व काही थोडी शहरे वगळल्यास इतर ठिकाणी चालूच आहे. यासंबंधी विधवांना काय वाटते, त्यांच्या यासंबंधी काय अडचणी आहेत, हे मी लहान-थोर वाचकांपुढे मांडणार आहे. त्यांनी त्याचा मोकळ्या मनाने विचार करावा व ही चाल हिंदू समाजातून नष्ट होण्याकरिता प्रयत्न करावेत.

माझ्या प्रवासामुळे ज्या अनेक विधवांशी व त्यांचे नातेवाइकांशी मला या विषयासंबंधी बोलण्याचा प्रसंग आला, त्यांनी केशवपनाच्या रूढीमुळे येणाऱ्या अडचणी मला सांगितल्या व त्या अडचणी माझ्या अनुभवाशी तंतोतंत जुळल्या.

विधवांचे केशवपन हे स्वामींच्या मुंडणाप्रमाणे संन्यास-धर्माची दीक्षा म्हणून पूर्वी देण्यात येत असेल. पण मुंडण केलेले स्वामी आपल्या आश्रमधर्माप्रमाणे न राहता जर प्रपंचात पडू लागले, तर त्यांच्याकडून अधर्म आचरल्याचे पातक घडेल. प्रपंचात पडून स्वामी जर केवळ बाकीचा आश्रमधर्म सोडून देऊन आपल्या पाक्षिक मुंडणानेच आपला धर्म सांभाळू लागले, तर त्या स्वामींचा समाजावर काहीच परिणाम होणार नाही व केवळ त्या मुंडणामुळेच स्वामींची उन्नती होणार नाही. केशवपन केल्या जाणाऱ्या विधवांची स्थिती वरील स्वामींप्रमाणेच अनुकंपनीय झालेली आहे. या विधवांचा संन्यासाश्रम केवळ औपचारिक स्वरूपाचा असतो. खऱ्या संन्यासाश्रमात राहण्याची योग्यता हजारांत तीन-चार व्यक्तींमध्येच कदाचित आढळून येईल. अशी स्थिती असताना, हा आश्रम असाहाय्य, अशिक्षित व सर्वस्वी परावलंबी अशा विधवांवर लादला गेला होता व आजही लादला जात आहे. माझे मत वपनाच्या सर्वथैव विरुद्ध आहे, अशांतला प्रकार नाही. ज्या विधवांना सर्वसंगपरित्याग करून रामदासांप्रमाणे समाजकार्य व देशकार्य करावयाचे असेल, अशा विधवांनी वाटल्यास वपनस्थिती पत्करून बुद्धाच्या भिक्षुणीप्रमाणे मठात राहावे व तेथील यमनियम सांभाळून समाजकार्य करावे. वपन केलेल्या विधवांची स्थिती आज अगदी

निराळी आहे. हल्लीच्या वपन केलेल्या व न केलेल्या संन्यासिनी आपापल्या कौटुंबिक नातलगांच्या सानिध्यांत राहतात व त्यांना तरुण संसारिकांचे विलासी चाळे पाहावयास मिळतात. हे पाहून तरुण विधवांच्या मनाची स्थिती कशी होत असेल, हे तरुण विधवांच्या जन्मास जाऊन अनुभविल्याखेरीज कळणार नाही. आज ३० वर्षांनंतर विधवांची स्थिती पालटली आहे, असे पुण्या-मुंबईचे लोक म्हणतात, पण निरनिराळ्या खेड्यापाड्यांतून आज वपन केलेल्या हजारो विधवा पाहावयास सापडतात. त्यातल्या अनेक विधवा अल्पवयी असतात. या स्थितीचे निराकरण वर्षातून एखाद्या प्रसिद्ध शहरी भरविल्या जाणाऱ्या 'सोशल कॉन्फरन्स'ने होईल, असे वाटत नाही.

संन्यास घेणारा मनुष्य जसा स्वयंप्रेरणेने संन्यास घेण्याकरिता मुंडण करून त्या आश्रमात सर्व लोकांच्या देखत प्रवेश करितो, त्याप्रमाणे एखाद्या विधवेला वाटल्यास तिने अशी दीक्षा सर्व लोकांसमक्ष एखादा धार्मिक विधी करून घ्यावी. सध्या मात्र ही दीक्षा देण्याचा विधी अगदी खाजगी रितीने उरकून घेण्यात येत असतो. मुंडणस्थितीत मी २० वर्षे घालविली. वपनाची चाल माझ्यापुरती नष्ट कशी करावी, हे मी माझ्या मनाने ठरविले. या बाबतीत मला कोणीही सल्ला दिला नाही. प्रो. कर्वे यांनी ही गोष्ट सर्वस्वी माझ्यावरच सोपविली होती. त्यांनी मला त्या बाबतीत कोणताही आग्रह केला नाही, अथवा कोणतेही उत्तेजन दिले नाही. हा प्रश्न ज्याचा त्याने सोडवावा, असे त्यांनी मला सांगितले.

आश्रमाचे काम करीत असता, विधवांचे वपन थांबविण्याविषयी मी हजारो प्रयत्न केले व कित्येक ठिकाणी वपन करावयाचे असेल, तर ते नापिताकडून करून न घेता, घरच्या घरी वडील, भाऊ अथवा मुलगा यांच्याकडून ते करून घ्यावे, अशा प्रकारचा उपदेश मी पुष्कळ ठिकाणी केला. केशवपन ही एक धार्मिक बाब आहे. असे समजणाऱ्या विधवांना वडील, भाऊ अथवा मुलगा यांनी हे धार्मिक कृत्य करण्यास जातीने मदत न केल्यास, विधवांनी एकमेकींचे केशवपन करून या बाबतीत स्वतंत्र व्हावे व नापितांवर अवलंबून राहू नये म्हणून कित्येक विधवांना नापितांची केस कापण्याची यंत्रेही मागवून दिली. या बाबतीत माझ्या थोरल्या भावजयीने स्वत: सवाशीण असूनही एक दोनदा माझे वपन करण्यास मदत केली होती. पण केशवपन करून घेणाऱ्या विधवांना अशा रितीने स्वत: अगर दुसऱ्यांकडून केशवपन करून घेणे अधर्माचे वाटते व नापिताकडूनच केशवपन करून घेणे, हे सशास्त्र आहे, अशी त्यांची समजूत आहे, असे मला आढळून आले.

वपन झालेल्या विधवांशी माझे खाजगी भाषण होई व अजूनही तसे भाषण होत असते. त्या भाषणात त्या असे म्हणतात की, "कोणी मेल्याने ही विधवांच्या केशवपनाची चाल काढली असेल ती असो. रामायण-महाभारतात ती कोठे ऐकू येत नाही, वेदकाली ती होती की नाही, हे आम्हांस माहीत नाही. मनुस्मृतीस ती

आहे असे पुरुषांकडून आम्हांस समजेत. परंतु मनुस्मृतीत सांगितलेल्या गोष्टी आजच्या काळात किती लोकांना पाळणे शक्य आहे, याचा विचार कोणीच करीत नाही.''

तरुण विधवांचे वपन १५ दिवसांनी करण्यास नापित मोठ्या आनंदाने तयार असलात. परंतु ५०/६० वर्षांच्या वयातील विधवांचे वपन करण्यास मुंबईसारख्या ठिकाणीदेखील नापित मिळविणे कठीण जाते. तालुक्याच्या गावातूनही हल्ली केस कापण्याची दुकाने निघाल्यामुळे घरोघर हिंडणारे न्हावी सापडणे कठीण जाते त्यामुळे पैसे देऊनही वृद्ध स्त्रियांचे वपन करण्यास न्हावी मिळणे अशक्य होत चालले आहे. अशा एखाद्या विधवेचे जर नापितास उजाडताच निमंत्रण गेले तर तो म्हणतो की, ''भवानीच्या पारी मी असले काम करीत नसतो. मग वाटल्यास दुपारी १२ वाजता येऊन जाईन.'' अशा विधवांना खेड्यांतूनही नापित मिळण्यास फार अडचण पडते व कित्येक ठिकाणी तर नापितांना फार लांबून बोलावून आणावे लागते. अशा अनेक अडचणींमुळे वयातीत असलेल्या विधवांचे केस दोन दोन-चार चार आंगळे वाढून डोळ्यांवर येतात. मग नातवंडे त्यांस विचारतात, ''आजी तुझे केस आखूड का? तू केव्हा वेणी घालणार? तू डोक्यावर पदर का घेतेस?'' विधवांचे वपन चालू ठेवायचे असेल तर अशा स्थितीत त्यांच्या नातलगांनी आपल्या विधवा भगिनींच्या धर्मरक्षणाकरिता स्वत: झीज सोसावी व ही कामे करावयास शिकावे. अलीकडे नापितांच्याही निरनिराळ्या परिषदा भरत आहेत व त्यांचे सभांतूनही विधवांचे केशवपन कोणी करू नये, असे ठराव पास होऊ लागले आहेत. तेव्हा ही कामे केशवपनाच्या चालीचे समर्थन करणाऱ्यांनी आता शिकून घेतल्यास त्यांचे तसे करणे फायद्याचे होईल. पुरुषांना स्वत:ची दाढी करावयास आता लाज वाटत नाही. मग त्यांनी आपल्या विधवा भगिनींच्या केशवपनाचा प्रश्न आला, तर नापिताला बोलवण्याच्या भानगडीत का पडावे, हे मला समजत नाही. पण वरील नातेवाइकांना निरनिराळी देशकार्य इतकी करावयाची असतात की, त्यांना आपल्या कामापुढे म्हातारीकडे येऊन दोन सुखदु:खाच्या गोष्टी बोलावयास सापडत नाहीत. मग त्यांना वपनाचे कार्य उरकून घेण्यास वेळ कसा मिळणार?

अशा बायकांची वपनस्थिती त्यांच्या म्हातारपणीदेखील बंद करावी व त्यांचे मनमुंडण झाल्याखेरीज विनाकारण त्यांच्या शरीराचे मुंडण चालू ठेवू नये. हे समाजसुधारकांनी तरी घडवून आणावे व त्यांना विधवांची दु:खे नाहीशी करावयास पुरेसा वेळ व नीतिधैर्य नसल्यास विधवांना स्वावलंबन तत्त्वावर हे वपन कोणच्याही वयात कोणत्याही वर्षात बंद करावे.

यासंबंधी स्वत: उदाहरण घालून दिल्याखेरीज या चालीला आळा बसणार नाही म्हणून लोकांच्या कुचेष्टा, तर्कवितर्क व निंदा यांच्याकडे न बघता मी १९१२ सालीच या मार्गास लागले. काही लोक असे म्हणतात की, ''४० वर्षांपर्यंत वपन-

स्थितीत राहून समाजाच्या पुढे आश्रमाचे काम करून दाखविले व नंतर पार्वतीबाईंनी केस वाढविण्यास प्रारंभ केला. तर यांच्या मार्गात केस कुठे आड येत होते व आता जर त्यांनी केस वाढविले आहेत, तर त्यांचा उद्देश काहीतरी निराळा दिसतो.''

त्यावेळी अनेक विद्वानांच्या डोक्यांतही माझ्यासंबंधी असेच विचार आले होते. त्यांपैकी कित्येकांनी प्रो. कर्वे यांना प्रश्न केलेलेही माझ्या कानांवर आले आहेत. ते म्हणत, 'काय हो कर्वे, तुमच्या पार्वतीबाई काही निराळ्या हेतूने केस वाढवितात की काय?'' तेव्हा कर्वे म्हणत की, ''असे काही मला वाटत नाही. तसे असल्यास ते समाजास पुढे दिसून येईलच.''

आता लोक असे म्हणतील की, यांना वपनाचा निषेधच करावयाचा होता तर त्यांनी आश्रमात काम करू लागण्यापूर्वीच त्याचा सक्रिय निषेध का केला नाही! याला दोन करणे आहेत. पहिले कारण असे की, मी आश्रमात येतानाच केस वाढविले असते, तर लोकांचा मजविषयी विनाकारण गैरसमज होऊन, मला विधवांसंबंधी काम करता आले तितके करिता आले नसते. विधवांची सेवा करिता यावी म्हणूनही माझे विचार मला काही वर्षे बाजूला ठेवावे लागले.

दुसरे कारण असे की, मी आश्रमात काम करू लागले त्यावेळी माझा मुलगा अल्पवयाचा होता. तो जरी शाळेत जात होता, तरी त्याला विचार करण्याचे सामर्थ्य आलेले नव्हते. ते येण्यापूर्वी त्याच्या कोवळ्या मनावर माझ्या बदललेल्या वेषांतरामुळे व लोकनिंदेमुळे काही वाईट परिणाम होऊ नये व त्यालाही अधार्मिक गोष्ट माझ्या आईने केली, असे वाटू नये म्हणून तो वयात येऊन त्याला स्वत:करिता विचार करणे कळू लागेपर्यंत मी वाट पाहिली व मग मला जी गोष्ट करावयाची होती ती मी करून दाखविली.

मला कोकणात असताना, वैधव्यदशा प्राप्त झाली. तिथल्या चालीरीतींप्रमाणे माझी व्यवस्था करण्यात आली. त्याबद्दलची जबाबदारी माझ्यावर येत नाही, हे सांगणे नकोच.

सध्या केशवपनासंबंधी मत पालटत आहे, पण तो पालट खेड्यापाड्यांतून फारच मंदगतीने होत आहे. विधवांच्यावर धर्माचे नावाखाली केशवपनासंबंधी जो अन्याय होत आहे, त्यासंबंधी विधवांनीच पुढाकार घेऊन चळवळ केल्याशिवाय केशवपनासारख्या इतर अन्यायांचे निराकरण हिंदू समाजाकडून होणे बरेच कठीण दिसते.

✿ ✿

# नानाचे लग्न

मुलांचे शिक्षण व त्यांची लग्ने या बाबतीत आईबापांनी विचारपूर्वक आपली कर्तव्ये बजावली पाहिजेत, असे माझे मत आहे. शिक्षण घेण्यात माझा बराच वेळ जात असल्याने, माझा मुलगा नाना याच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी माझी बहीण बाया व अण्णा यांच्यावर सोपविली होती. अशी जरी स्थिती होती तरी नानाच्या शिक्षणावर माझी देखरेख असे व मी त्याच्या स्वभावाला वेळोवेळी वळण लावण्याचा प्रयत्न करी. अण्णांच्या सहवासाने माझ्या मनात विधवांच्या सेवेत आपले सर्व आयुष्य घालवावे, अशी ज्याप्रमाणे इच्छा झाली, त्याप्रमाणे माझ्या मुलाच्या मनात देखील या कार्याचे बीजारोपण व्हावे, म्हणून मी त्याला लहानपणापासून अण्णांच्या सहवासात ठेविले होते. आश्रमाचे काम करण्याबद्दल मला कोणताच पगार मिळत नसे. फक्त जेवून दर महिन्यास अडीच रुपये 'पॉकेट मनी' म्हणून मिळत असत. हयाशिवाय मुलाचे शिक्षणाकरिता म्हणून आश्रमातून दरमहा आठ रुपये मदत म्हणून कित्येक वर्षे मिळत असत. नानाच्या शिक्षणाला मला एवढीच मदत करिता आली. बाकी शिक्षणाची सर्व जबाबदारी अण्णा, माझी धाकटी बहीण चि. सौभाग्यवती काशीबाई व तिचे यजमान श्री. भिडे यांच्याच साहाय्यामुळे पार पडली व माझ्या मुलाचे शाळा-कॉलेजांतील सर्व शिक्षण झाले व त्याची बी.ए.ची परीक्षा पास झाली. त्याने एम.ए.ची परीक्षा फर्ग्युसन कॉलेजात डेमॉन्स्ट्रेटरचे काम करून दिली. नानाने आपल्या वयाच्या २२व्या वर्षी प्रो. कर्वे यांच्या सूचनेवरून आपले सर्व आयुष्य विधवांच्या शिक्षणाकरिता खर्च करावयाचे ठरविले. त्यावेळी नानाचे कॉलेजातील शिक्षण पुरे झालेले नव्हते. मी वर्गणीहून हिंगण्यास परत आल्यावर या सर्व गोष्टी मला कळल्या व माझ्या मुलाने माझ्या गैरहजेरीत आपल्या स्वत:च्या विचारानेच, मी सांगितल्याशिवाय आयुष्याचे ध्येय मला हवे होते त्याप्रमाणे ठरवलेले पाहून मला मोठा आनंद वाटला.

यानंतर माझ्या मुलाचे लग्न ठरविण्याचा विचार माझ्या मनात आला. पुष्कळ आईबाप मुलांच्या बाबतीत यासंबंधी विशेष काळजी घेत नाहीत, असे मला आढळून आले होते. एखादी अनोळखी मुलगी पाहून तिचे नानाशी लग्न करावे, याच्या मी विरुद्ध होते. मुलीचे शिक्षण निदान मॅट्रिकपर्यंत तरी झालेले असावे, तिला घरकामाची चांगली माहिती असावी, मोठ्या कुटुंबांत काम करून राहण्याची तिला सवय असावी, तिच्या आईबापांनी तिला योग्य शिस्तीचे वळण लावलेले असावे. अशा तऱ्हेची मुलगी माझ्या नानाला करून घ्यावी, असे माझ्या मनात होते. पण अशी मुलगी मिळवी कशी व जरी ती मिळाली तरी तिचे शिक्षण कसे झालेले असणार, या प्रश्नाचा मी विचार करीत असता, माझ्या मनात माझ्याबरोबर गोव्यात राहणारे आमच्या पुरुषांचे परमस्नेही श्री. बाळाजी भास्कर जोशी व त्यांच्या पत्नी सौ. रमाबाई यांची मला आठवण झाली. गोव्यास राहत असताना एकदा थट्टेनेच श्री. जोशी व त्यांच्या पत्नी यांनी त्यांना मुलगी झाली, तर आमच्या नानाला ती करून घ्यावी असे आम्हांला सांगितले होते; व आमचे पुरुषांनीदेखील थट्टेतच याला अनुमती दिली होती.

१८८८ साली आम्ही गोव्याला होतो. त्यानंतर मी आश्रमात काम करू लागले. १९०३ साली श्री. जोशी हे हर्णे मुक्कामी कस्टम खात्यात नोकरीवर होते. श्री. जोशी हे सध्या कुठे आहेत याची चौकशी केली व त्यांना एक मुलगी आहे व त्या मुलीला योग्य शिक्षण देऊन, तिचे लग्न करण्याचा विचार श्री. जोशी हे सध्या करीत आहेत असे मला समजले. हे कळल्याबरोबर श्री. जोशी यांच्या मुलीला शिक्षण द्यावे व नानाला मुलगी पसंत पडल्यास ती करून घ्यावी असे मी ठरविले व त्याप्रमाणे श्री. जोशी यांना पत्र पाठविले. त्यांनाही कल्पना पसंत पडून त्यांनी मोठ्या आनंदाने मुलीला शिक्षणाकरिता हिंगण्याला पाठविले. मुलगी हिंगण्यात शिकू लागल्यावर त्या मुलीसंबंधी माझा मनोदय मी कुणाला सांगितला नाही; कारण यासंबंधी उगीच गवगवा व्हावा अशी माझी इच्छा नव्हती.

श्री. जोशी यांची मुलगी कशी वागते, तिचा स्वभाव कसा आहे, या सर्व गोष्टी मी प्रत्यक्ष पाहिल्या व नानाला हीच मुलगी सर्वस्वी योग्य आहे असे ठरवून, मुलगी इंग्रजी सहाव्या इयत्तेत शिकत असताना नानाला या मुलीसंबंधी त्याचे मत काय आहे याची चौकशी केली. श्री. जोशी यांची मुलगी स्वभावाने थंड व गरीब असून रूपाने सुरेख होती. या मुलीपेक्षा अधिक देखण्या मुली नानाला सांगू आल्या होत्या. तरुण मुलामुलींची दृष्टी वधूवर पाहताना वर वर पाहण्याची असते व त्यांच्या दृष्ट्या स्वरूपाला इतर गोष्टींपेक्षा जास्त मार्क मिळतात. पहिल्या प्रथम नानाला जेव्हा श्री. जोशी यांचे मुलीविषयी विचारले, तेव्हा त्याने श्री. जोशी यांची मुलगी नापसंत केली. पण त्याचे हे मत सर्व बाबींचा विचार करून झालेले नाही, असे मला वाटून मी त्याचे मत बदलण्याची खटपट चालविली. माझ्या मते श्री. जोशी यांची मुलगी

आईबापाच्या बालबोध वळणात वाढलेली होती व तिला आईबापांनी साध्या व काटकसरीच्या राहणीच्या सवयी लावल्या होत्या. ही मुलगी स्वभावाने जरी गरीब होती तरी आमच्या सारख्यांच्या कुटुंबात चार माणसांशी जमवून घेण्याची वृत्ती मुलीमध्ये होती व तिच्यामध्ये कामसूपणा होता. हे गुण काल्पनिक नसून, त्याचा मी प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. बाकीच्या मुलींच्या बाबतीत हा अनुभव मला मुळीच नव्हता. म्हणून मी हरप्रयत्न करून नानाचे मन वळविले व त्याला माझ्या पसंतीच्या मुलीशी लग्न करून गृहसौख्य अधिक लाभेल, अशी खात्री करून दिली. शेवटी नानाला हे पटून त्यानेही त्या लग्नाला आपली अनुमती दिली. अनुमती मिळताच योग्य मुहूर्तावर १९१५ साली त्यांचे लग्न झाले. यावेळी मुलाचे वय २७ व मुलीचे वय २१ वर्षांचे होते. या लग्नामुळे श्री. जोशी, त्यांच्या पत्नी सौ. रमाबाई व मी या सर्वांना थट्टेत ठरविलेल्या लग्नाला प्रत्यक्ष स्वरूप आलेले पाहून मोठा संतोष झाला, हे सांगणे नकोच.

विवाहाच्या बाबतीत मुलामुलींना प्रौढपणी आपले जोडीदार पसंत करण्याचे स्वातंत्र्य असावे व पालकांनी या बाबतीत आपली पसंती त्यांच्यावर लादू नये, असे मत अलीकडे लोकमान्य होऊ लागले आहे. माझे मत या बाबतीत अगदी निराळे आहे. तरुण मुलामुलींना अनुभव कमी असतो. त्यांचे वय लहान असल्यामुळे विकारवशता या वयात अधिक दिसून येते. योग्यायोग्य ठरविण्याची लायकी अनुभवाने व विचाराने प्राप्त होत असते. मुलामुलींना वैवाहिक बाबतीत पालकांनी मदत केली पाहिजे व त्यांच्या मनावर योग्य कोणते व अयोग्य कोणते या गोष्ट ठसविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मुलामुलींचे मन वळवून त्यांना आपले म्हणणे योग्य दिसेल, असे त्यांच्यापुढे मांडले पाहिजे. केवळ सक्ती करून अथवा धाक दाखवून अलीकडची शिकलेली मुले याबाबतीत पालकांची आज्ञा पाळतील, असे मला वाटत नाही. त्यांचे म्हणणे ऐकू नये, असे नाही. ते आवश्यक ऐकावे, परंतु ते योग्य आहे की नाही, हे बघून त्याविषयी कायम विचार ठरविणे वडलांकडे असावे. मीदेखील नानाला या बाबतीत पूर्ण मोकळीक ठेवली होती व त्याचे मन वळविण्याचा जो मी प्रयत्न केला तो योग्य मार्गाने झाल्यामुळे त्यांत मला यश आले एवढेच. विवाहाच्या बाबतीत सर्व गोष्टी मुलांवरच सोपविल्या तर स्वरूपाला अधिक महत्त्व प्राप्त होऊन, कुल, शील, राहणी व गुण या गोष्टींचे महत्त्व अजिबात कमी होईल. माझ्या मते स्वरूप, कुल, शील राहणी, शिक्षण व गुण या गोष्टी वधू वरांत आहेत की नाहीत याचा विचार केला पाहिजे व या सर्व गोष्टींत माझ्या मते कुल, शील व राहणी या गोष्टींना अधिक महत्त्व आहे. म्हणून विवाहाचा प्रश्न वधू, वर व पालक यांच्या परस्पर सहकारितेने व परस्पर सौजन्याने सोडविला गेला पाहिजे. हीच पद्धत जपानने स्वीकारली आहे व त्याच पद्धतीचे आपण अनुकरण केले पाहिजे. मुलाचे वाडवडील कसे आहेत याची विचारपूस करण्याचे कारण एवढेच

की, त्यांचे गुण मुलात उतरत असतात. त्यांचे उदाहरणाने मुलांना चांगले वळण लागते, आमच्या सुनेचे वडील श्री. जोशी यांचे शिक्षण जरी बेताबाताचे होते तरी त्यांनी वाचनाने अंगी बहुश्रुतपणा आणला होता. त्यांनी कित्येक कविता लहान मुलांच्या शिक्षणाला उपयोगी अशा केलेल्या आहेत व स्वत: लहान मुलांना शिकविण्याची इतकी हौस होती की, आपल्या भोवती लहान मुले जमवून त्यांना शिकविण्यात तासाचे तास घालविण्यात त्यांना मुळीच कंटाळा वाटत नसे, त्यांचे मत मुलींचे विवाह प्रौढपणी व्हावेत असे होते व त्याप्रमाणे त्यांनी आपल्या मुलींना शिक्षण देण्याकरिता प्रयत्नही चालविला होता. श्री. जोशी यांच्या पत्नी सौ. रमाबाई अतिशय कष्टाळू, शांत स्वभावाच्या व काटकसरीने संसार करणाऱ्या आहेत. अशा आईबापांच्या तालमीत वाढलेली मुलगी त्यांच्यासारखीच असणार, असे मला वाटत असे व तसे माझ्या पुढे अनुभवास आले; म्हणूनच मी माझ्या नानाकरिता ही योग्य वधू आहे असे मनाशी ठरविले.

आज जगापुढे पाश्चिमात्यांची प्रीतिविवाहपद्धती व हिंदुस्थानातील विवाहपद्धती अशा दोन पद्धती आहेत. या दोन्ही पद्धती गुणदोषमिश्रित आहेत. प्रीतिविवाहात वधू-वरांची परस्परपसंती हा जर गुण असेल, तर त्या पद्धतीत कुल, शील, राहणी, या गोष्टींकडे फारसे लक्ष दिले जात नाही, हा त्यांत एक मोठा दोष आहे. आमच्या देशात पालकांनी विवाह ठरवून कन्यादान करणे या पद्धतीत कुल, शील या गुणांकडे जरी बरेच लक्ष पुरविले जात असले, तरी वधूवरांची परस्परसंमती आहे की नाही याकडे मुळीच लक्ष दिले जात नाही, हा एक त्यातील मोठा दोष आहे. वधू-वरांना परस्परपसंतीला पूर्णपणे संधी देऊन त्यांच्या निर्णयाला पालकांच्या पसंतीची जोड मिळाल्यास आमची पद्धती बरीच निर्दोष होईल. व पाश्चात्त्यांनाही त्यांच्या पद्धतीतील उणेपणा भरून काढल्यास त्यांची पद्धतीदेखील बरीच कार्यकारी होईल असे वाटते. या सर्व गोष्टींचा उल्लेख करण्याचे कारण एवढेच की, आमची विवाहपद्धती आज पाश्चिमात्यांचे प्रीतिविवाहपद्धतीवर जाऊ लागली आहे. तिला योग्य दिशा लावून ज्या विवाहपद्धतीने गृहसौख्य वाढून कुटुंबसौख्य अधिक चिरकालिक होईल, अशी पद्धती आपण स्वीकारली पाहिजे. हा प्रश्न सोदाहरण वाचकांपुढे मांडण्याकरिताच मी ही सर्व हकिकत लिहिली आहे. माझ्या मुलाचा विवाह त्याला गृहसौख्य लाभावे या उद्देशाने मी १९१५ साली लावून दिला. आजही माझ्या मुलाचे कुटुंबसौख्य पाहून कुणालाही माझा त्यावेळचा निर्णय योग्य होता, असे वाटल्यावाचून राहणार नाही.

माझ्या मुलाचा विवाह झाल्यावर मी मोठ्या जबाबदारीतून पार पडले, असे मला वाटले व मला पुढे आश्रमाच्याच कामात माझा राहिलेला वेळ खर्च करता येऊ लागला.

✿ ✿

# इंग्रजी शिकण्याकरिता धडपड

ज्या दिवशी माझा ट्रेनिंगचा अभ्यासक्रम संपून मी आश्रमात काम करावयास लागले, त्या दिवशीच मी प्रायमर विकत घेऊन इंग्रजी शिकण्यास आरंभ केला होता. त्यावेळी आश्रमाला माझ्या सर्व वेळेची व श्रमाची जरुरी असल्यामुळे, मला इंग्रजी शिकण्यास जितका वेळ मिळावा तितका न मिळाल्यामुळे, इंग्रजी शिकण्याचा माझा हेतू मला जरा मागे ठेवावा लागला. पुढे १९०४ सालापासून मी आश्रमाकरिता प्रचारकपद स्वीकारून बाहेर फिरतीवर निघाले. माझी विधवांच्या शिक्षणाकरिता महिन्याची भिक्षांदेही अजमासे ३०० रुपये जमत असे व एवढ्या पैशांत त्या वेळच्या स्वस्ताईमुळे पन्नास विधवांचा आश्रमांतील भोजनखर्च भागात असे. अशी स्थिती असल्यामुळे एका माझ्यासारख्या काम करणाऱ्या स्त्रीचे इंग्रजी शिक्षण बुडून त्यामुळे पन्नास मुली जर इंग्रजी शिकत राहिल्या, तर त्यात मुळीच वावगे होणार नाही, अशा विचाराने पुढे इंग्रजी वाढविण्याच्या नादाला न लागता मी आश्रमाकरिता मदत मिळविण्याच्याच कामाला मनापासून लागले.

मला आश्रमाच्या कामाकरिता महाराष्ट्राबाहेरही फिरावे लागत असे. कोचीन व कालिकतकडे मी प्रवास करीत असता, स्टेशनवरची इंग्रजी नावे वाचता न आल्यामुळे व स्थानिक भाषेचे ज्ञान मुळीच नसल्याने एकदा मुक्कामाच्या स्टेशनाच्या पुढे दोन स्टेशने मी उतरले. कित्येक वेळा मदत मागण्याकरिता निरनिराळ्या शहरांतून फिरावे लागले. त्यावेळी ओळख अगर ओळखीचे पत्रदेखील नसताना मी मोठा बंगला पाहिला किंवा वाडा पाहिला की, विधवांची करुण कहाणी सांगण्याकरिता आत जाऊन मदत मिळवून आणीत असे. या वेळी बंगल्यावर लावलेल्या इंग्रजी नावाच्या पाट्या इंग्रजी वाचता येत नसल्यामुळे मला लोकांकडून वाचून घ्याव्या लागत. अशा अनेक अडचणी मला इंग्रजीच्या अज्ञानामुळे वेळोवेळी येत गेल्या. संस्थेचे काम करावयाचे असेल तर इंग्रजीशिवाय चालावयाचे नाही असे माझ्या

अनुभवास वरील अडचणीमुळे येत चालले व पूर्वीचा माझा इंग्रजी शिकण्याचा हेतू पुन्हा जागृत झाला व मी १९१२ साली इंग्रजी प्रायमर पुन्हा विकत घेऊन इंग्रजी शिकण्यास सुरुवात केली. माझा इंग्रजी शिकण्याचा निश्चय अण्णांनाही आवडून त्यांनीदेखील मला हा निश्चय कायम ठेवून, इंग्रजी शिकविण्यास मी स्वत: मदत करीन, असे वचन दिले. मी मुंबईत इंग्रजी शिकण्यास सुरुवातही केली, परंतु मध्ये एक दोन वर्षे आश्रमामध्ये माझ्या कामाची अत्यंत जरुरी उत्पन्न झाल्याने मला इंग्रजी शिकण्याचा बेत तहकूब करून पुन्हा आश्रमात काम करावयास जावे लागले.

१९१४ साली वांद्रे येथील डॉ. खांडवाला यांचे एक पत्र अण्णांना आले व त्यांत त्यांनी 'वांद्रे येथील कॉन्व्हेंट स्कूलमध्ये पार्वतीबाई आठवले यांना ठेविल्यास शिक्षण लौकर होईल' असे सुचविले होते व 'लागेल ती मदत देण्यास मी तयार आहे' असे त्यांनी लिहिले होते. या शाळेत मिशनरी बाया इंग्रजी शिकवावयास असल्याने व शाळेच्या बोर्डिंगात बोलावयाची भाषाही सर्वांची इंग्रजी असल्याने माझे इंग्रजी शिक्षण त्या मिशनरी शाळेत लवकर होईल असे अण्णांना वाटले व त्यांच्याच सल्ल्याने मी वांद्रे येथील शाळेत जाऊन राहावयाचा बेत ठरविला. आश्रमामध्ये आता काम करावयास पुरेशी माणसे असल्यामुळे मलाही इंग्रजी शिकण्यास आश्रम सोडून जाण्यात विशेष वाईट वाटले नाही. माझे वय ४२ वर्षांचे असल्यामुळे मी कॉन्व्हेंट शाळेत गेल्यावर, माझी राहावयाची योजना म्हाताऱ्या स्त्रियांच्या खास बोर्डिंगमध्ये झाली व मला एक खोली राहावयास मिळाली... बोर्डिंगजवळील एका ब्राह्मणाच्या खाणावळीतून डबा मागावून मी जेवणाची व्यवस्था निराळी केली होती. मला शाळेत जावयास मिळेल व शाळेत मुलींबरोबर इंग्रजी शिकावयास सापडेल असे मला वाटले, पण माझ्या प्रौढ वयामुळे शाळेतील बाई मला लहान मुलींच्या वर्गात दाखल करून घेईनात व एक ख्रिस्ती झालेली हिंदी मुलगी मला दररोज दुपारी तासभर कसेतरी इंग्रजी शिकवून जात असे. परंतु अशा व्यवस्थेमुळे मला काहीच विशेष फायदा होत नसे व कॉन्व्हेंटमधले आयुष्य म्हणजे बरेचसे कैदेप्रमाणे वाटू लागले. पुढे अण्णांच्या खटपटीने कॉन्व्हेंट शाळेवरील मुख्य बाईंनी मला लहान मुलींच्या वर्गात दाखल केले. पण माझे वय बरेच झालेले असल्यामुळे वर्गात मला अगदी निराळे बसावे लागे आणि वर्गातील मुली व मास्तर मला प्रश्न विचारण्याचे व माझ्याकडे लक्ष देण्याचे टाळवेल तितके टाळीत असत. लहान मुलींच्या वर्गात जाऊन केवळ एखाद्या स्तंभाप्रमाणे बसण्याने मला इंग्रजी कसे येणार? या शाळेपेक्षा मुंबईतील दुसऱ्या एखाद्या चांगल्या शाळेत जावयास सापडेल तर बरे होईल असे मला वाटू लागले. मोठ्या खटपटीने डॉ. खांडवाला यांची, शाळा बदलण्याच्या माझ्या बेताला संमती मिळाली व कॉन्व्हेंट स्कूलचा दोन महिने अनुभव घेतल्यानंतर ग्रँटरोड येथील गवालिया टँकजवळ असणाऱ्या स्कॉच मिशनच्या मुलींच्या शाळेत इंग्रजी शिकण्याकरिता माझे नाव त्यांनी दाखल करून

घेतले. त्या शाळेतही माझे वय मोठे असल्यामुळे मला मुलींत मिसळून वागता येईना व मास्तरही लहान मुलींना जसे प्रश्न विचारीत तसे मला विचारीत नसत. यामुळे शाळेतल्या शिकण्यापासून जितका फायदा व्हावा तितका फायदा होत नसे. १९१५ ते १९१८ पर्यंत सरासरी ३ वर्षे मी या शाळेत काढली व माझे इंग्रजी शिक्षण दुसऱ्या-तिसऱ्या इयत्तेपर्यंत कसेतरी होत आले. सुट्टीत मी आश्रमामध्ये राहावयास जात असे. त्या वेळी अण्णा मला जे शिकवीत त्याचा मला बराच फायदा होत असे. मी मुंबईत असताना इंग्रजी शिक्षणाबरोबर आश्रमाच्या वर्गणीचे कामही थोडेफार चालविले होते; कारण इंग्रजी शिक्षणापासून जो पुढे फायदा होईल त्यापूर्वी वर्गणी मिळविण्याच्या माझ्या आवडत्या कामात इंग्रजी शिक्षणाने व्यत्यय आलेला पाहून मला फार वाईट वाटे. यामुळे जेवढा रिकामा वेळ मला सापडेल त्याचा मी आश्रमाची वर्गणी मिळविण्याच्या कामात उपयोग करीत असे.

मिशनरी शाळेतील शिक्षणामुळे मला इंग्रजी थोडेसे वाचता येऊ लागले. पण माझी इंग्रजी संभाषण करण्यात मुळीच प्रगती झाली नाही व मला इंग्रजीतून बोलता आल्यास आश्रमाचे काम चांगल्या रितीने करता येईल अशी महत्त्वाकांक्षा होती ती तशीच राहिली. अण्णांचे चिरंजीव डॉ. शंकरराव कर्वे यांनी एखाद्या युरोपियन कुटुंबात आठ महिने मला राहावयास मिळाले, तर डायरेक्ट पद्धतीप्रमाणे इंग्रजी शिक्षण लवकर होईल असे सुचविले व त्याप्रमाणे प्रयत्नही करण्यात आले. पण मला ठेवून घेणारे असे इंग्रजी कुटुंब न मिळाल्यामुळे तो बेत तसाच राहिला.

मला परदेशात पाठविले असता तेथील निरनिराळ्या स्त्रियांच्या शिक्षणसंस्था पाहता येऊन त्याशिवाय इंग्रजीही शिकता येईल, असे विचार अण्णांच्या मनात येऊ लागले. या विचारांना थोडक्याच दिवसांत जास्त चालना मिळून त्याचे पर्यवसान मला अमेरिकेत पाठविण्यात झाले. मला पुढे मागे कधी अमेरिकेत जाण्याचा सुयोग येईल, असे माझ्या कधी स्वप्नीदेखील नव्हते.

✿ ✿

# अमेरिकेत जाण्याची तयारी

माझ्या वयाच्या ४५ व्या वर्षी अण्णांनी जेव्हा मला परदेशी पाठविण्याचा निश्चय केला, त्यावेळी त्यांच्याबरोबर काम करणारी सहकारी मंडळी व इतर इष्टमित्र यांना हा निश्चय मुळीच पसंत पडला नाही. या निश्चयासंबंधी त्याचे असे म्हणणे पडले की, अमेरिकेत व इंग्लंडमध्ये कोणाला पाठवायचे असेल तर एखाद्या ग्रॅज्युएट तरुण मुलीची या कामाकरिता पसंती व्हावी, पण माझ्यासारख्या म्हाताऱ्या बाईला मरण्याकरिता दूरदेशी पाठवून पैसे व्यर्थ खर्च करू नयेत. यासंबंधी अण्णांनी जी माझी निवड कायम केली होती, त्याचे कारण माझ्या परदेशी लागणाऱ्या खर्चाचा भार त्यांनी कोणत्याही संस्थेवर टाकिला नव्हता व मी परदेशांत शक्य त्या मार्गाने स्वावलंबनाच्या बळावर दिवस काढावेत असेच ठरले होते. शिवाय आश्रमासंबंधी दहाबारा वर्षे प्रचाराचे काम केल्यामुळे व तेच काम पुढेही करावयाचे ठरले असल्याने, स्वत:च्या बळावर शरीरकष्ट करून तेथील खर्च आपला आपण चालविण्याला दुसरी कोणी आश्रमाला वाहून घेणारी चांगली शिकलेली बाई तयार झाली नसती; म्हणूनच वयाने नसली तरी कामाच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने माझीच निवड कायम करण्यात आली असे मला वाटते.

परदेशी शिक्षणाकरिता हिंदुस्थानातून जाणाऱ्या स्त्रियांची संख्या, परदेशी जाणाऱ्या पुरुषांच्या संख्येशी तुलना केल्यास, फारच कमी भरेल. स्वकीयांपेक्षा परकीयांचे वर्चस्व जर कशामध्ये असेल तर त्यांची ज्ञानवृद्धी, शास्त्रीय सुधारणा व संघशक्ती, या गोष्टीत आढळून येईल. परदेशात जाऊन शिक्षणसंस्थांचे व समाजाचे तुलनात्मक ज्ञान व अनुभव फार लवकर मिळविता येईल, हे एक माझे परदेशांत जाण्याचे कारण होते. शिवाय आपल्या भरतभूमीतील विधवाश्रमाकरिता परदेशात जर थोडेफार वर्गणीचे काम करता आले तर पाहावे, हाही माझा परदेशी जाण्याचा दुसरा उद्देश होता. पण याबद्दल मी कोणाजवळ बोलले नव्हते. याशिवाय साधल्यास संभाषणात्मक

पद्धतीने (Direct method) परदेशात इंग्रजी शिक्षणाची संधी मिळेल असे वाटत असल्यामुळे परदेशात जाण्याचा निश्चय कायम करण्यात आला. परदेशी जाण्यासंबंधी अण्णांच्या व माझ्या कल्पना वरीलप्रमाणे होत्या. पण त्या वेळी माझ्या परदेशी जाण्याच्या निश्चयामुळे गैरसमज उत्पन्न झाले, त्याचे कारण सर्वस्वी माझ्या जाण्याच्या उद्देशासंबंधी पूर्ण अज्ञान हेच असल्यामुळे त्याबद्दल मला मुळीच वाईट वाटले नाही.

पहिल्या प्रथम अण्णांच्या मनातून मला इंग्लंडला पाठविण्याचे होते. पण त्यावेळी लढाई सुरू असल्यामुळे तिकडील रहदारीचे मार्ग बहुतेक बंद पडल्याप्रमाणेच झाले होते. तेव्हा इंग्लंडचा नाद सोडून मला अमेरिकेत पाठविण्याचा निश्चय कायम झाला. अमेरिकेत इंग्लंडपेक्षा स्त्रियांच्या शिक्षणाची व समाजकार्याची प्रगती अधिक झालेली असल्यामुळे, मला इंग्लंडऐवजी अमेरिकेत जाण्याची संधी मिळणार याबद्दल आनंद वाटू लागला. मला अमेरिकेत पाठविण्यास सोबत कोण मिळेल याची चौकशी चालली असता प्रो. धर्मानंद कोसंबी हे अमेरिकेतील हार्वर्ड युनिव्हर्सिटीत पाली भाषा शिकविण्याकरता आपली प्रीव्हियस परीक्षा पास झालेली मुलगी व चौदा वर्षांचा मुलगा घेऊन जात आहेत, अशी बातमी कळली. अण्णांनी त्यांच्याशी पत्रव्यवहार करून माझ्या जाण्याचे नक्की ठरविले व प्रो. कोसंबी यांनी मला आपल्याबरोबर नेण्याचे कबूल केले. याशिवाय अमेरिकेत रात्रीच्या इंग्रजी शिकण्याकरिता असलेल्या शाळांतून पार्वतीबाईंना इंग्रजी शिक्षण सहज मिळविता येईल, ही माहिती त्यांनी सांगितल्याने मला अत्यंत आनंद झाला. अशा रितीने चालून आलेल्या संधीचा कायदा घ्यावयाचे ठरवून अण्णांनी प्रो. धर्मानंद कोसंबी यांच्याजवळ माझ्या जाण्याचा खर्च देऊन मला त्यांच्या स्वाधीन केले.

माझ्या जाण्याच्या विरुद्ध बहुतेक त्या वेळची परदेशांतून जाऊन आलेली मंडळी असल्यामुळे परदेशात जाण्यापूर्वी पोशाखाची, जेवणाची वगैरे काय व्यवस्था व तयारी करावी याची मला विशेष माहिती मिळविता आली नाही. प्रो. कोसंबी हे पूर्वी एकदा अमेरिकेत जाऊन आलेले होते व त्यांच्या साहाय्याने मी माझी कशीबशी पोशाखाची वगैरे व्यवस्था केली. मी बरोबर चार गुजराथी रेशमी पातळे, सहा मोठी पोलकी, एक ओव्हरकोट व नाईट गाऊन, सहा सुती पेटीकोट, दोन बूट, इत्यादी सामान घेतले होते. पण याचा मला जितका उपयोग व्हावा तितका झाला नाही; व प्रवासात पुरेसे व जसे पाहिजे तसे सामान नसल्यामुळे माझे फार हाल झाले.

मुंबईहून ५ ऑगस्टला पी. ॲण्ड ओ. कंपनीच्या डनेरा बोटीने प्रो. कोसंबी यांच्याबरोबर नातेवाईक मंडळींचा मोठ्या कष्टाने निरोप घेऊन हाँगकाँगला जाण्याकरिता मी भरतभूमीचा किनारा सोडला.

✿ ✿

# बोटीतील प्रवास

पी. ॲण्ड ओ. कंपनीच्या डनेरा बोटीतून मी माझ्या जन्मभूमीचे जेव्हा शेवटचे दर्शन घेतले व मुंबईचा किनारा सोडला, त्यावेळी माझ्या मनात कोणत्या विचारांच्या व विकारांच्या लाटा उत्पन्न झाल्या, याचे मला शब्दांनी वर्णन करता येत नाही. आमची बोट हाँगकाँगपर्यंत जाणारी होती व त्या ठिकाणी आम्हाला निराळ्या बोटीत सॅन्फ्रान्सिस्कोला जावयास बसावयाचे होते. हाँगकाँगपर्यंत जाणारे आमच्याबरोबर एक गुजराथी व्यापारी कुटुंब व अमेरिकेत जाणारे अहमदाबादचे मेथा नावाचे विद्यार्थी व एक शीख गृहस्थ इतकी हिंदुस्थानची मंडळी होती.

मी व प्रो. कोसंबी यांची मुलगी माणक हिला मिळून आम्हां दोघींना एक केबिन मिळाली होती. ज्यांना वनस्पत्याहाराची सवय आहे व ज्यांना तो आहार कायम ठेवावयाचा आहे, त्यांना बोटीत बराच त्रास सोसावा लागतो. बोटीतील जेवणाची व्यवस्था, राहण्याची व्यवस्था, अंघोळीची व्यवस्था, या सर्व गोष्टी नवीन असल्याने नवीन प्रवास करणाऱ्यांची पहिल्या प्रथम फारच त्रेधा होत असते.

मी केवळ नावाकरिता दररोज डायनिंग हॉलमध्ये जात असे. त्या ठिकाणी पाव, लोणी व फळे यांशिवाय मला खाण्यासारखे असे पदार्थच नसत. जेवणाच्या टेबलावर काटे, चमचे कसे ठेवितात जेवणाच्या रितीभाती काय असतात, याचे मात्र मला उत्तम रितीने निरीक्षण करावयास सापडले. डायनिंग हॉलमध्ये जेवावयास जाऊन काही खाववत नसे व केबिनमध्येही बरोबर फराळाचे आणिले नसल्यामुळे माझे पहिल्या पहिल्याने फारच हाल झाले, पण बोटीतील गुजराथी कुटुंबाशी माझी ओळख झाल्यामुळे त्यांच्याकडून मला दररोज जेवावयाचे ताट येत असे व त्यामुळे माझा बोटीत निभाव लागला.

सिंगापूरपर्यंत जाणारे नथुभाई या नावाचे व्यापारी व त्यांचे कुटुंब यांनी आपल्याबरोबर एक कुकर घेतला होता व याशिवाय त्यांनी आपल्या बरोबर फराळाचे जिन्नस,

लोणची, मुरंबे, फळफळावळ, इत्यादी बरेच सामान घेतले होते. बोटीवरील मुदपाकखान्यातून हे व्यापारी कुकर शिजवून आणीत व त्यातील थोडे पदार्थ मला पाठवून देत; यामुळे माझ्यासारख्या दक्षिणीबाईच्या प्रवासातील खाण्यासंबंधी अडचणी बऱ्याच कमी झाल्या. आमच्याबरोबर असणारे विद्यार्थी मेथा यांचा परिचय झाल्यानंतर त्यांचाही मला प्रवासात बराच उपयोग होत असे.

आमची बोट मुंबई सोडून निघाली ती प्रथम कोलंबो येथे थांबली. येथे बोटीचा मुक्काम फक्त सहा तासच होता, पण तेवढ्या वेळात आम्ही मोटारमधून प्रो. कोसंबी यांच्या मित्रांबरोबर एक मोठा बुद्ध विहार पाहावयास गेलो होतो. या दिवशी मी मोठ्या जिवावर येऊन फिरले, कारण माझ्या पायास बूट फारच लागले होते. माझ्या सर्व जन्मात बूट घालून फिरण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग. पहिला बूट फार जड वाटू लागला म्हणून प्रो. कोसंबींनी एक नवा बूट घेऊन दिला, तरी पण गती तीच. सर्व पायास बूट लागल्यामुळे फोड आले तरी बोटीतसुद्धा बूट काढून वागण्याची सोय नाही. सारांश, बुटाच्या वेदना मला बोटीत असह्य झाल्या व प्रत्येकाने परकीय देशांत जाण्यापूर्वी तीन महिने बूट वापरण्याची सवय ठेवावी, असे मला वाटू लागले.

कोलंबोपासून सिंगापूरला जाण्यास आम्हांला दहा-बारा दिवस लागले. त्या ठिकाणी नथूभाई व्यापारी यांनी आम्हा सर्वांना आपल्या घरीच रहावयास बोलविले. पहिल्या प्रथम जमिनीवर जाऊन एक दोन दिवस राहावयास सापडणार याचा सर्वांना मोठा आनंद झाला. सिंगापूरला आमचा वेळ मोठ्या आनंदाने गेला. त्या ठिकाणी पुण्याकडचे श्रीयुत भास्करराव डोंगरे यांची गाठ पडली. त्यांनीही मला व प्रो. कोसंबींना चहापार्टी देऊन आमचे चांगले आगतस्वागत केले.

सिंगापूरनंतर आम्हाला हाँगकाँग बंदरात बोट बदलावयाची होती. त्यामुळे तीन-चार दिवस आम्हाला हाँगकाँगला राहावे लागले. पण तेथे हॉटेलात माणशी सहा येन खर्च येऊ लागला. त्यावेळी आमचे ओळखीचे मेथा यांनी आमची जेवणाखाण्याची सोय आपल्या ओळखीच्या सिंधी व्यापाऱ्याकडे केल्यामुळे आमचा बराच खर्च व त्रास वाचला. नंतर आम्ही टोयो किसेन कैशा कंपनीच्या टेनियो मारू या बोटीतून सॅनफ्रान्सिस्कोला जावयास निघालो.

ही कंपनी हिंदुस्थानातून अमेरिकेत जाणाऱ्या हिंदी प्रवाशांस फर्स्ट क्लासमधून नेत असे. यामुळे हिंदी नागरिकास विनाकारण अधिक खर्च द्यावा लागतो. सेकंड क्लासमधून अनेक युरोपियन प्रवासी प्रवास करीत असता, फक्त हिंदी विद्यार्थी व व्यापारी यांच्यावरच या कंपनीची ही अवकृपा का असावी, हे कळत नाही.

हाँगकाँगहून आम्ही शांघाय, नागासाकी वगैरे बंदरे करीत टोकिओला जाऊन पोहोचलो. तेथे मेथा यांचे मित्र शांतिलाल यांना घेऊन प्रो. कोसंबी व मी टोकियो येथील 'जपान वूमेन्स युनिव्हर्सिटी' पाहावयास गेलो. तेथील सर्व व्यवस्था व शिक्षण पाहून, अण्णांनी अशीच युनिव्हर्सिटी हिंदुस्थानातील स्त्रियांकरिता काढली आहे, या

गोष्टीची मला आठवण झाली व मनाला थोडा संतोष वाटला. हाँगकाँग सुटल्यानंतर आमच्या बोटीवर नथूभाई शेठ नव्हते त्यामुळे कुकरमधले दररोजचे जेवण बंद झाले; मेथांच्या जवळचे तांदूळही संपले. त्यामुळे बोटीवर मिळणारे ब्रेड, लोणी व फळफळावळ एवढ्यावरच मला निर्वाह करणे भाग पडले. बोटीवर प्रवास करणाऱ्यांनी आपली जेवण्याची व्यवस्था शक्य तितकी उत्तम ठेवण्याकरिता काळजी घेतली पाहिजे. तशी व्यवस्था ठेवता येणे मला शक्य झाले नाही. याचा परिणाम माझ्या प्रकृतीवर होऊन होनोलुलूपासून मला बारीक ताप व खोकला येऊ लागला. विशेषत: आमची केबिन एंजिनजवळ असल्यामुळे एंजिनचा आवाज व धग यांचा मला फार त्रास होत असे व त्यामुळे दिवसभर अंगाची आग होत असे. मी केवळ फळफळावळ खाऊन राहत असे. त्यामुळे मला खोकला झाला असेल व मला घरच्या मंडळींनी काळजी असल्यामुळे बरे वाटत नसेल, अशीच भोवतालच्या मंडळींची माझ्या आजाराविषयी समजूत होती. माझ्या आजारासंबंधी पुढे काय करावयाचे याविषयी मेथा यांचा सल्ला मी घेतला व त्यांनी केबिनमधील नर्सला बोलवावयाचे बटन दाबा म्हणजे नर्स येऊन तुमची सर्व व्यवस्था करील, असे सांगितले. आमच्या केबिनमध्ये निरनिराळी विजेची बटने असल्यामुळे कोणचे बटन कोणत्या कामाकरिता दाबावयाचे याची मला नीटशी माहिती नव्हती. त्यामुळे मी मेथा यांनाच बटन दाबून नर्सला बोलावण्याविषयी विनंती केली. मेथा यांनी बोलाविल्याप्रमाणे नर्स आली व तिने डॉक्टरला बोलावून माझी प्रकृती तपासून औषध सुरू केले. मला दुधावर राहण्याविषयी डॉक्टरने सांगितले, परंतु बोटीवर दूध चांगले मिळत नसल्यामुळे माझे बरेच हाल झाले. तथापि डॉक्टरच्या औषधामुळे मला थोडा गुण आला, पण खोकला व ताप अजिबात बरा झाला नाही. दुधावर राहिल्यामुळे व आजारीपणामुळे मला बराच अशक्तपणा आला होता. अशा स्थितीत अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को हे उतरण्याचे बंदर जसजसे जवळ येत चालले तसतसे माझे पुढे कसे होणार याविषयी माझ्या मनातील काळजी वाढत चालली. अशा मन:स्थितीत शेवटी एकदा आमची बोट सॅनफ्रान्सिस्को बंदराला लागली. तेथे डॉक्टरी तपासणी व कस्टम तपासणी या सर्व विधींना संबंध दिवस लागला. दुसऱ्या दिवशी मोटारमधून प्रो. कोसंबी यांच्या कुटुंबांतील मंडळींसह मी सॅन्फ्रान्सिस्को येथील एका मोठ्या भव्य हॉटेलात उतरावयास गेले. हॉटेलात आमच्या बरोबरचे सर्व सामान आले नव्हते. शिवाय प्रवासाच्या अज्ञानामुळे मी माझ्याबरोबर पुरेसे थंडीचे कपडे घेतले नव्हते. त्यामुळे हॉटेलातील खोलीत अशक्तपणामुळे व थंडीमुळे माझे बरेच हाल झाले व माझा आजारही वाढू लागला. प्रो. कोसंबी आपल्या मुलांसह बाहेर रेस्टोरॉंमध्ये (भोजनाश्रम) जेवावयास गेले. माझ्या अशक्तपणामुळे मला त्यांच्याबरोबर जाणे शक्य नव्हते, म्हणून मी त्यांना माझ्याकरिता दूध आणावयास सांगितले. पण आणलेले दूध तेथील पद्धतीप्रमाणे बाटलीत भरलेले होते व ते अगदी थंड असल्यामुळे व दूध ऊन करण्याची काहीच व्यवस्था खोलीत नसल्यामुळे

मला हॉटेलातील पहिला दिवस पूर्णपणे उपासात काढावा लागला त्यामुळे माझी अशक्तता अधिकच वाढत गेली. दुसरे दिवशी माणकने मला हाती धरून कसेबसे एका रेस्टोरॉंमध्ये नेले. पण त्या ठिकाणीही थोड्या दुधापेक्षा माझ्याच्याने जास्त काहीच अन्न खाववले नाही. अशा रितीने माझ्या जेवणासंबंधी व राहण्यासंबंधी जितकी व्यवस्था राहावी तितकी न ठेविली गेल्यामुळे, माझा आजार बराच वाढला. अशा स्थितीत बोस्टनपर्यंत मला प्रो. कोसंबी यांच्याबरोबर जाता येणे शक्य वाटले नाही त्याप्रमाणे प्रो. कोसंबी यांनाही मला प्रवासाची दगदग व त्रास अशा अशक्तपणात सहन होईल, असे वाटले नाही. त्यांना तर बोस्टन येथे आपल्या कामावर लवकर रुजू होणे अवश्य होते, म्हणून त्यांनी मला सॅनफ्रान्सिस्को या ठिकाणीच कोणाकडे तरी मी बरी होईपर्यंत ठेवण्याचा निश्चय ठरविला. बोस्टन येथे जाऊन प्रो. कोसंबी यांच्या घरी राहून त्यांना थोडी फार मदत करावयाची व रात्रीच्या शाळांतून इंग्रजी शिकावयाचे असे मी पूर्वी ठरविले होते, पण तो बेत मला आता रहित करावा लागला आणि अमेरिकेत इतर गरीब हिंदी विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षणाकरिता उपजीविकेकरिता मिळेल ती मोलमजुरी करून प्रतिकूल परिस्थितीशी झगडण्याचा माझा निश्चय मी कायम केला. प्रो. कोसंबी यांनी सॅनफ्रान्सिस्को येथील विश्वविद्यालयात अभ्यास करणाऱ्या कोणातरी हिंदी विद्यार्थ्यांच्या ताब्यात मला देण्याविषयी विनंती केली. पण प्रो. कोसंबी यांना हिंदी विद्यार्थ्यांचे पत्ते लवकर न मिळाल्यामुळे एखाद्या अनोळखी विद्यार्थ्यांच्या हवाली मला करण्यापेक्षा तेथील 'यंग वूमेन्स ख्रिश्चन असोसिएशन'च्या (ख्रिस्ती तरुण भगिनी मंडळ) संस्थेत मला ठेवावयाचे ठरविले. ही कल्पना मला पसंत पडते का नाही याविषयी त्यांनी मला विचारताच मी त्यांच्या बेताला संमती दिली.

हॉटेलातील जीवन असह्य झाल्यामुळे व मला कोठे तरी काम मिळाले, तर बरे होईल असे वाटल्यावरून मी प्रो. कोसंबी यांनी ठरविलेल्या योजनेस कबुली दिली, त्याप्रमाणे प्रो. कोसंबी यांनी बोस्टनला निघण्यापूर्वी मला ख्रिस्ती भगिनी मंडळाच्या (Y. W. C. A.) सेक्रेटरीबाईंच्या स्वाधीन केले. माझ्या प्रवासखर्चापैकी राहिलेली शिल्लक म्हणजे दीडशे डॉलर त्यांनी त्या बाईच्या हवाली केले व माझे दुखणे बरे न झाल्यास या पैशात या बाईंना परत हिंदुस्थानांत पोचविण्याची व्यवस्था करा व बाई बऱ्या झाल्या तर त्यांना बोस्टनला मजकडे पाठवा, असे सांगून प्रो. कोसंबी, त्यांचा मुलगा व माणक ही सर्व मंडळी मला त्या ठिकाणी ठेवून बोस्टनला रवाना झाली. ज्यांनी मला अमेरिकेत आणिले त्या मंडळींना माझ्या आजारीपणामुळे व त्यांनाही अधिक दिवस मजजवळ राहता येणे शक्य नसल्याने मला अशी परक्या ठिकाणी सोडून जावे लागत आहे, हे पाहून मला व त्यांना किती दु:ख झाले असेल याची वाचकांनीच कल्पना करावी.

✿ ✿

# ख्रिस्ती भगिनी मंडळामधील पहिले अनुभव

मला या ख्रिस्ती बायांच्या संस्थेत ठेवले त्या वेळी मी बरीच अशक्त झाले होते. खोकला व ताप अजून बरा झाला नव्हता. यावेळी मला इंग्रजीही धड बोलता येत नव्हते व इंग्रजी बोलणेही नीटपणे कळत नव्हते. सोपी वाक्ये हळूहळू उच्चारल्यास मला अर्थ कळे, पण अमेरिकन लोक बोलताना जरा लवकर बोलतात व त्याचे उच्चारही थोडे वेगळे असतात, यामुळे पहिल्या प्रथम माझी बरीच तारांबळ होत असे. वरील सर्व अडचणींमुळे माझी स्थिती या संस्थेत फारच चमत्कारिक झाली.

पहिले दोन-तीन दिवस मी सेक्रेटरीबाईंबरोबर रेस्टोरॉंमध्ये जेवावयास जात असे; पण या ठिकाणी मला दूध, ब्रेड, लोणी, फळे, यांशिवाय खाण्यासारखे काहीच नसल्याने मी सेक्रेटरीबाईंना मला हे पदार्थ माझ्या खोलीतच आणवून देण्याविषयी विनंती केली व त्यांनीही प्रेमाने मान्य केली. त्यानंतर त्या मला जेवणाचे पदार्थ माझ्या खोलीतच आणवून देत असत. मला मिळालेली राहण्याची खोली मात्र चांगली होती. त्या खोलीत अंग धुण्याकरिता टब व इतर लागणाऱ्या सामानसुमानाची व्यवस्था सर्वोत्कृष्ट होती. खोलीत उष्णता ठेवण्याचीही व्यवस्था असल्यामुळे मला गरम कपडे नसल्यामुळे थंडीने होणारा त्रासदेखील बराच कमी झाला.

माझी या ठिकाणी खाण्याची व राहण्याची जरी व्यवस्था लागली, तरी माझा खोकला काही बरा होईना व त्यामुळे मला बराच त्रास होऊ लागला. अशा ठिकाणी डॉक्टर आणवून पुन्हा जवळचे पैसे खर्च करण्याऐवजी निसर्ग-वैद्याच्या बळावर माझा खोकला व ताप बरा करून घेण्याचा मी निश्चय ठरविला. त्याप्रमाणे दररोज रात्री वीस मिनिटे टबमध्ये कढत पाण्याने मी छाती शेकीत असे व रात्री नऊ वाजल्यापासून सकाळी सात वाजेपर्यंत पूर्ण विश्रांती घेत असे. या उपचाराने माझा खोकला बरा होऊन मला बरीच हुशारी वाटू लागली व मला आजारातून बरे

केल्याबद्दल मी मन:पूर्वक परमेश्वराचे आभार मानले.

अमेरिकेत स्वत:च्या पायांवर उभे राहून मला शिक्षण मिळविले पाहिजे, ही गोष्ट माझ्या मनात नेहमी घोळत असल्यामुळे पूर्वतयारी म्हणून मी सेक्रेटरीबाईंच्या खोलीतील गालिचे साफ करणे, त्यांच्या खोलीतील खिडक्यांची भिंगे स्वच्छ पुसणे व खोली झाडणे, ही कामे स्वयंसेवक बनून करण्याची सुरुवात केली. संस्थेतील इतर नोकरचाकर आपली कामे किती काळजीपूर्वक करितात हे मी लक्षपूर्वक पाहत असे व त्यांचेच थोडेबहुत अनुकरण करण्याचे ठरवून सेक्रेटरीबाईंच्या खोलीतील मोलकरणीचे काम करण्यास मी सुरुवात केली होती. माझे स्वयंस्फूर्तीने केलेले काम सेक्रेटरीबाईंनादेखील पसंत पडले होते व त्याही मला माझ्या काम करण्यात नेहमी सूचना देऊन उत्तेजन देत असत. माझे या ख्रिस्ती बायांच्या संस्थेत पाच दिवस गेले पण तेवढ्यात दर दिवसाला अडीच डॉलरप्रमाणे माझ्याजवळच्या पुंजीतले सरासरी ५० रुपये खर्च झाले. त्यामुळे मला कोठेतरी काम मिळवावे असे वाटू लागले. अमेरिकेत जवळचे पैसे संपले म्हणजे उपाशीच मरण्याची पाळी येणार हे दिसत असल्याने, मी सेक्रेटरीबाईंना मला कोठे तरी मोलकरणीचे काम मिळवून देण्याविषयी सारखे सांगणे चालू ठेविले व त्यांनीही मला काम कोठे मिळेल की नाही याची चौकशी सुरू केली.

माझा आजार ईश्वरकृपेने बरा झाला म्हणून बरे, नाहीतर मला अमेरिकेतून परत हिंदुस्थानात पाठवून देण्यासंबंधी प्रो. कोसंबी यांनी सेक्रेटरीबाईंना सांगून ठेविले होतेच. बरे, आजार जर अधिक वाढला असता तर अमेरिकेत जाऊन ही म्हातारी बाई मरणार हे हिंदुस्थानांतील काही टीकाकारांचे भविष्य खरे ठरून, मला माझ्या आवडत्या विधवाश्रमाकरिता काहीच करता आले नसते. या भयंकर पेचातून मी बरी झाल्यामुळे बचावले खरी, पण माझ्यापुढे रिकामपणा व उपासमार ही दोन संकटे उभी राहिली व या संकटांना तोंड देण्याची मी तयारी चालविली. माझ्याजवळचे दीडशे डॉलर म्हणजे ४०० रुपये ही पुंजी केवळ महिन्या दीड महिन्यांत संपली असती; व तोपर्यंत हातपाय न हलविता मी जर स्वस्थ राहिले असते, तर मला अमेरिकेतील 'पुअर लॉ' प्रमाणे सॅनफ्रान्सिस्कोतील ब्रिटिश वकिलांच्या स्वाधीन करून हिंदुस्थानांत परत पोहोचविण्याची व्यवस्था झाली असती व माझा परत जाण्याचा प्रवासखर्च माझ्या हिंदुस्थानातील नातेवाईक मंडळींकडून वसूल करण्यात आला असता. पण हाही मरणतुल्य प्रसंग मजवर ओढवला नाही, ही परमेश्वरकृपाच समजावयाची.

मी सेक्रेटरीबाईंना सांगितल्याप्रमाणे त्यांनी मला म्हातारे व पेन्शनर मिशनरी लोक याकरिता काढलेल्या ऑकलंड येथील एका निवासाश्रमात मोलकरणीची जागा शोधून काढली. त्या ठिकाणी कामावर रुजू करून देण्यास मला त्या घेऊन गेल्या व त्यांनी माझी त्या निवासाश्रमातील प्रेसिडेंटबाईंशी ओळख करून दिली. या

बाईने हिंदुस्थानात मराठी भाषा बोलणाऱ्या जिल्ह्यांतून मिशनरीचे काम केले असल्यामुळे तिने मला अहमदनगर येथील मिशनसंबंधी व केडगावच्या रमाबाईंच्या शारदा सदनासंबंधी बरेच प्रश्न विचारले व ''बाई, पूर्वी रमाबाई यांना ज्याप्रमाणे येशूने अमेरिकेत शिक्षणाकरिता पाठविले होते, त्याप्रमाणेच तुलाही पाठवून दिले आहे; तर तुझे आता तोच तारण करो!'' असा आशीर्वाद देऊन कामाला लाविले.

✿ ✿

# मिशनऱ्यांचे शांतिसदन

तरुण ख्रिस्ती भगिनी मंडळाच्या सेक्रेटरीबाईंनी मला सॅनफ्रान्सिस्को जवळच असणाऱ्या ऑकलंड येथील शांतिसदनातील मुख्य व्यवस्थापक बाईंच्या स्वाधीन करून त्या बाई परत सॅनफ्रान्सिस्कोला गेल्या. हे शांतिसदन अथवा होम ऑफ पीस हे ठिकाण हिंदुस्थानात व इतर परकीय देशात ख्रिस्तधर्मप्रसाराचे बरीच वर्षे काम करून परत आलेल्या वृद्ध मिशनरी पुरुष व स्त्रिया यांचे वृद्धापकाळी राहावयाचे ठिकाण आहे. या ठिकाणी असे चाळीस वृद्ध मिशनरी विश्रांती घेण्याकरिता येऊन राहिले होते व या ठिकाणी मला भोजनगृह, प्रार्थनामंदिर व वाचनालय या खोल्यांतील गालिचे साफ करण्याचे व भोजनगृहातील जेवणाच्या बशा धुण्याचे व खिडकीची तावदाने साफ करण्याचे, अशी मोलकरणीची कामे करावी लागत असत.

शांतिसदनात मला राहावयास वेगळी खोली देण्यात आली होती. याशिवाय माझी निराळ्या टेबलावर माझ्या आवडीप्रमाणे जेवण्याची व्यवस्था करण्याची परवानगी देण्यात आली होती. मी या संस्थेत काम करीत असताना माझा पूर्वीचाच आहार कायम ठेविला होता. मला काम मात्र सकाळपासून संध्याकाळपर्यंत सारखे करावे लागे. अमेरिकेत जेवण्याची वाढपे निरनिराळ्या बशांवर वाढण्याची पद्धत असल्याने, एका मनुष्याच्या जेवणाच्या वेळी सुमारे दहा बशा खरकट्या होतात व मला तेथील बशा विसळण्याच्या कामावर मुख्य असलेल्या एका बाईच्या हाताखाली दररोज ४०० बशा स्वच्छ धुवाव्या लागत! गालिचे साफ करण्याचे, बशा धुण्याचे व खिडक्यांची तावदाने साफ करण्याचे काम चालू असताना, हिंदुस्थानात ख्रिस्तीधर्मप्रसाराचे काम करून थकूनभागून विश्रांती घेण्यास्तव आलेले स्त्री-पुरुष मिशनरी आपल्या रिकामपणाच्या वेळी माझ्यापाशी येऊन मला ख्रिस्तीधर्माचा उपदेश करीत असत व "बाई, तू ख्रिस्ताला स्वीकारल्याशिवाय तुझे व तुझ्या देशाचे तारण होणे शक्य नाही." असे सांगत. या त्यांच्या उपदेशावर मी नेहमी

"मला तुम्ही इंग्रजी शिकवा म्हणजे तुमच्या धर्माचा मी तुलनात्मक अभ्यास करीन व तो धर्म मला पसंत पडल्यास अवश्य स्वीकारीन" असे ठरावीक उत्तर देत असे. या उत्तराचा परिणाम माझे तारण करणाऱ्यावर थोडाफार झाला असे मला लवकरच आढळून आले; कारण दोन दिवसांतच मला एक वृद्ध मिशनरीबाई येऊन बायबल वाचावयास शिकवू लागली. माझे बायबल वाचणे म्हणजे प्राथमिक शाळेत 'कर घर मठ रथ" असे ज्याप्रमाणे मुले वाचतात त्याप्रमाणे चालले होते. परंतु त्या निमित्ताने तरी इंग्रजी शिक्षण वाढविता येत आहे एवढेच मला समाधान वाटत असे.

या ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या शांतिसदनात येऊन तीन-चार दिवस जरी झाले तरी मला काही शांती मिळेना व माझे आता पुढे कसे होणार व अण्णांनी ज्या कार्याकरिता मला अमेरिकेत पाठविले त्या गोष्टी कशा साध्य होणार, या काळज्या मजपुढे उभ्या राहिल्या. शिवाय मी उपजीविकेकरिता काही काम मिळावे म्हणून खटपट करावयास गेले व आगीतून फोफाट्यात पडावे, त्याप्रमाणे मला नकळत मी माझ्या दैवयोगाने मिशनरी मंडळीच्या शांतिसदनात अडकले गेले. त्या ठिकाणी इंग्रजी शिकून अमेरिकेतील शिक्षणसंस्था पाहावयास मिळतील. अशी आशा करणे म्हणजे मृगजळाच्या पाठीमागे लागल्याप्रमाणेच होते. उलट माझ्यावर ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याविषयी काय काय प्रयत्न होतील याविषयी मला भीती वाटू लागली व कोणताही प्रसंग मजवर आला तरी आपला धर्म सोडावयाचा नाही हा निश्चय मी कायम केला.

माझे दररोजचे काम सायंकाळी संपे व प्रार्थना मंदिरातील रात्रीची प्रार्थना संपल्यानंतर मी आपल्या खोलीत मनाला काही आराम वाटावा म्हणून भगवद्गीतेतील भक्तियोगावरील बारावा अध्याय वाचून 'भगवान् कृष्णा, माझे आता अमेरिकेत तूच तारण करणारा आहेस," अशी प्रार्थना करून झोपी जात असे. या शांतिसदनांत मी दहाच दिवस होते व पुढे माझी एका अकल्पित योगाने तेथून सुटका झाली. पण त्यापूर्वी माझा प्रत्येक दिवस मोठ्या काळजीत व त्रासांत जात असे. माझी प्रकृती बरी होती. जेवणाचे व राहण्याचे हाल नव्हते पण माझ्या मनाला शांतिसदनातून आता माझी सुटका कशी होणार ही मोठी काळजी लागली होती व त्यामुळे मी मोठ्या धैर्याने तेथे दिवस काढीत होते.

सॅनफ्रान्सिस्को येथे तरुण ख्रिस्ती स्त्रियांच्या मंडळात राहत असताना केवळ निराशेने कोणातरी हिंदी विद्यार्थ्यांचा सॅनफ्रान्सिस्को येथील पत्ता कळावा, या उद्देशाने आमच्या आश्रमात काम करणारे प्रो. चिपळूणकर यांनी त्यांचे मित्र डॉ. कोकटनूर यांच्या दिलेल्या पत्त्यावर माझ्या हकीगतीचे व मला या ठिकाणाहून कोठे तरी योग्य ठिकाणी नेण्याविषयीच्या विनंतीचे एक पत्र पाठविले होते. या पत्राचे मला उत्तर येईल अशी आशाही मला त्यावेळी नव्हती. पण बुडत्या मनुष्याला काडीचाही आधार पुरेसा वाटतो, या म्हणीप्रमाणे मी हे पत्र पाठवून दिले होते आणि हे पत्रच परमेश्वराच्या साहाय्याने मला मोठे तारक झाले. न्यूयॉर्कजवळील 'नायगारा फॉल्स'

येथे एका मोठ्या कारखान्यावर काम करणारे डॉ. कोकटनूर यांना माझे पत्र पोहोचल्यावर त्यांनी आपल्या विनंतीसह माझे पत्र न्यूयॉर्क येथे लाला लजपतराय यांच्या 'यंग इंडिया' ऑफिसात पाठवून दिले. त्या ठिकाणी कोकटनूर यांचे व माझे पत्र डॉ. ना. सु. हर्डीकर यांना मिळाल्याबरोबर त्यांनी सॅनफ्रान्सिस्को व बर्कले येथील हिंदी विद्यार्थी, व्यापारी व थिऑसॉफिस्ट अमेरिकन स्त्रिया व पुरुष या सर्वांना "संकटात सापडलेल्या पार्वतीबाईंना शक्य तेवढी मदत करा" अशा तारा केल्या. त्याचा योग्य परिणाम होऊन एका शनिवारी रात्री दहा वाजता "हिंदुस्थानातून आलेल्या पार्वतीबाई इकडे आहेत काय?" अशा चौकशीचा फोन आला. त्या टेलिफोनचे उत्तर 'होय' म्हणून गेले व चौकशी करणाऱ्या मित्रमंडळींना रविवारी बारा वाजता आल्यास त्या भेटतील असा निरोपही आमच्या प्रेसिडेंटबाईंकडून गेला.

हे सर्व जेव्हा मला कळले तेव्हा माझ्या जिवात जीव आला व आता मला हिंदुस्थानची मंडळी येऊन भेटणार व त्यांच्याबरोबर मी राहावयास जाईन ही मनोराज्ये, मोलकरणीची कामे करीत असताना मी माझ्या मनात करू लागले. शेवटी एकदाचा तो संस्मरणीय रविवार उजाडला व अकरा वाजल्यापासून आमच्या भरतभूमीतील सुपुत्रांचे लांबून दर्शन घेण्याच्या उत्सुकतेने मी संस्थेच्या पडवीत वाट पाहत बसले. बारा वाजता शंभर पावलांवर मला तीन हिंदी विद्यार्थ्यांचे पाणीदार चेहरे दिसावयास लागले व माझ्यासारख्या परद्वीपस्थ दीन विधवेचे रक्षण करण्याकरिता भगवान श्रीकृष्णाने हे ब्रह्मा-विष्णू-महेशच विद्यार्थ्यांचे रूप घेऊन पाठवून दिले आहेत, असे वाटू लागले. मला हिंदी विद्यार्थी भेटल्याबरोबर माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. त्या वेळी त्यांच्या व माझ्या मनात कोणते विचार आले असतील याविषयी कल्पना करण्याचे काम मी वाचकांवरच सोपविते. आलेले हिंदी विद्यार्थी पुण्या-मुंबईकडील मराठी भाषा बोलणारे होते. त्यांनी मला आपल्याबरोबर बर्कले या ठिकाणी राहावयास येण्याचा फार आग्रह केला. मला हिंदी विद्यार्थ्यांची हलाखीची स्थिती थोडीफार ठाऊक असल्याने मी त्यांना, तुम्ही मला वेळोवेळी भेटत जाऊन माझी विचारपूस करावे मला नेण्याचे आपली दरिद्रस्थिती अधिक दुःखमय करू नका, असे परोपरीने समजावून सांगितले. पण ते विद्यार्थी मला आपल्या बिऱ्हाडी नेण्याचा आग्रह काही सोडीनात. शेवटी मी त्यांच्या म्हणण्याप्रमाणे करावयाचे ठरविले व आमच्या प्रेसिडेंटबाईंची त्यांनी समजूत घालून त्या वेळीच घेऊन जाण्याचे ठरवून प्रत्येकाने माझे सामान उचलून मला घेऊन जाण्याविषयी आपली उत्सुकता दाखविली. अशा रितीने एका पत्राने मोठ्या अचानक रितीने माझी त्या शांतिसदनातून सुटका झाली मी बर्कले या ठिकाणी माझ्या महाराष्ट्रीय बंधूंबरोबर काही काळ घालविण्याचे ठरवून शांतिसदनाचा शेवटचा निरोप घेऊन त्यांच्याबरोबर जावयास निघाले.

✿ ✿

# महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा सहवास

कॅलिफोर्नियातील बर्कले शहरी तीन दक्षिणी विद्यार्थ्यांबरोबर मोठ्या आनंदाने मी राहावयास गेले. आम्ही ज्या घरांत राहत होतो, ते घर दुमजली असून चांगल्या वस्तीत होते. तळमजल्यावर मी व तीन दक्षिणी विद्यार्थी यांचे बिऱ्हाड होते. माडीवर एक अमेरिकन कुटुंब राहत असे. कॅलिफोर्नियात थंडीचे प्रमाण विशेष नसल्यामुळे अमेरिकेतील इतर घरांप्रमाणे या घरात उष्णतेची व्यवस्था केलेली नव्हती. आमच्या मजल्यावर आम्ही एक विजेचा स्टोव्ह ठेविला होता. त्याचा उपयोग अतिशय थंडी पडे तेव्हा आम्हांला होत असे. कॅलिफोर्नियात समशीतोष्ण हवापाणी असल्यामुळे आपल्याकडील विद्यार्थ्यांना अमेरिकेत इतर संस्थानांपेक्षा या संस्थानातील राहणी पहिल्या प्रथम अत्यंत हितकर व सुखावह अशी वाटणारी आहे.

मी ज्या महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांबरोबर राहत होते, त्यांच्या नावानेच मी त्यांना हाक मारीत असे व तेही मला त्यांच्या मावशीप्रमाणे मान देत व मानीत. या तिन्ही विद्यार्थ्यांत जास्त अनुभवी व अमेरिकेत अधिक वर्षे राहिलेले केशवराव भोसेकर हे १९०७ साली अमेरिकेत आले. हिंदुस्थानातील टेक्निकल स्कूलमध्ये आपले शिक्षण संपवून पुढील शिक्षण मिळविण्याकरिता ते अमेरिकेत आले होते. त्यांना पहिल्या प्रथम त्यांचे चुलते थोडे पैसे पाठवीत, पण त्यांना आपल्या उपजीविकेकरता स्वावलंबनाचाच आश्रय करावा लागला. त्यामुळे अमेरिकेत दहा-अकरा वर्षे राहून त्यांना विद्यार्जन असे विशेष करता आले नाही. मी ज्या वेळी त्यांच्याकडे राहावयास गेले, त्यावेळी त्यांना एका लोखंडाच्या कारखान्यांत दीडशे डॉलरची नोकरी होती. त्यांनी आम्ही ज्या घरात राहत होतो ते घर भाड्याने घेतले होते. त्यांच्याच आश्रयाने बाकीचे दोन विद्यार्थी राहत असत.

दामोदरपंत सातवळेकर हा दुसरा महाराष्ट्रीय विद्यार्थी १९०८ साली अमेरिकेत शिक्षणाकरिता आलेला होता. याला घरून पैसे पुरेसे येत नसत; त्यामुळे नोकरी

मिळविण्याकरता मधूनमधून कॉलेज सोडावे लागे. अशा स्थितीमुळे त्याचा अभ्यास जितका व्हावा तितका होत नसे. याला चैनीच्या सवयी असत, पण पैशाच्या अभावी केशवरावांकडून तो कर्जाऊ म्हणून पैसे खर्चावयास घेत असे. पण हे कर्ज फिटण्याचा कधीच संभव येत नसल्याने बिचाऱ्या केशवरावांना आपल्या मित्राकरिता दर महिन्यास आपल्या स्वत:च्या चरितार्थाखेरीज थोडा फार पैसा खर्च करावा लागे.

आमचे तिसरे महाराष्ट्रीय विद्यार्थी वासुदेवराव गोखले हे महाराष्ट्रातील एका कॉलेजात गणित शिकविण्याचे काम करीत असत व ते पुढील अभ्यास करण्याकरिता बर्कले येथील विश्वविद्यालयात म्हणून दाखल झाले होते. यांचीसुद्धा आर्थिक स्थिती जितकी समाधानकारक असावी तितकी समाधानकारक नसे. म्हणून यांनाही इतर स्वावलंबी विद्यार्थ्यांप्रमाणे विद्या व काम या दोन्ही गोष्टींच्या प्राप्तीकरिता धडपड करावी लागे.

अमेरिकेतील स्वावलंबी हिंदी विद्यार्थ्यांना किती कष्ट करून सरस्वती देवीची आराधना करावी लागते, हे पाहण्याचा मला येथे प्रत्यक्ष प्रसंग आला व मलाही अमेरिकेत याच विद्यार्थ्यांचे अनुकरण करावे लागणार असल्यामुळे मी त्यांच्या परिस्थितीचा फार बारकाईने अभ्यास केला. केशवराव, दामोदर व वासुदेव हे तिघेही सकाळी अल्पाहार करून जे कामावर अगर कॉलेजात जात ते सायंकाळी घरी येत. मी सकाळी त्यांना अल्पाहाराकरिता कॉफी अगर चहा व थोडे फराळाचे करून देई, दुपारी पोळ्या, भात, आमटी व भाजी तयार करून ठेवीत असे. प्रत्येकजण कामावरून परत आला म्हणजे खाणावळीप्रमाणे जेवून परत बाहेर जाई. केशवराव फक्त रात्री उशिरा येत व त्यांची प्रकृती शिळेपाके खाऊन बिघडू नये म्हणून मी निराळा स्वयंपाक करून त्यांना जेवू घालण्याची व्यवस्था करीत असे. मी सकाळी सहा वाजता उठत असे व दुपारी मंडळी बाहेर गेली म्हणजे जो रिकामा वेळ सापडे त्या वेळांत मी घरकाम करणे व थोडा अभ्यास करणे ही कामे करीत असे. आमची सर्वांची स्थिती गरिबीची असल्याने आमच्या घरी आम्ही दूध सुमारे शेरभर घेत असू. त्यापैकी स्वत:करिता थोडे घेऊन मी वडील व माझी प्रकृती अशक्त झालेली असल्यामुळे सर्वजण मला आग्रह करून ते दूध मलाच प्यावयास लावीत असत याशिवाय तिघांना निजावयास दोन बिछाने घेऊन तिसरा ते मला मी नको म्हणून म्हणत असताना आग्रहाने देत असत. या तिन्ही मुलांपैकी केशवराव यांना गंडमाळा झाल्या होत्या व बारीक ताप येत असे. यामुळे त्यांच्याबद्दल मला फार काळजी वाटे. परदेशी पोटाकरिता सकाळपासून रात्रीपर्यंत काम करावयाचे, घरून कोणाचाच आधार नाही, शरीराला अशी व्याधी जडलेली व शिवाय दोन महाराष्ट्रीय मित्रांना आपल्याच पैशांतून मदत करावयाची, अशी त्यांची गरिबीची व दु:खाची स्थिती होती व त्यांत थोडीफार माझ्या येण्याने भर मात्र पडली. माझ्याजवळही फक्त शंभर डॉलर राहिलेले व पुढे मला अमेरिकेत याच पैशांवर दिवस काढावयाचे होते. मी

काम करावयास तयार होते व त्याप्रमाणे केशवराव व वासुदेव यांना मी मला काही काम पाहून देण्याविषयी विनंती वेळोवेळी करी. पण ते म्हणत, "पार्वतीबाई, तुमच्यासारख्या पोक्त बाईंना आम्ही तरुण मुले जिवंत असता अमेरिकेसारख्या देशात पोटाकरिता काम करावयास लावणे ही गोष्ट आम्हांस फार लाजिवाणी वाटते. आम्ही गरिबीने राहून तुम्हांला सांभाळू. तिघांत तुम्ही चौथ्या आम्हांला काही जड वाटत नाही. तुम्ही आपलेच घर समजून निष्काळजी रहा."

अशी स्थितीत मी आपल्या महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांची स्वयंपाकाची बाई होऊन दिवस काढू लागले खरी, पण मला ज्या हेतूकरिता अण्णांनी पाठविले तो हेतू या ठिकाणी साध्य होणे शक्य नाही, असे मला आढळून आले. त्यामुळे मला अधिकच दु:ख होऊ लागले. आमच्या महाराष्ट्रीय मुलांची केविलवाणी स्थिती पाहून मला दु:खच होत असे. त्यात माझ्या शोचनीय स्थितीमुळे मला माझा जीव नकोसा झाला व आता या कठीण परिस्थितीतून आपली कशी सुटका करून घ्यावयाची याच्या विवंचेनत मी पडले. महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांकडून मला माझ्या अमेरिकेत येणाच्या उद्देशांना फार थोडी सहानुभूती मिळाली. ते म्हणत, "तुम्हाला अशा वयात प्रो. कर्वे यांनी अमेरिकेत कशाला पाठविले?" शिवाय ती मुले मला इंग्रजी शिकवतील म्हणावे तर त्यांनाच त्यांची कामे करावयास फुरसत नसे, मग ते मला काय शिकविणार? संभाषण-पद्धतीने अमेरिकेत इंग्रजी शिकावयास सापडेल असे म्हणावे, तर मला घरी नेहमी मराठी भाषाच ऐकावयास सापडे व बाहेर जाण्याची विशेष संधी येत नसे; त्यामुळे संस्थेकरिता मदत मिळविण्याचे काम करणेही अशक्य झाले.

बर्कले येथे असताना मिस्टर व मिसेस बगई या पंजाबी कुटुंबाची ओळख झाली. कॅलिफोर्नियात मजुरीकरिता आलेल्या शीख लोकांची वस्ती होती व बर्कलेला पंजाबी व बंगाली हिंदी विद्यार्थी राहत होते; पण कोणाकडे ओळख नसल्याने मला कोणाची मदत मिळणे शक्य झाले नाही. मी एके दिवशी केशवरावांची कपाटातील पुस्तके झाडून नीट लावीत असता मला अमेरिकेतील हिंदी विद्यार्थ्यांच्या पत्त्यांचे एक नोटबुक सापडले. त्या नोटबुकात पत्ते पाहत असता मला इंदूर कॉलेजात पूर्वी प्रोफेसरांचे काम करणारे प्रो. गोखले यांचा पत्ता सापडला व त्यांच्याकडे गेले असता माझी सर्व सोय लागेल असे वाटल्यावरून केशवराव यांना त्यांच्यासंबंधी सर्व माहिती विचारून त्यांना माझ्या सर्व हकीगतीचे व मला तिकडे घेऊन जाण्याविषयीचे मी एक पत्र पाठविले.

प्रो. गोखले हे न्यूयॉर्कजवळील सिनक्टडी या शहरात राहत असत. त्यांच्या घरी जावयाचे म्हणजे सहा दिवस रेल्वेतून प्रवास करावयास पाहिजे होता. नुसते रेल्वेभाडेच दीडशे डॉलर म्हणजे रु. ४५० लागणार होते. मजजवळ तितके पैसे नव्हते, म्हणून मी गोखले यांना सर्व हकीगतीचे पत्र लिहिले. माझ्या दैवयोगाने त्यांचे मला तिकडे निघून येण्याविषयी पत्र आले व प्रवास खर्चाकरता त्यांनी मला



171257

पैसेही पाठवून दिले. त्यांनी माझ्यावर केलेले उपकार मी कधीही विसरणार नाही. इतक्या लांबच्या प्रवासावर मजबरोबर पैशाच्या अभावी कोणीही येणे शक्य नव्हते. माझ्या एकटीवरच एवढ्या लांबचा प्रवास करण्याचा प्रसंग आला. मला तिकीट काढून देऊन व दोन ठिकाणी गाड्या बदलावयाच्या ठिकाणांची नावे इंग्रजीत लिहून देऊन केशवरावांनी माझी जाण्याची सर्व तयारी करून दिली व अमक्या गाडीने निघणार अशी तार केली. सिनक्टडी स्टेशनापासून घरापर्यंत कसे यावयाचे याचा एक नकाशा गोखले यांनी काढून पाठविला होता. अशा पूर्व तयारीने मी प्रवासास जावयास निघाले.

✿ ✿

# सहा दिवसांचा आगगाडीतील प्रवास

प्रो. गोखले यांनी मला सिनक्टडीहून तिकिटाकरता पैसे पाठविले व मला आमचे केशवराव यांनी तिकीट काढून देऊन गाडीत बसविले व अशा रितीने माझ्या अमेरिकेतील एकट्याने प्रवास करण्याच्या पहिल्या प्रसंगाला सुरुवात झाली.

हिंदुस्थानात आश्रमाकरिता मी अनेक वेळा दूरदूरच्या प्रांतात एकटीने प्रवास केला होता; पण अमेरिकेतील प्रवासात व हिंदुस्थानातील प्रवासात मोठे अंतर म्हणजे मला हिंदुस्थानाप्रमाणे अमेरिकेतील भाषा येत नव्हती. अमेरिकेतील रीतिरिवाजांना मी अगदी अनोळखी होते व माझ्या वनस्पत्याहारामुळे मला मांसाहारी देशात प्रवास करताना पदोपदी अनेक अडचणी येण्याचा संभव होता. या सर्व अडचणींचा अनुभव मला माझ्या प्रवासात पूर्णपणे आला.

आगगाडीत जेवण्याची 'डायनिंगकार' असते. तिकडे जाऊन मी दररोज सकाळी पाव, लोणी व चहा घेत असे. एवढ्याकरिता बारा आणे खर्चावे लागत. यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत मी काहीच खात नसे. बरोबर बिस्किटाचा डबा, फळे घेतली होती, पण त्यांचा मला विशेष उपयोग झाला नाही. संध्याकाळच्या वेळेला अडीच आण्यांचे भुईमुगाचे दाणे (Peanuts) स्टेशनावर एका पाकिटांत घालून विकावयास येत ते मी घेत असे. एवढाच काय तो माझा संध्याकाळचा फराळ. अशा रितीने मी सहा दिवस घालविले.

मला तीन दिवसांनी एकदा शिकागोला व नंतर एक दिवसाने बफेलोला गाडी बदलावी लागली. गाडीतून उतरून दुसऱ्या गाडीत बसावयाचे म्हणजे मला ते मोठेच संकट वाटे. "I am Indian. I have no language. Will you help me to change the car" असे मोडकेतोडके बोलून मी एखाद्या अमेरिकन प्रवासी बाईच्या मदतीने निरनिराळ्या गाड्यांत जाऊन बसे. अशा रितीने प्रवास करीत सहाव्या दिवशी रात्री अकरा वाजता मी सिनक्टडी या स्टेशनावर जाऊन उतरले.

स्टेशनपासून गोखले यांच्या घरापर्यंत जाण्याच्या वाटेचा नकाशा गोखले यांनी पाठविलेला मजपाशी होता. पण त्या नकाशाच्या साहाय्याने मी एकटी गोखले यांच्या घरी इतक्या रात्री कशी जाऊ असा मला मोठा प्रश्न पडला. स्टेशनावर उतरल्यानंतर उतारूंची गडबड कमी झाल्यावर मी स्टेशनमास्तरकडे गेले. हे स्टेशनमास्तर चांगले धिप्पाड व सभ्य गृहस्थ होते. त्यांच्यापुढे मी गेले व त्यांना नकाशा दाखविला आणि "I want go to here." असे त्यांना सांगितले. त्यांनी मला समोरच्या बाकावर बसावयाची बोटाने खूण केली. मी दोन तास तेथेच बसले व माझी स्टेशनमास्तर काय व्यवस्था करतात या काळजीत असता त्यांच्या हाताखाली काम करणारे दोन दुय्यम अधिकारी आले, त्यांना त्यांनी गोखले यांच्या घरी मला पोचवावयास सांगितले. गोखले यांचे घर जवळच होते व आम्ही त्या ठिकाणी चालतच गेलो. माझ्याबरोबर आलेल्या स्टेशनवरील नोकरांनी त्यांचे दार ठोठावले, परंतु दहा मिनिटे जरी दार वाजविले तरी काहीच उत्तर नाही. बाहेर थंडी अतिशय पडलेली. आमच्या सर्वांच्या पायांत कळा यावयास लागल्या व स्टेशनवरून मला पोहोचवावयास आलेली माणसेही परत जाण्यास अधीर झाली.

घर चुकले की काय, असा माझ्यापुढे मोठा प्रश्न उभा राहिला व असे झाले असल्यास माझे पुढे कसे होणार ही एक नवी काळजी उत्पन्न झाली. पण मी स्वत: पुढे जाऊन चांगले एकदा दार ठोठावले. त्यामुळे आतून एका गृहस्थाने येऊन दार उघडले. ज्या घरात गोखले राहत होते त्याच्या पहिल्या मजल्यावर एक मिशनरी राहत होते. त्यांनी उठून दार उघडले होते. मला पहिल्या प्रथम वाटले की, हेच गोखले असावेत. अमेरिकेत राहून ते बरेच लठ्ठ झाले असावेत. तिकडच्या पद्धतीप्रमाणे यांनी मिशा काढल्या असाव्यात, असा माझा समज झाला. ते दिवस ख्रिसमसचे असल्यामुळे त्यांनी मला एक कँडीचा (मेवामिठाईचा) तुकडा खावयास दिला व वर जाऊन त्यांनी गोखले यांना उठविले. ते जेव्हा गोखले यांना उठवावयास वर गेले त्यावेळी हे गोखले आहेत हा माझा गैरसमज दूर झाला. गोखले खाली येऊन त्यांनी मला आपल्या खोलीच्या शेजारी माझी व्यवस्था एका निराळ्या खोलीत केली होती, तिकडे नेले. माझी व माझ्या घरची घरधनीण मिसेस सिकोरबाई हिची ओळख करून दिली व 'मला सकाळी लवकर कामावर जावयाचे असल्यामुळे तुम्ही या बाईंची सर्व काळजी घ्या व यांना काय हवे नको ते द्या' असे सांगितले. मला दिलेल्या खोलीतला बिछाना चांगला नसल्यामुळे गोखले यांनी आपला बिछाना मला घालावयास सांगून ते स्वत: त्या मिशनरी मित्राकडे जाऊन निजले.

प्रो. गोखले यांना मी निघाल्याबद्दल तार आमच्या केशवरावांनी बर्कलेहून केली, पण सिनक्टडीला जाऊन पोहोचणार याची बातमी त्यांना न मिळाल्याने ते स्टेशनवर येऊ शकले नाहीत व त्यामुळे माझे हाल झाले, असे मला मागाहून समजले.

✿ ✿

# सिनक्टडी येथील अनुभव

सिनक्टडी शहरापासून न्यूयॉर्क शहरास जावयास पाच-सहा तास रेल्वेने प्रवास करावा लागतो. या शहरी 'जनरल इलेक्ट्रिक' या नावाचा विजेवर चालणारी नाना तऱ्हेची यंत्रे उत्पन्न करण्याचा मोठा कारखाना आहे. त्या कारखान्यांत २६००० माणसे कामावर आहेत. प्रो. गोखले हे याच कारखान्यांत इलेक्ट्रिक इंजिनिअरचे काम करीत असत. त्यांना दरमहा ५०० रुपये पगार होता. प्रो. गोखले हे आपला रिकामा वेळ मजूरवर्गाच्या उन्नतीकरिता खर्च करीत. त्यांनी Un-employment (बेकारी) या विषयावर एक पुस्तकही अमेरिकेत लिहून प्रसिद्ध केले आहे.

प्रो. गोखले ज्या बाईच्या घरी भाड्याने राहत असत तिचे नाव सिकोरबाई. तिच्या घरात भाड्याने राहणारी सात-आठ बिऱ्हाडे होती. या बाईला दोन मुली व एक मुलगा होता. याच घरात मला एक खोली देण्यात आली होती. प्रो. गोखले यांनी सांगितल्यावरून सिकोरबाई मला हवी ती मदत करीत असत व बाजारातून आपल्या मुलीकडून तांदूळ व दूध आणवून देत. मी एक वेळ खोलीतच शेगडीवर मधूनमधून भात शिजवून खात असे. माझे दरोजचे अन्न म्हणजे पाव, लोणी व दूध हे असे. मला अमेरिकेतील गृहातील मोलकरणीची कामे करता यावी याकरिता गोखले यांच्या विनंतीवरून सिकोरबाईंनी यासंबंधी प्रत्यक्ष शिक्षण देण्यास सुरुवात केली होती. अशा रितीने मी दोन महिने सिकोरबाईंकडे घालविले व मग मला प्रो. गोखले यांच्यावर भार घालून राहणे कंटाळवाणे वाटले व काहीतरी काम शोधून काढण्याच्या तयारीला मी लागले. माझ्याकरिता मोलकरणीचे काम शोधून काढण्यासंबंधी मी सिकोरबाईंस विनंती केली व तिनेही वर्तमानपत्रांतून येणाऱ्या 'Girls wanted', 'Women wanted' ('मुली पाहिजेत', 'स्त्रिया पाहिजेत') या जाहिराती पाहून मला सोयिस्कर नोकरी पाहण्याचे प्रयत्न सुरू केले.

सिकोरबाईच्या प्रयत्नाने मला जे पहिले काम मिळाले ते एका ज्यू डॉक्टरकडे

होते. त्यांच्या घरी सकाळी आठ वाजल्यापासून सायंकाळी चार वाजेपर्यंत मोलकरणीची घरातील सर्व कामे करावी लागत. मला या कामाबद्दल आठवड्याचे तीन डॉलर म्हणजे सुमारे नऊ रुपये पगार कबूल केला होता. एक आठवडा मी या घरी काम केले. नंतर प्रो. गोखले यांच्या ओळखीच्या डॉ. ॲपलमन नावाच्या एका ज्यू डॉक्टराकडे काम लागले. त्यांच्या घरी मी मोलकरणीची सर्व कामे करीत असे. इतके दिवस अमेरिकन लोकांच्या लहान मुलांना कपडे कसे घालावे हे मला माहीत नव्हते. ते शिक्षण मला या घरच्या मालकिणीने दिले व मी घरधन्याच्या दीड वर्षाच्या मुलाचे आणि तीन व सहा वर्षांच्या दोन मुलींचे कपडे दररोज करीत असे. या घरी माझी राहण्याची व्यवस्था साधारणपणे बरी होती; पण मला या घरी तीन-चार दिवसांत ताप यावयास लागला व या कारणामुळे मला हे घर सोडावे लागले.

यानंतर सिकोरबाईने पुन्हा मला आम्ही राहत होतो त्या ठिकाणापासून ट्रॅमच्या एक तासाच्या अंतरावर असणाऱ्या स्कोशिओ या गावी जनरल इलेक्ट्रिकलमध्ये कामावर असलेल्या डेव्हिड या नावाच्या बड्या अधिकाऱ्याकडे मोलकरणीची नोकरी शोधून दिली. या घरचे आमचे मालक श्रीमंत होते. मला राहावयास निराळी खोली मिळाली होती व माझी जेवणाची व्यवस्थाही माझ्या मनाप्रमाणे ठेवण्यात आलेली होती. या घरी मला आठवड्याचे पाच डॉलर म्हणजे पंधरा रुपये मिळत. मी त्या घरी पाच आठवडे काम केले; परंतु अशा रितीने मोलकरणीची कामे करून, माझा अमेरिकन कुटुंबाशी ओळख करून घेण्याचा हेतू व इंग्रजी शिक्षणाचा हेतू साध्य होणे मला शक्य दिसले नाही. म्हणून मी अमेरिकन कुटुंबांच्या ओळखी करून घेण्याकरिता काय उपाय योजावा, या विवंचनेत असता मला एक उत्तम युक्ती सुचली. अमेरिकेत स्त्रिया पुस्तकविक्रीची कामे करून पैसे मिळवितात, असे मी ऐकले होते. प्रो. गोखले यांनी अमेरिकेतील मजूरवर्गाकरिता लिहिलेले 'अन एम्प्लॉयमेंट' नावाचे पुस्तक छापून आले होते व त्याच्या पुष्कळशा प्रती पुस्तक विकले न गेल्यामुळे घरीच पडून होत्या. एका रविवारी सिकोरबाईच्या घरी प्रो. गोखले यांना मी भेटावयास गेले व त्यांना पुस्तके विकून थोडा अनुभव मिळविण्यासंबंधाची माझी योजना सांगितली. त्यांनाही ही माझी कल्पना पसंत पडून त्यांनी मला प्रयोग करून पाहण्याकरिता आपली दहा पुस्तके दिली. अमेरिकेतील घरांची दारे थंडीमुळे नेहमी लावून ठेवावी लागतात. त्यामुळे अमेरिकन स्त्रियांच्या ओळखीपाळखी करून घ्यावयाच्या असल्यास, दारावर ठोठवावयास अथवा घंटा वाजवावयास काही तरी कारण असावे लागते. माझ्या पुस्तकविक्रीच्या पेशामुळे मला हे कारण आयतेच मिळाले. डेव्हिड यांच्या घरचा कामधंदा आटोपून दुपारी तीन वाजता मी पुस्तके घेऊन बाहेर पडत असे व निरनिराळ्या घरी पुस्तके घ्यावयाची आहेत का, हे विचारण्याकरिता घराच्या दाराजवळील घंटा वाजवून घरांतल्या मालकिणीची ओळख करून घेत असे. अशा रितीने मी प्रो. गोखले यांनी

लिहिलेल्या 'अन एम्प्लॉयमेंट' या पुस्तकाच्या सुमारे चाळीस प्रती खपविल्या व थोड्या ओळखी करून घेतल्या. पुस्तकविक्रीचे काम चालू असता, डेव्हिड यांच्या घरची पूर्वीची बाई आल्यामुळे, माझी ती मोलकरणीची नोकरी सुटली. पण डेव्हिड यांच्या घरी असतानाच जनरल इलेक्ट्रिकच्या कारखान्यांत काम करणारे मिस्टर एन्स यांच्या पत्नी मिसेस एन्स यांची व माझी ओळख झाली. त्यांना बाईची जरुरी असल्यामुळे मी त्यांच्या घरी नोकरी पत्करली. मी त्यांच्या घरी पाचसहा आठवडे काम केले. त्यांना माझे काम फारच आवडले होते. या ठिकाणी मला राहावयास खोलीही चांगली मिळाली होती. पण या गृहस्थांची बोस्टनला बदली झाल्यामुळे मजवर पुन्हा काम शोधण्याकरिता फिरण्याची पाळी आली. अमेरिकेतील निरनिराळ्या कुटुंबांत मोलकरणीची कामे करीत असता, मला प्रत्येक घरी चांगली शिफारसपत्रे मिळत असत. त्यांपैकी केवळ नमुन्याकरिता म्हणून मी एन्स बाईंनी मला दिलेल्या शिफारसपत्राची नक्कल देत आहे.

May 29, 1919

Mrs. Parvatibai Athavale has proved absolutely trustworthy, honest and of very high character and I am gland to recommend her for light house-hold work.

Frank H. Aines
Schinectady, N. Y.

मे, २९, १९१९

पार्वतीबाई आठवले या आपल्या कामात अत्यंत प्रामाणिक, विश्वासू व सुशील आढळून आल्या. कोणत्याही घरी मोलकरणीच्या साधारण कामाकरिता त्याची शिफारस करण्यास मला आनंद वाटतो.

फ्रँक एच. एन्स.
सिनक्टडी, न्यूयॉर्क

एन्सबाईंच्या घरचे काम सुटल्यानंतर सिकोरबाईंनी मला तेथील वाय. डब्ल्यू. सी. ए. या स्त्रियांना मदत करणाऱ्या संस्थेतर्फे एका मोठ्या इस्पितळात बशा विसळण्याचे काम मिळवून दिले. येथे मला आठवड्यास १५ रुपये पगार मिळत होता.

ज्या इस्पितळात मला काम मिळाले होते, त्या ठिकाणी ट्रॅमने कसे जावयाचे याची माहिती प्रो. गोखले व सिकोरबाई यांच्याकडून मी समजावून घेतली. तेथे जाण्यापूर्वी दोन-तीन दिवस अंगावर पित्तामुळे गांधी यावयास सुरुवात झाली व त्यामुळे माझ्या अंगास कंड सुटण्यासही सुरुवात झाली होती. हिंदुस्थान सोडल्यापासून मी चार-पाच महिने केवळ दूध, पाव, लोणी व फळे, यांवर निर्वाह चालविला होता.

मधूनमधून भात करून खात असे. जेवणामध्ये पालट झाल्यामुळे व नवीन हवापाण्यामुळे मला पित्त झाले असेल असे मला वाटले. इस्पितळांत चालून आलेली नोकरी प्रकृतीच्या सबबीवर सोडावी तर तेही वाईट अशी कल्पना करून व मला आता लवकर बरे वाटेल अशा आशेवर, मी रविवारी सकाळी दवाखान्यांत जाऊन दाखल झाले. दवाखान्यांतील मुख्य हाऊसकीपर बाईंनी मला माझ्या मोलकरणीच्या कामाची समजूत दिली व मी आपल्या कामाचा चार्ज अंगास पित्तामुळे खाज येत होती, अशा स्थितीत घेतला.

मी ज्या इस्पितळात काम करावयास आले होते, त्यात मोठमोठे तीन मजले होते व सुमारे ५०० रोग्यांची त्यात सोय होती. दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर रोग्यांची सोय केलेली होती. पहिल्या मजल्यावर मुदपाकखाना व इस्पितळांतील नोकर-चाकरांच्या राहावयाच्या खोल्या असत. या खोल्यांपैकीच ज्या खोलीतून इस्पितळातील दोन मजल्यांत उष्णता कायम ठेवण्याकरिता वाफेचे मोठमोठे नळ नेण्यात आलेले होते, अशी खोली राहण्याकरिता माझ्या नशिबी आली. खोलीतील हवा कुंद, प्रकाश बेताबाताचा व खोलीतील बिछान्यावर मधूनमधून वाफेच्या नळीतील वाफेचे थोडे थोडे पाणी होऊन ठिपकत असे अशी स्थिती! अमेरिकेत आल्यापासून आतापर्यंत अशा नमुन्याची खोली मला मिळाली नव्हती.

या इस्पितळात एकंदर शंभर सेविका होत्या. आम्हां मोलकरणींपेक्षा त्यांची राहण्याची व जेवण्याची व्यवस्था फार चांगली असे. मोलकरणी, धोबिणी व स्वयंपाकिणी यांच्याकरिता पहिल्या मजल्यावरच जेवणाकरिता एक संयुक्त टेबल ठेविलेले होते व त्यांना राहण्याकरिता खाली मागे सांगितलेल्या कुंद खोल्यांतून व्यवस्था केलेली होती. बशा विसळण्याकरिता मला दुसऱ्या मजल्यावर एका बशा विसळणाऱ्या मुख्य बाईच्या हाताखाली काम करावयास जावे लागे. अमेरिकेतील प्रत्येक रोग्याला निरनिराळ्या बशांतून खावयास देत असतात व दररोज हजारो बशा धुऊन साफ करावयाच्या असतात. बशा धुण्याकरिता जी जागा केलेली होती, त्या ठिकाणी गरम पाणी नळाने मुबलक येत असे. हे काम करण्यात ज्यांना कौशल्य प्राप्त झाले नाही, अशांना हे काम पहिल्या प्रथम बरेच अवघड वाटण्याचा संभव असतो.

अशा कामाच्या व राहण्याच्या परिस्थितीत शरीराची स्थिती जरा नादुरुस्त असता मी कामाला लागले. अंग खाजत असतानाच थोड्या दिवसांनी बरे वाटेल या आशेवर कामाला तर सुरुवात केली. पण बशा धुण्याची खोली गरम पाण्याच्या वाफेने उबट बनली होती. बशा ज्या ठिकाणी धुवावयाच्या, त्या ठिकाणी बशांतील निरनिराळे खावयाचे पदार्थ उरलेले वेगळे काढून ठेवीत, त्याचीही घाण सुटली होती. अशा स्थितीत माझे खाजणे व पित्त अधिकच वाढले व मला उबट हवेने ओकारी येऊ लागली. मी कशीबशी मला दिलेल्या नमुनेदार खोलीमध्ये गेले. त्याही

ठिकाणी अंथरुणावर वरून वाफेच्या नळांतील पाणी ठिबकताना जेव्हा मी पाहिले, त्यावेळी आगीतून फोफाट्यात गेल्याप्रमाणे मला झाले. पण करणार काय? मी तशीच अंथरुणावर निजले व आमच्या हाऊसकीपरला बटन दाबून बोलावले. ती बिचारी बाई फारच चांगली होती. तिने माझ्या अंगावर हात फिरवून मला बराच धीर दिला व डॉक्टरला बोलावून माझी प्रकृती तपासली. डॉक्टरने पित्ताचा विकार झाला आहे, असे सांगून गरम पाण्याने पहिल्या प्रथम अंग धुवावयास सांगितले व त्याने अंगाची खाज थोडी कमी होईल, असे सुचविले. माझ्या खोलीपासून अंग धुण्याची खोली २०० पावलांवर होती, त्या ठिकाणी जाऊन मी अंग धुतले. पण त्यामुळे मला भोवळ येऊन डोळ्यांपुढे अंधेरी यावयास लागली. यामुळे मी अंघोळीच्या खोलीपासून निजावयाच्या खोलीपर्यंत कधी जाऊन पोहोचते असे मला झाले. इतक्यात कर्मधर्मसंयोगाने, आमची हाऊसकीपर, तिकडे काही कामाकरिता आलेली मला दिसली व तिला मी आपल्याकडे येण्याकरिता खूण केली. नंतर मला घेरी आली व पुढे काय झाले ते मला मागाहून कळले. मला रोगी नेण्याच्या खुर्चीवर घालून खोलीपर्यंत नेले. खोलीच्या दारावर ओकावयास झाले व नर्सने भांडे आणून पुढची सर्व व्यवस्था केली व मला खोलीतील कॉटवर निजविले. मी माझ्या खोलीत चार दिवस अंथरुणावर पडून होते. खोलीत मागे वर्णन केल्याप्रमाणे कुजट व घामट घाणीने मला आजारात बराच त्रास झाला. माझी खोली पहिल्या मजल्यावर होती व त्या ठिकाणी मुदपाकखाना असल्यामुळे दररोज रोग्यांचे अन्न तयार करण्याकरिता ताज्या माशांचे व मांसाचे गाडेच्या गाडे भरून येत असत. त्याची दुर्गंधी आजारीपणात मला दररोज सहन करावी लागे. इस्पितळात या रोग्यांच्या बशा धुण्याची नोकरी पत्करली खरी, पण मी त्याच इस्पितळातील एक रोगी होऊन माझ्या बशा त्यांना धुवाव्या लागतील, ही मला पहिल्या प्रथम कल्पनादेखील नव्हती. माझ्या आजारीपणात तेथील हाऊसकीपर बाईंनी माझी चांगली काळजी घेतली. त्या बाई मजजवळ येऊन बसत. मी त्यांना "कामाला आले व अशा रितीने आजारी पडले याची मला मोठी लाज वाटते" असे सांगत असे. तेव्हा त्या मला म्हणत, "You are very clean.You are a high caste woman; you are not used to do this kind of work.It is better you should go." (तू उच्च जातीची स्त्री असून, तुझी राहणी फार स्वच्छ आहे. तुला असे इस्पितळातले घाणेरडे काम साधणे शक्य नाही. तू दुसरे काम पाहशील तर बरे). इस्पितळातील डॉक्टरच्या औषधाने जेव्हा मला लवकर गुण पडेना, तेव्हा हाऊसकीपर बाईने तिच्या ओळखीचा एक बाहेरचा डॉक्टर बोलावून आणून त्याला माझी प्रकृती दाखविली. त्याचे औषध सुरू केले. अमेरिकेतील हाऊसकीपर बाईला खरोखरी मी अगदी परकी असताना, माझी स्वकीयाप्रमाणे काळजी घेताना पाहून मला अमेरिकन स्त्रियांबद्दल मोठा आदर उत्पन्न झाला.

सुमारे सहा दिवसांनी माझी प्रकृती सुधारली. यानंतर एके दिवशी हाऊसकीपर बाईंनी मला बाहेर फिरावयास नेले. हाऊसकीपर बाईंच्या ओळखीच्या एक मिसेस बाल्डविन नावाच्या बाईच्या घरावरून आम्ही चाललो असता, मिसेस बाल्डविन यांनी हाऊसकीपर बाईना "कसे काय? बरे आहे ना?" म्हणून विचारले व माझ्यासंबंधी चौकशी केली. हाऊसकीपर बाईंनी माझी सर्व हकीगत सांगून मला एखादे मोलकरणीचे काम मिळाल्यास हवे आहे असेही सांगितले. मिसेस बाल्डविनच्या घरी एक मोलकरीण व वाढपीण पाहिजे होती. तिने लगेच मला कामावर ठेवायचे ठरवून संध्याकाळी सामान घेऊन येण्यास सांगितले. मी त्याप्रमाणे परत जाऊन माझे सामान धेऊन आले व कामावर रुजू झाले, अशा रितीने इस्पितळांतील बशा विसळण्याच्या कामाचा राजीनामा देऊन हाऊसकीपर बाईंचा मी प्रेमाने निरोप घेतला.

सिकोरबाई व प्रो. गोखले यांना मी इस्पितळात आजारी पडले, ही हकीगत मुद्दामच कळविली नव्हती; कारण त्यांना विनाकारण त्रास देण्यापेक्षा मी इस्पितळात आहे ती बरी असे मला वाटले. बरी झाल्यावर जेव्हा नवीन काम मिळाले तेव्हा सर्व हकीगत त्यांना कळवली.

मला मिळालेले नवीन घर फार चांगले होते. आमचे घरधनी मिस्टर बाल्डविन यांना जनरल इलेक्ट्रिकच्या कारखान्यात मोठ्या पगाराची नोकरी होती. मालकीणबाई मोठ्या आनंदी व प्रेमळ असत.

अमेरिकेत जेवढी घरे मला मिळाली त्यापेक्षा हे घर मला सर्वांत आवडले, पण दैवाच्या फेऱ्याने मला याही ठिकाणी गाठले व ध्यानी-मनी-स्वप्नी नसलेला असा, अमेरिकेतून माझी उचलबांगडी होण्याचा प्रसंग मजवर आला व त्या प्रसंगातून मी मोठ्या शर्तीने सुटले.

✿ ✿

# अमेरिकेतून उचलबांगडी होण्याचा प्रसंग

हॉस्पिटलमधील हाऊसकीपरच्या ओळखीने विजेच्या कारखान्यात मोठ्या कामावर असणारे मिस्टर बाल्डविन यांच्या घरी मला काम मिळाले. या ठिकाणी राहावयास निराळी खोली असून, माझ्या जेवणाची व्यवस्थाही मला हवी तशी करून देण्यात आलेली होती. या ठिकाणी स्वयंपाकिणीचे काम एक नॉर्वेजियन स्त्री करीत असे. त्या बाईंचे मजवर फार प्रेम असे व मी वनस्पत्याहारी म्हणून माझ्याबद्दल तिला विशेष आदर वाटत असे. आमच्या मालकिणीला अनुक्रमे बारा व आठ वर्षे वयाची अशी दोन मुले होती. त्यांना कपडे करणे व एकंदर सर्व घरकाम करणे ही कामे मजकडे सोपविण्यात आली होती. स्वयंपाकीण नॉर्वेजियन व घरकाम करणारी हिंदुस्थानातील बाई, अशी काम करणाऱ्या माणसांची जोड आमच्या बाल्डविन साहेबांना मिळालेली होती. आम्ही जरी नोकर होतो, तरी आमची राहण्याची व्यवस्था हिंदुस्थानातील एखाद्या कलेक्टरच्या बंगल्यातील व्यवस्थेप्रमाणे होती व आम्ही जरी मोलकरणीची कामे करीत होतो, तरी मालकीणबाई आम्हांला मोठ्या प्रेमाने व बरोबरीच्या नात्याने वागवीत असत.

अशा रितीने माझा वेळ या नवीन घरी बराच आनंदात जात असता एके दिवशी मला एक बंगाली विद्यार्थ्याने टेलिफोन करून भेटावयास बोलाविले. हे बंगाली गृहस्थ तेथील विजेच्या कारखान्यात हिंदुस्थानातून विजेचे शास्त्र शिकावयास आलेले होते व कारखान्यांत काम करणारे आमचे मालक बाल्डविन यांच्याद्वारे त्यांना माझी सर्व हकीगत कळली होती. एका शनिवारी मी त्यांना भेटावयास गेले असता, त्यांच्या व माझ्या मध्ये पुढीलप्रमाणे संभाषण झाले.

**बंगाली विद्यार्थी :** तुम्हांला प्रो. कर्वे यांनी अमेरिकेत पाठविण्याची चूक का केली?

**मी :** अमेरिकेतील शिक्षणविषयक संस्था पाहाव्या व इंग्रजी भाषेचे ज्ञान करून

घ्यावे, याकरिता त्यांनी मला इकडे पाठविले आहे.

**बंगाली विद्यार्थी :** तुम्हांला उच्च ब्राह्मण कुळात जन्म मिळालेला असता, तुम्ही या ठिकाणी यवनांच्या घरी नोकरी का करता?

**मी :** मी काही कुणाची चोरी करीत नाही. प्रामाणिकपणाने काम करून पोटाला मिळविते व फावल्या वेळी माझे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करते. यात मी काय बरे वाईट करते?

**बंगाली विद्यार्थी :** तुम्ही या देशात काम मिळविण्याकरिता बारा घरे व तेरा ओसऱ्या करीत कशाला हिंडता? तुम्ही या देशात राहू नका. तुमच्या कृतीने आम्हां हिंदवासीयांना मोठी लाज उत्पन्न झाली आहे.

**मी :** तुमच्या इतकाच मला स्वदेशाचा अभिमान आहे, मी चरितार्थाकरिता इतर हिंदी विद्यार्थ्यांप्रमाणे स्वावलंबनाचा मार्ग पत्करला आहे. यात लज्जास्पद असे मला काहीच वाटत नाही. उलट मोठे भूषण वाटते.

**बंगाली विद्यार्थी :** ते काही नाही. तुम्हांला जरी लाज वाटत नसली तरी तुम्ही अमेरिकेत मोलकरणीची कामे पत्करून यवनांच्या घरच्या कपबशा विसळणे ही गोष्ट ब्राह्मण्याला काळिमा आणणारी आहे. तुम्ही येथून स्वदेशी परत गेलेच पाहिजे.

**मी :** मजजवळ हिंदुस्थानात परत जावयास पैसे नाहीत. तुम्हाला काही व्यवस्था करता आली तर बघा, म्हणजे मी त्याचा विचार करीन.

साधारण याप्रमाणे माझे व त्या बंगाली विद्यार्थ्यांचे बरेच भाषण झाले. खरे पाहिले असता आमचे मालक बाल्डविनसाहेब हे जन्माने नसले, तरी त्यांच्या सात्त्विक वृत्तीने व गुणाने ब्राह्मणच होते. मला त्यांच्या घरी काम करण्यात कोणताच कमीपणा वाटत नव्हता. मी इतर विद्यार्थ्यांप्रमाणेच हा स्वावलंबनाचा मार्ग पत्करला होता. पण आमच्या सदरहू बंगाली बंधूंना हा मार्ग मोठा लज्जास्पद वाटला. त्यांनी माझी मारून मुटकून हिंदुस्थानात रवानगी करून देण्याकरिता कंकण बांधलेले पाहून एक नवीनच काळजी उत्पन्न झाली. आमच्या नवीन झालेल्या बंगाली बंधूंनी प्रो. शंकरराव गोखले यांना भेटून वृथा देशाभिमानाचे व खोट्या भगिनीप्रेमाचे आपले सर्व पुराण सांगितले व त्यांनीही कोणी सोबत मिळत असल्यास प्रवास खर्चाची व्यवस्था मी करतो, असे उत्तर त्या बंगाली बंधूच्या कटकटीतून मोकळे होण्यासाठी देऊन टाकले. शंकररावांच्या या अकल्पित मिळालेल्या रुकाराने आमच्या बंगाली बंधूंना माझ्याविषयी वाटणाऱ्या प्रेमाला नवीन भरते आले व त्यांनी माझी अमेरिकेतून स्वदेशी परत जाण्याची इच्छा आहे का नाही याचा विशेष विचार न करता, माझी उचलबांगडी करण्याची सर्व व्यवस्था मला न विचारता चालविली.

याच सुमारास ब्रह्मदेशचा लिआन या नावाचा एक विद्यार्थी स्वदेशी जावयास निघाला आहे, ही बातमी आमच्या बंगाली बंधूस कळली. त्याने त्याच्याबरोबर मला पाठविण्याचे ठरवून बोटीचे तिकीट वगैरेसुद्धा घेऊन टाकले. ट्रंक व सूटकेस

आणून माझ्या मुलाप्रमाणे माझी बांधाबांध करण्यास ते मला मदत करू लागले. मी आता जाणार म्हणून शंकररावांनी त्यांचा विजेचा कारखाना मला दाखविला व मला मोठ्या प्रेमाने निरोप दिला. माझ्या मनात जरी अमेरिकेतून जायचे नव्हते, तरी माझ्या जाण्याने माझ्या एका बंगाली बंधूचे समाधान होत असल्यास आपण आपल्या स्वार्थावर पाणी सोडण्यास तयार झाले पाहिजे, असे मी माझ्या मनाशी ठरविले होते. आमच्या बंगाली बंधूनेही माझ्या रवानगीची इतकी कडेकोट व जय्यत तयारी चालविली होती की, त्या वेळी मी जर नाही म्हटले असते, तर परदेशी परकीय लोकांच्या समक्ष बंगाली विरुद्ध महाराष्ट्रीय स्त्री अशा परस्पर कलहाचे व बेबनावाचे एक लहानसे नाटकच दिसले असते. ही सर्व शोभा टाळण्याच्या हेतूने, आमच्या बंगाली बंधूंना, त्यांच्या समाधानाकरिता व आत्मशांतिकरिता मी माझ्या अमेरिकेतल्या आयुष्याचे सूत्रधार होऊ दिले. ते दाखवितील ती वाट, करतील ते प्रमाण, असे ठरवून मी यापुढे वागू लागले. आमच्या बंगाली बंधूंना मी चरितार्थाकरिता बारा घरे व तेरा ओसऱ्या करीत फिरते, हे फार लाजिरवाणे आहे असे अगदी मनापासून वाटत होते व त्यांचे हेतू अगदी शुद्ध व प्रामाणिक होते यात काहीच शंका नाही. मला स्वदेशी परत पाठविणे हे ते एक भगिनीकार्य म्हणूनच करीत होते. याबद्दल माझी पूर्ण खात्री झाल्यामुळेच मी विशेष विरोध न करता देवावर भार ठेवून, काय होईल ते पाहण्याचे ठरविले व मोठ्या दु:खाने बाल्डविन कुटुंबातील मंडळी, सिकोरबाई व शंकरराव या सर्व प्रेमळ मंडळींचा शेवटचा निरोप घेऊन मी आमच्या बंगाली बंधूंबरोबर सिनक्टडी सोडून न्यूयॉर्कला जावयास निघाले.

न्यूयॉर्कला आल्यावर वाय. डब्ल्यू. सी. ए. या ख्रिस्त भगिनी मंडळाच्या संस्थेत मला ठेवण्यात आले. 'जिथे ठेवीन तिथे राहीन व कोणालाही भेटावयास जाणार नाही.' अशा दोन अटी बंगाली विद्यार्थ्याने मजकडून कबूल करून घेतल्या व मला या संस्थेत आणून तेथील व्यवस्थापक बाईंच्या स्वाधीन करण्यात आले. तेथे आल्यावर बंगाली बंधूंनी "मी एका दक्षिणीबाईला यवनाच्या घरच्या दास्यवृत्तीतून सोडवून तिची स्वदेशी रवानगी करण्याकरिता न्यूयॉर्कला आणली आहे, तिला पाहावयाचे असेल तर या" असे आपल्या न्यूयॉर्क येथील मित्रमंडळीस कळविले व तसे कळताच तेथील वेदान्त आश्रमातील स्वामी बोधानंद व सुरेंद्र बोस या नावाचे विद्यार्थी व त्यांचे इतर तीन-चार बंगाली मित्र अशी मंडळी माझे दर्शन घ्यावयास व आपल्या मित्राच्या पराक्रमाचे कौतुक करावयास तेथे आली. ही मंडळी आल्यावर त्यांनी मी सुखाने स्वदेशी जात आहे काय, म्हणून प्रश्न विचारला. मी त्यांना नाही म्हणून उत्तर दिले. ज्या कामाकरिता मी आले ते काहीच साध्य न होता मला परत जावे लागत आहे, हे मला मोठे लज्जास्पद वाटत आहे, असे मी त्यांना सांगितले. "तुम्ही निरनिराळ्या घरी कामे करीत का हिंडता?" असा प्रश्न विचारल्याबरोबर, निरनिराळ्या कुटुंबांतील अनुभव मिळावा या हेतूने मी तसे करते व मला जेथे इंग्रजी

शिकता येईल व अमेरिकेतील निरनिराळ्या संस्था पाहण्याची संधी ज्या ठिकाणी मिळेल अशा घरीच मी काम करावयाची इच्छा करणार व अशी ठिकाणे फारच थोडी असल्याने मला निरनिराळ्या ठिकाणी जावे लागते, त्यात माझा काय दोष आहे, असे त्यांना मी विचारले. यावर "तर मग तुम्ही स्वदेशी इतक्या लवकर का जाता?" असे विचारल्यावर मी माझ्या बंगाली बंधूंना तसे वचन दिले आहे व माझ्या जाण्याने त्याच्या मनाला शांती व समाधान वाटेल अशी माझी खात्री आहे, म्हणून मोठ्या नाखुषीने जाण्याचे मी ठरविले आहे, असे सांगितले.

माझ्याबरोबर स्वामी बोधानंद व सुरेंद्र बोस यांचे भाषण झाल्यावर आमचे बंगाली बंधू व त्यांचे इतर बंगाली मित्र यांच्यामध्ये माझ्या इच्छेविरुद्ध केवळ मी नोकरी करून चरितार्थ चालविते या सबबीवर मला परत स्वदेशी पाठवून देणे योग्य की अयोग्य, या विषयावर चर्चा सुरू झाली. त्यांच्या चर्चेमध्ये ही सुरेंद्र व इतर बंगाली विद्यार्थ्यांनी ब्राह्मणाच्या स्त्रीने यवनाच्या घरी मोलकरणीचे काम करणे हे मुळीच कमीपणा आणणारे नाही व आम्हीही ब्राह्मणपुत्र जर अनेक वेळा यवनांच्या घरी मजुरीची कामे करतो, तर आमच्या भगिनींनी आत्मोन्नतीकरिता आमचे अनुकरण करण्यास काय हरकत आहे, हेच मत प्रस्थापित केलेले दिसते. सुरेंद्रबाबू यांनी मला एकीकडे बोलावून, तुम्हांला राहावयाचे असेल तर सांगा, मी माझ्या मित्राच्या विरुद्ध तुम्हांला मदत करीन असे सांगितले, पण मी त्यांना माझ्या बंधूंना माझ्या राहण्याने शत्रू बनवायचे नाही व मी त्यांना जाण्याविषयी दिलेले वचन काही झाले तरी पाळणार, असेच सांगितले.

बंगाली मित्रमंडळीत मला स्वदेशी सक्तीने पाठविण्याच्या न्याय्यान्याय्यतेसंबंधी वादविवाद चालला असता सुरेंद्र बाबूंनी डॉ. हर्डीकर यांना मी महाराष्ट्रीय असल्याने बोलावून आणले. डॉ. हर्डीकर आता माझी या बंगाली बंधूंपासून कशी सुटका करतात व या कठीण परिस्थितीतून कसा मार्ग काढतात, याविषयी मला काळजी उत्पन्न झाली व थोडी आशाही पण वाटू लागली. डॉ. हर्डीकर यांनी माझी हकीगत ऐकून घेतल्यावर "मी पार्वतीबाईंची सर्व जबाबदारी मजवर घेण्यास तयार आहे," असे सांगून त्यांना माझ्या हवाली करा असे आपल्या बंगाली मित्रांना सांगितले. स्वामी बोधानंद व सुरेंद्र हे दोघेही मला हर्डीकर यांच्या स्वाधीन करून मला माझ्या इच्छेविरुद्ध स्वदेशी पाठविण्याच्या कार्यापासून आमचे बंधूचे मन वळवू लागले. आमचे बंगाली बंधू आतापर्यंत वादविवादात विशेष भाग घेत नव्हते, पण जेव्हा त्यांनी आपल्या भगिनीकार्यात डॉ. हर्डीकर यांनी आणलेले मोठेच संकट पाहिले, तेव्हा "पार्वतीबाई मला दिलेले वचन मोडीत आहेत व मी बाईंना शंकरराव गोखले यांच्या परवानगीशिवाय तुमच्या हवाली करण्यास तयार नाही," असे सांगून मला डॉ. हर्डीकर यांच्या स्वाधीन करण्याचे नाकारले. हे उत्तर ऐकताच डॉ. हर्डीकर यांनी शंकररावांशी सिनक्टडीला टेलिफोनच्या द्वारे प्रत्यक्ष बोलण्याचे ठरविले व त्याप्रमाणे

त्यांनी बोलण्यासही सुरुवात केली. आता शंकरराव काय उत्तर देतात यावर माझे पुढील नशीब अवलंबून आहे, असे मला वाटू लागले व ती पंधरा-वीस मिनिटे माझी अत्यंत काळजीत गेली. "पार्वतीबाई आता लहान नाहीत, त्यांची इच्छा असेल त्याप्रमाणे करा." असा शंकरराव यांच्याकडून निरोप आल्यामुळे माझ्याभोवती उत्पन्न झालेल्या निराशेच्या अंधकारात एक नवीन आशेचा किरण उत्पन्न झाला व आमच्या बंगाली बंधूंच्या भगिनीकार्याचे मनोराज्य एकदम ढासळले. पैसे भरून हिंदुस्थानचे तिकीट आमच्या बंगाली बंधूने काढले होते व ते पैसे शंकरराव यांचे असल्यामुळे ते आता कसे परत मिळतात, ही एक नवीनच काळजी मला उत्पन्न झाली. पण आपल्या इतर नवीन बंगाली मित्रांच्या खटपटीने १०/१२ डॉलर दंड भरून पैसे परत मिळविण्यात आले व ते शंकररावांकडे परत पाठविण्याची मी व्यवस्था केली; तेव्हा माझा जीव एकदाचा खाली पडला.

या प्रसंगातून मी खरोखरीच मोठ्या शर्थीने व अण्णांच्या पुण्याईनेच वाचले. या प्रसंगी मला झालेली माझ्या महाराष्ट्रीय बंधूंची मदत मी केव्हाही विसरणार नाही. यानंतर आमचे बंगाली बंधू सिनक्टडीलाच विद्यार्जन करीत असल्यामुळे तिकडे परत जावयाचे नाही, असे मी ठरविले. पुढे न्यूयॉर्कलाच राहून नवीन मित्रमंडळींच्या मदतीने काम मिळवून आपले उद्दिष्ट साध्य करण्याचे ठरविले आणि शेवटी सर्व बंगाली मित्रांचे व आमच्या बंगाली बंधूचे मन:पूर्वक आभार मानले व त्यांची मी रजा घेतली.

✿ ✿

# न्यूयॉर्क येथील अनुभव

मी ज्या वेळी न्यूयॉर्कमध्ये राहत असे त्या वेळी लाला रजपतराय व डॉ. हर्डीकर हे 'यंग इंडिया ऑफिस'च्या द्वारे हिंदुस्थानासंबंधी राजकीय चळवळीचे अमेरिकेतील काम मोठ्या प्रयत्नाने करीत असत. 'यंग इंडिया' या संस्थेकडून न्यूयॉर्क येथील हिंदी लोकांना इंग्रजी शिकविण्याकरिता रात्रीची शाळा चालविण्यात येत असे, पण ही शाळा मी ज्या ख्रिस्त भगिनी मंडळाच्या संस्थेत राहत होते, त्या ठिकाणापासून फार लांब असल्याने, तिचा मला विशेष फायदा घेता आला नाही.

आयात व निर्गत मालाचा व्यापार करणारे श्री. ठक्कर यांच्याबरोबर माझा परिचय 'यंग इंडिया' ऑफिसात लालाजींनी करून दिला व त्यांना मला काही घरकाम असल्यास आपल्या घरी नोकरीला ठेवण्याविषयी त्यांनी माझी शिफारस केली. ठक्कर हे न्यूयॉर्कजवळील ब्रुकलिन शहरी राहत असत व त्यांनी आइसलंडमधील एका बाईशी लग्न केले होते. त्यांना दोन सुंदर मुले होती. थोरल्याचे मनू व दुसऱ्याचे विक्रमादित्य अशी नावे होती. ठक्कर यांच्या घरी स्वयंपाक करणे, पाणी भरणे, लहान लहान मुलांची 'डायापर' ऊर्फ हगोली धुणे या कामावर माझी नेमणूक झाली. यांच्या कुटुंबांना सहा-सात भाषा येत होत्या. पण त्यांना त्यांच्या इतर कामांमुळे शिकवावयास व मला माझ्या घरातील कामामुळे शिकावयास वेळच सापडत नसे. त्यांच्या घरी मी तीन आठवडे काम केले. शेवटी ठक्कर यांच्याकडे आपले उद्दिष्ट साध्य होणे शक्य नाही, असे मला दिसून आल्यामुळे मी पुन्हा न्यूयॉर्कला आले व नोकरी शोधण्याकरिता खटपट चालविली.

अमेरिकेत मोलकरणीची नोकरी शोधावयाची म्हणजे मी रस्त्यांतून घरावरील 'Rented Rooms' अथवा 'भाड्याने देण्याकरिता खोल्या' या नावाच्या पाट्या पाहत जावयाचे व ज्या ठिकाणी अशी पाटी दिसेल त्या ठिकाणी बटण दाबून मालकीण बाहेर आली म्हणजे खोलीविषयी व कामाविषयी अशी दुहेरी चौकशी

करावयाची, अशी पद्धत मी येथे सुरू ठेविली होती. अमेरिकेतील कोणत्याही घरामध्ये कामाशिवाय प्रवेश होणेच शक्य नसते. सर्व बाहेरील दारे थंडीमुळे लावलेली असतात. बटण दाबून नुसत्या नोकरीची चौकशी करणे, हे तिकडल्या शिष्टाचाराला सोडून असते; म्हणून खोलीची चौकशी करावयाला जावयाचे. खोली नसल्यास मोलकरणीचे काम करून मी भाडे देईन, अशा रितीने नोकरीचा प्रश्न पुढे मांडावयाचा असा क्रम मी सुरू ठेविला होता. या क्रमाप्रमाणे एके दिवशी 'भाड्याने देण्याकरिता खोल्या' अशी पाटी पाहून मी एका घराच्या पुढील दरवाजाजवळचे बटण दाबले, तो एक स्कॉचबाई दार उघडून बाहेर आल्या. त्यांचे नाव मिसेस मरे असे होते. यांचे यजमान खेड्यावर शेतीचे काम करीत असत. या बाईंकडे मला देण्याजोगे काम असल्यामुळे तिने लगेच मला कामावर ठेवून घेतले. या बाईच्या घरात १५ खोल्या होत्या व १८ भाडेकरू होते. या घरी मला झाडलोट करण्याचे काम म्हणजे अमेरिकेत ज्याला 'चेंबरवर्क' म्हणतात ते मिळाले.

अमेरिकेतील गरीब स्थितीतील कुटुंबे भर रस्त्यावर मोठी घरे भाड्याने घेतात व त्यांतील प्रत्येक घर, खोल्या, टेबले, खुर्च्या, पलंग व कपाटे, इत्यादी सामानाने सुशोभित करतात. प्रत्येक खोलीतील पलंगावर बिछाना, पलंगपोस, पांघरूण, इ. निजण्याच्या सामानाची व्यवस्था या घरमालकिणी ज्यांना इंग्रजीत 'हाऊसकीपर' म्हणतात, त्या ठेवीत असतात. एका लहान खोलीचे कमीत कमी ३६ रु. भाडे पडते. या खर्चात सामानसुमानाचे भाडे, गॅस अथवा विजेचा आकार, बिछाना व दररोजची खोली झाडणावळ इतक्या निरनिराळ्या गोष्टींचा आकार येत असतो. कित्येक वेळा या घरातून रुमर्संना (भाडेकरूंना) सकाळची न्याहारी देण्याचीही व्यवस्था केलेली असते. याबद्दल निराळा आकार द्यावा लागतो. अशा रितीने भाडेकरी ठेवून अमेरिकेतील अनेक गरीब कुटुंबे आपला चरितार्थ चालवितात.

या स्कॉचबाईकडे मी सहा आठवडे कामाला होते. पुढे तिला गरिबी आल्यामुळे ही घरकामे ती स्वत:च करू लागली व मग मला पुन्हा नोकरी पाहण्याच्या मोहिमेवर निघावे लागले. नवीन ठिकाणी नोकरी मिळेपर्यंत मी जुने घर सोडीत नसे. नोकरीकरिता हिंडत असता एके दिवशी 'भाड्याने द्यावयाच्या खोल्या' अशी पाटी पाहून मी पुढील दाराजवळ जाऊन बटण दाबले. बटण दाबताच घराची मालकीण एक आयरिशबाई दार उघडून बाहेर आली. तिच्या माझ्यामध्ये पहिल्या धूळभेटीच्या वेळी जो संवाद झाला, तो मजेचा वाटल्यामुळे जशाच्या तसा मी खाली देत आहे.

**मी** : आपल्या घरी खोली अथवा काम मिळेल काय?

**आयरिशबाई** : तू भटकणारी बाई आहेस काय? (Are you a Gypay?)

**मी** : नाही. मी तुम्ही सांगता तशी बाई नाही. (No. I am not a Gypsy)

**आयरिशबाई** : तर मग तू कोण आहेस? इंडियन अगर ब्रिटिश आहेस काय? (Then who are you? Are you Indian or British?)

**मी** : होय. मी इंडियन असून ब्रिटिश इंडियन आहे.

**आयरिशबाई** : तर मग तुला मला खोली अगर कामही देता येणार नाही. (I have no room, no work)

**मी** : असे का बरे! (Why so?)

**आयरिशबाई** : ब्रिटिश लोक वाईट असतात. (British are very bad people)

**मी** : सर्वच ब्रिटिश लोक वाईट असतात काय? (Are all the British bad?)

**आयरिशबाई** : तसे नाही. काही ब्रिटिश लोक फार चांगले असतात. (Oh no, some are very good)

**मी** : ते कोण आहेत! (Who are they?)

**आयरिशबाई** : ब्रॉडवे घन नं. १४०० मध्ये राहणारे लालजी व हर्डीकर हे ब्रिटिश इंडियन फार चांगले आहेत. (Lalaji and Hardikar on 1400 Broadway)

**मी** : ते व मी एकाच देशातील आहोत. ते मला नातेवाइकाप्रमाणे आहेत. (We are same: they are like my relations)

**आयरिशबाई** : (हस्तांदोलन करून) तर मग हे सर्व घर तुझेच आहे. वाटेल तिकडे रहा व काम कर. (All the House is yours)

वर लिहिल्याप्रमाणे प्रस्तावना होऊन मी या आयरिशबाईच्या घरी कामाला राहिले. हिच्या घरी १८ भाडेकरी राहत असत व ही मला दर आठवड्यास पाच डॉलरप्रमाणे पगार देत असते. या बाईचे नाव मिसेस शीही (Mrs. Shehe) असे होते. या बाईचे यजमान एका कारखान्यात दारूची पिंपे वाहण्याचे हमालीचे काम करीत असत. मिसेस शीही मला दूध, फळे, ब्रेड, लोणी इत्यादी जिन्नस खावयास देत असे व मजवर प्रेम करी. ही बाई जरी आपला उदरनिर्वाह भाडेकरी ठेवून करीत असे, तरी तिला तिची मातृभूमी जो आयर्लंड देश त्याविषयी फार अभिमान वाटे. आयर्लंडच्या स्वातंत्र्याकरिता ज्यांनी आपले देह धारातीर्थी ठेविले अशा सर्व आयरिश देशभक्तांचे फोटो तिच्या निजावयाच्या खोलीत टांगलेले हाते. दररोज या फोटोंचे दर्शन घेतल्याशिवाय व आयर्लंडच्या स्वातंत्र्याकरिता प्रार्थना केल्याशिवाय ही बाई निजावयास जात नसे. सायंकाळच्या वेळी तिकडल्या रिवाजाप्रमाणे सर्व लोक संध्याकाळी आठ वाजताच जेवून खाऊन सिनेमा, नाटक अगर सभा वगैरेस जावयास बाहेर पडत. रस्त्यांतून विजेचे दिवे लावल्यामुळे सर्व ठिकाणी प्रकाश पडत असतो. अशा वेळी आमची मालकीण 'आयरिश लोकसत्ताक राज्याला मदत करा', 'आयरिश स्वातंत्र्याला मदत करा' अशी ठळक अक्षरे लिहिलेली एक टिनची लहानशी पैसाफंडासारखी पेटी घेऊन हमरस्त्यांतील प्रमुख ठिकाणी फिरून कधी १५ रुपये, तर कधी २० रुपये अशी मदत मागून आणीत असे. ती फावल्या वेळी

आयरिश वर्तमानपत्रे व मासिक-पुस्तके वाची. या बाईचे शिक्षणही प्राथमिक शिक्षणापलीकडे झालेले नव्हते. अशा गरीब व अज्ञानी आयरिश स्त्रीचा देशाभिमान व देशकार्याविषयी कळकळ पाहून, अशा स्त्रिया ज्या ठिकाणी जन्मास येतात त्या देशाला लवकरच स्वातंत्र्य मिळणार; असे त्याच वेळी मी भाकीत केले होते. या बाईंच्या घरी राहूनच मी पहिल्या प्रथम तिच्या घरातील भाडेकऱ्यांकडून आश्रमाला २५ डॉलर (७५ रुपये) मदत मिळविली व हिंगण्याच्या आश्रमासाठी अमेरिकेत मदत मिळविण्याच्या माझ्या कार्यास मी त्या ठिकाणी पहिल्या प्रथम आरंभ केला. मिसेस शीहीच्या उत्तेजनामुळे मी रात्रीच्या शाळेतही इंग्रजी शिकण्यास जाऊ लागले. तिच्या घरूनच मी 'यंग इंडिया' ऑफिसात गेले असताना, त्या ठिकाणी डॉ. हर्डीकर यांनी माझी ब्रुकलिन या शहरी राहणाऱ्या मिस ओरेयली या नावाच्या उदारमतवादी बाईशी ओळख करून दिली. त्या बाईने 'पार्वतीबाईंना वॉशिंग्टन येथे भरणाऱ्या सर्वराष्ट्रीय मजूर परिषदेला अमेरिकेतील हिंदी स्त्रीमजुरांच्या प्रतिनिधी म्हणून का पाठवीत नाही?' असे डॉ. हर्डीकर यांना विचारले असता, "पैसे नसल्यामुळे आम्हाला तसे करता येत नाही," असे डॉ. हर्डीकर यांनी सांगितले. "बरे, मी पुढे जाऊन यासंबंधी खटपट करून पाहते," असे तिने उत्तर दिले व त्या बाई वॉशिंग्टनला पुढे निघून गेल्या. त्या गेल्या त्या वेळी मला वॉशिंग्टनला जावयाची संधी येईल, असे माझ्या स्वप्नीसुद्धा आले नव्हते. दोन आठवडे होऊन गेल्यानंतर मला तिकडे कधी जाता येईल ही आशाही मी सोडून दिली होती. एके दिवशी सकाळी नवीन काम पाहून ठेवलेल्या ठिकाणी जावयाच्या गडबडीत असताना शीहीकडे माझ्या नावाने 'यंग इंडिया' ऑफिसातून एक टेलिफोन आला. टेलिफोनजवळ जाते तो खरेच डॉ. हर्डीकर यांनी त्याच दिवशीच्या गाडीने ओरेयलीच्या बोलावण्यावरून वॉशिंग्टनला जाण्याविषयी मला सांगितले. वॉशिंग्टनला मला पाठवून देण्याकरिता ओरेयलीची तार आलेली होती व तिने माझे रेल्वेचे तिकीट व तिकडील सर्व व्यवस्था करून ती स्टेशनावर मला नेण्याकरिता येणार होती, असे मला मागाहून डॉ. हर्डीकरांनी सांगितले. त्याच दिवशी माझी सर्व व्यवस्था करून, डॉ. हर्डीकरांनी मला स्टेशनावर नेऊन वॉशिंग्टनच्या गाडीत बसविले.

✿ ✿

# आंतरराष्ट्रीय मजूर परिषद

युरोपातील पहिल्या महायुद्धानंतर ज्या अनेक परिषदा भरविल्या गेल्या त्या परिषदांपैकी ही मजूर-परिषद वॉशिंग्टन येथे १९१९ या वर्षी सर्व राष्ट्रांकडून भरविण्यात आली होती. त्या परिषदेत पुरुषमजुरांची परिषद व स्त्रीमजुरांची परिषद असे दोन विभाग करण्यात आले होते. पुरुषमजुरांच्या परिषदेत हिंदुस्थानतर्फे श्रीयुत बी. पी. वाडिया व श्रीयुत नारायण मल्हार जोशी यांची नेमणूक झाली होती व ते दोघेही पुढारी परिषदेला आलेले होते. स्त्रीमजुरांच्या परिषदेत मी अमेरिकेला हिंदी स्त्रीमजुरांच्या तर्फे एक प्रतिनिधी म्हणून गेले होते. अमेरिकेतील कॅलिफोर्निया, न्यूयॉर्क व इतर संस्थानांतून हिंदी पुरुषांबरोबर हिंदी स्त्रियाही मजुरांची कामे करून आपला चरितार्थ चालवीत आहेत. त्यांची संख्या जरी थोडी असली तरी त्यांच्या मार्गांत अनेक अडचणी आहेत व त्यांना अनेक अन्यायी व जुलमी कायद्यांचा त्रास सहन करावा लागतो.

न्यूयॉर्कपासून अमेरिकेची राजधानी जे वॉशिंग्टन शहर ते सहा तासांच्या रेल्वे रस्त्यावर आहे. मी या ठिकाणी सायंकाळी सहा वाजता जाऊन पोहोचले. स्टेशनवर ओरेयली, ओरेयलीची वृद्ध मातोश्री व ओरेयलीचे मित्र मिस्टर व मिसेस किंग ही मंडळी माझे स्वागत करण्याकरिता आलेली होती. त्यांनी परिषदेकरिता मला पाच-सहा दिवस राहावे लागेल म्हणून एक खोली भाड्याने घेतली होती. मिस्टर किंग यांच्याकडे अल्पोपहार झाल्यानंतर, त्या दिवशी रात्री मी माझ्याकरिता घेतलेल्या खोलीत निजावयास गेले.

परिषदेचे काम पाच-दिवस चालले होते. दररोज सकाळी ९ ते १२ व दुपारी २ ते ५ अशा बैठकीच्या वेळा असत. मजूर स्त्रियांच्या परिषदेत एकंदर निरनिराळ्या अठरा राष्ट्रांच्या प्रतिनिधी स्त्रिया हजर होत्या. प्रत्येक प्रतिनिधी स्त्रीने आपण लिहून आणलेले भाषण आपल्या मातृभाषेतून वाचून दाखवायचे व नंतर त्याचा सारांश

इंग्रजीमध्ये दुभाषी स्त्रियांनी समजावून सांगावयाचा असा क्रम होता. मी आपले परिषदेत करावयाचे भाषण इंग्रजीत लिहून तयार ठेवले होते व ते मी मराठीत बोलून दाखवायचे व ओरेयलीने त्याचे इंग्रजी भाषांतर परिषदेत वाचून दाखवायचे असे ठरले होते. ओरेयलीनेही आयर्लंडमधील स्त्रीमजुरांची प्रतिनिधी म्हणून भाषण तयार ठेवले होते; पण परिषदेच्या रिसेप्शन कमिटीने आयर्लंड व हिंदुस्थानमधील स्त्रीमजुरांच्या प्रतिनिधींना भाषणे करण्याची परवानगी आयत्या वेळी रद्द केली, यामुळे आमची दोघींचीही बरीच निराशा झाली. ओरेयलीच्या खटपटीने माझे नाव प्रतिनिधींच्या यादीत घालू दिले, हीच मोठी कामगिरी झाली असे मी समजते.

या परिषदेत खालील ठराव पास झाले —

१. स्त्रियांच्या मजुरीचे तास आठ करण्यात यावेत.
२. स्त्रीमजुरांचा पगार वाढविण्यात यावा.
३. स्त्रीमजुरांची राहण्याची घरे सुधारावी.
४. स्त्रीमजुरांना डॉक्टर व नर्स यांची मदत देण्याची व्यवस्था कारखानदारांनी करावी.
५. स्त्रीमजुरांच्या शिक्षणाकरिता रात्रीच्या शाळा कारखानदारांनी उघडाव्या.
६. चौदा वर्षांच्या आतील मुलामुलींना कोणत्याही कारखान्यांत रोजगारी मिळू नये. मिळाल्यास थोडे तास मिळावी व त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था कारखानदारांनी करावी.
७. मजूर स्त्रियांच्या लहान मुलांच्या संगोपनाची व्यवस्था कारखानदारांनी आपल्या खर्चाने केली पाहिजे.

परिषदेचे काम दररोज पाच वाजता आटोपत असे व त्यानंतर ओरेयली व तिच्या ओळखीच्या इतर स्त्रिया मोटारमधून वॉशिंग्टन येथील प्रेक्षणीय ऐतिहासिक, औद्योगिक व शिक्षणविषयक स्थळे पाहावयास जात असत. त्यांच्या या दररोजच्या सहलीत ओरेयली मला घेऊन जाण्यास विसरत नसे व त्यामुळे माझ्यासारख्या अपरिचित व परद्वीपस्थ स्त्रीस अमेरिकेच्या मुख्य राजधानीमधील बरीच स्थळे पाहण्याची सुवर्णसंधी मिळाली. या संधीचा मी पूर्णपणे फायदा घेतला व तिकडची अनेक स्थळे पाहिली. विशेषत: वॉशिंग्टन येथील भव्य व नमुनेदार वाचनालय व टांकसाळ ही दोन ठिकाणे आम्हांला अत्यंत प्रेक्षणीय वाटली. टांकसाळीच्या मुख्य अधिकाऱ्यांनी निरनिराळ्या राष्ट्रांच्या ५०० बायकांना टांकसाळीत एक थाटाची चहापार्टी दिली. त्यावेळी निरनिराळ्या राष्ट्रातील स्त्रीप्रतिनिधींची परस्परांशी ओळख करून घेण्याची संधी प्राप्त झाली. चहापार्टीच्या वेळी अमेरिकेतील नोटा कशा छापल्या जातात व डॉलर (नाणी) कसे केले जातात, याचे मोठ्या चित्ताकर्षक रितीने वर्णन करण्यात आले.

या मजूर परिषदेला गेल्यामुळे मला अनेक फायदे झाले. त्यापैकी मुख्य व

महत्वाचा फायदा म्हणजे स्त्रीमजुरांची वाली ब्रुकलिन येथे राहणारी बाई ओरेयली इजबरोबर माझा दाट परिचय झाला व आम्हा दोघींचा चांगला स्नेह जमला. परिषद संपण्यापूर्वी एक दिवस ओरेयलीने मला मनाप्रमाणे काम मिळते का नाही व इंग्रजी शिकणे व संस्थेकरता पैसे मिळवणे हे माझे दोन हेतू साध्य होतात का नाही, याविषयी मजजवळ चौकशी केली आणि 'तुला मालकीण कशी पाहिजे?' म्हणूनही विचारपूस केली. 'आतापर्यंत मी पुष्कळ खटपट केली, पण मला इंग्रजी शिकविणारी मालकीण मिळत नाही.' असे मी तिला सांगितले. हे ऐकल्याबरोबर ओरेयलीने आपल्या मातोश्रींचा सल्ला घेऊन मला आपल्या घरी ठेवून घेण्याचे ठरविले व 'माझ्या आईबरोबर तू ब्रुकलिनला जातेस का?' म्हणून विचारले. मलाही कुठेतरी काम पाहिजेच होते. ही आलेली संधी मी न दवडता ओरेयलीच्या आईबरोबर ब्रुकलिनला तिच्या राहत्या घरी जाऊन दाखल झाले.

✿ ✿

# ओरेयलीच्या घरी

मला माझ्या सुदैवाने लाभलेली माझी नवी मालकीण ओरेयली ही आपल्या मातोश्रींसह न्यूयॉर्कजवळील ब्रुकलिन शहरी आपल्या स्वत:च्या लहानशा घरात मोठ्या आनंदाने राहत असे.

ओरेयलीची आई आपल्या तरुणपणात ड्रेस-मेकरचा धंदा करीत असे. तिच्या वयाच्या सत्तावीस-अठ्ठाविसाव्या वर्षी तिचे लग्न झाले व तिला एक-दोन वर्षांतच एक मुलगी झाली व लगेच नवरा वारला. आपल्या वैधव्यातच आपला धंदा पुढे चालवून या बाईने आपल्या एकुलत्या एका मुलीला सर्व शिक्षण देऊन तेथील एका टेक्निकल स्कूलची पदवीधर केले. हीच माझी मालकीण ओरेयली होय. मी ज्या वेळी या मायलेकीबरोबर राहावयास गेले, त्या वेळी आईचे वय ८१ वर्षांचे व मुलीचे वय ५३ वर्षांचे होते. माझ्या मालकिणीने विवाह केला नव्हता. टेक्निकल स्कूलची ग्रॅज्युएट झाल्यानंतर ओरेयलीने आपल्या कल्पनेप्रमाणे स्त्रियांकरिता एक 'ट्रेड स्कूल' (उद्योगधंदे-शाळा) काढले व ते पंधरा वर्षांपर्यंत स्वत: चालवून ते चांगल्या स्थितीत भरभराटीस आल्यावर अमेरिकन सरकारच्या स्वाधीन केले. या ट्रेड स्कूलमध्ये स्त्रियांना करता येण्यासारखे चरितार्थाचे धंदे सोपपत्तिक व सप्रयोग शिकविले जातात. सध्या या शाळेत सुमारे १०००/१५०० मुली आपल्या पोटापाण्याची सोय करण्याकरिता निरनिराळी कामे शिकत आहेत. या शाळेत टोप्या तयार करणे, पोशाख तयार करणे, लोकरीचे स्वेटर्स तयार करणे, अल्पोपाहाराकरिता उपहारगृहे चालविणे, कारकुनीची कामे शिकविणे, पाकशास्त्राची शाखा चालविणे, इत्यादी निरनिराळ्या धंद्यांच्या शाखा चालू असतात व विद्यार्थिनी आपली पूर्वतयारी, आवड व उद्दिष्ट या दृष्टीने निरनिराळ्या धंद्यांची सप्रयोग माहिती करून घेतात व नंतर या ट्रेड स्कूलच्या ग्रॅज्युएट म्हणून बाहेर पडतात.

माझी मालकीण ओरेयली या शाळेची संस्थापक (फाउंडर) होती व तिने या

शाळेच्या बाल्यावस्थेपासून त्या ठिकाणी बरीच वर्षे काम केलेले होते. शाळा सोडल्यानंतर ती व तिची आई आपला वृद्धापकाळ, मिळवून ठेविलेल्या शिलकीवर काटकसरीने व गरिबीने राहून, घालवीत असावीत असे दिसले.

ओरेयली व तिची आई जरी गरिबीने चरितार्थ चालवीत, तरी त्यांच्या घरातील व्यवस्था व टापटीप अगदी नमुनेदार व अत्यंत प्रेक्षणीय अशी असे. ओरेयलीने मला एक लहानशी खोली दिली होती व ती खोली माझ्याकरिता उत्तम रितीने शृंगारून ठेवण्याची कामगिरी तिने स्वत: आपणाकडे घेतली. मला काय हवे नको ते विचारले व माझी घरच्याप्रमाणे सर्व व्यवस्था करून दिली. माझी इंग्रजी शिकण्यासंबंधी विशेष जिज्ञासा पाहून ओरेयलीने प्रायमर आणून मला दररोज इंग्रजी शिकविण्याचे व्रत सुरू ठेविले.

मला मिळालेल्या नवीन घरात फक्त मायलेकी असल्यामुळे झाडलोट, सकाळची न्याहारीची तयारी करणे, इत्यादी अगदी सोप्या कामांखेरीज मला फार कामे करण्याचा प्रसंग येत नसे. या मायलेकीही बहुतेक वनस्पत्याहारी असल्यामुळे मला त्यांच्या घरी खाण्यासंबंधी विशेष अडचण अशी कधीच भासली नाही. अशा रितीने मला माझे उद्देश साध्य करून घेण्याकरिता, अमेरिकेत काम करून घ्यावयास जशी घरधनीण मिळावयास पाहिजे होती; तशी घरधनीण ईश्वरकृपेने मिळाली व पुढे पुढे मी एक ओरेयलीच्या कुटुंबातीलच आहे असे मला वाटू लागले. माझे ओरेयलीच्या घरचे दिवस मोठ्या आनंदात गेले. मी या नवीन घरी वर्ष सव्वावर्षे काढिले. या मुदतीत अमेरिकेत येऊन जे जे काय पाहावयाचे होते व जे जे काय शिकावयाचे होते त्यातील बहुतेक गोष्टी मला ओरेयलीच्या कृपेने व मदतीने करता आल्या. याबद्दल ओरेयलीची मला कधी काळी उतराई होत येईल की नाही याबद्दल शंकाच वाटत आहे. मी आतापर्यंत अमेरिकेत जितके हाल काढले व दु:खे सहन केली, त्या प्रमाणात मला आता परमेश्वराने ओरेयलीचा आश्रय देववून चांगले दिवस दाखविले. माझ्या तेथील राहण्याच्या मुदतीत मला ओरेयलीचा जो अनुकरणीय व स्पृहणीय जीवनक्रम पाहावयास मिळाला, त्याचा अल्प परिचय वाचकांस करून दिल्यावाचून हे प्रकरण पुरे होऊ शकत नाही.

ओरेयली ही जरी अमेरिकेतील नागरिक स्त्री होती तरी पूर्वज आयरिश असल्याने तिला आयर्लंडबद्दल मोठा अभिमान वाटे व आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्याकरिता ओरेयली काया-वाचा-मनेकरून अमेरिकेत अहर्निश झटत असे. ओरेयलीचे दुसरे आवडते देशकार्य म्हणजे अमेरिकेतील स्त्री व पुरुष मजुरांची स्थिती सुधारण्याकरिता खटपट करणे हे असे. ओरेयलीला मजूर-सेवा व आयर्लंडची सेवा या दोन्ही गोष्टींपुढे जगातील सर्व प्रश्न कमी महत्त्वाचे वाटत. हिंदुस्थानाबद्दल तिला वाटणाऱ्या कळकळीचे दृश्य चिन्ह म्हणजे तिने मला अमेरिकेत केलेले बिनमोल साहाय्य होय. मानव-जातीवर प्रेम करून मानव-जातीची निष्ठापूर्वक सेवा करणे हाच ओरेयलीचा

धर्म होता. ओरेयलीचा स्वभाव अत्यंत उदारमतवादी होता. ती जातिभेद तर पाळीत नसेच, पण राष्ट्रभेद पाळण्याच्या देखील ती विरुद्ध होती व निरनिराळ्या राष्ट्रांचे प्रश्न परस्परांच्या मदतीशिवाय सुटणार नाहीत, असे ती नेहमी म्हणत असे. ओरेयलीची आई ८१ वर्षांची असतानादेखील दररोज आठ तास वाचनात घालवी. ओरेयली बाहेरची कामे करून आली म्हणजे निरनिराळ्या विषयांवरील पुस्तके तिची आई वाचून दाखवी व ओरेयली आपल्या पलंगावर विश्रांती घेत वाचलेले ऐकत असे. ओरेयली ही मोठी मातृभक्त होती व आईचा बिछाना करणे व तिची इतर कामे ती मोठ्या भक्तीने करी. सकाळी चहाच्या वेळी ऑरेयली आपल्या आईबरोबर दैनिक वर्तमानपत्रांतील निवडक बातम्यांविषयी चर्चा करीत असे. ही चर्चा ऐकून मला दररोज वर्तमानपत्रे वाचल्याशिवाय बरीच माहिती थोडक्यात ऐकावयास सापडे. ओरेयलीने लहानपणापासून विवाहाचा मोह बाजूस ठेवून, आपले सर्व आयुष्य अमेरिकेतील मजूर-वर्गाच्या उन्नतीकरिता अर्पण केले होते. ती नेहमी निराश्रित मुलांना पाळीत असे. आपले लग्न झाले नाही, म्हणून मी तिला केव्हाही दु:खीकष्टी झालेली पाहिली नाही. आमच्या देशातील विधवा नवरा मेला म्हणून व प्रौढ कुमारिकांचे पालक व नातेवाईक आपल्या मुलीचा काही कारणाने योग्य स्थळाच्या अभावी विवाह होत नाही म्हणून दु:खीकष्टी झालेले दिसतात. पण विवाह होत नाही म्हणून, विवाहाच्या नंतर वैधव्य आले म्हणून हताश व असाहाय्य होऊन अमेरिकेतील स्त्रिया व मुलींचे पालक हिंदुस्थानातील स्त्रियांप्रमाणे कधीही आपले जीवन कसेतरी घालवीत नाहीत, तर प्रसंग येईल त्याला तोंड देऊन आपले राष्ट्रकर्म करीत राहतात; हा एक त्यांचा मोठा गुण सर्वांनी घेण्यासारखा आहे. अमेरिकेतील उदारधी व कर्त्या स्त्रियांचा एक नमुना म्हणून ओरेयलीविषयी माझ्यामध्ये पूज्यभाव जो एकदा उत्पन्न झाला तो दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जाऊन ती मला एखाद्या अधिदेवतेप्रमाणे वाटल्यास त्यात नवल वाटण्याचे विशेष कारण नाही.

ओरेयलीने मला इंग्रजी वाचावयास व लिहावयास फक्त सात-आठ महिनेच शिकविले. पुढे तिला निरनिराळ्या चळवळीमुळे शिक्षण देण्यास वेळी मिळत नाहीसा झाला व मीही नंतर निरनिराळ्या अमेरिकन स्त्री-पुरुषांच्या प्रत्यक्ष ओळखी करून घेऊन डायरेक्ट पद्धतीने इंग्रजी शिकण्याचे काम चालू ठेविले. माझा ओरेयलीच्या घरचा नित्य कार्यक्रम म्हणजे सकाळी थोडे घरकाम करून, नंतर दुपारी न्यूयॉर्कमधील निरनिराळ्या सभांना व ओळखीच्या मंडळींना भेटावयास जावयाचे असा असे. वॉशिंग्टनला मजूर परिषदेत गेल्यामुळे माझे नाव आता न्यूयॉर्कमधील निरनिराळ्या शिक्षणविषयक व सामाजिक संस्थांतील चालकांच्या परिचयाचे झाले होते, त्यामुळे मला त्यांच्याकडून निरनिराळ्या सभांच्या व क्लबांच्या भोजनप्रसंगी अगर चहापार्टीना बोलावणी येत. या संधीचा फायदा घेऊन मी जात असे व तिकडे साधल्यास आश्रमाला मदत मिळविण्याचे काम, अमेरिकेतील सार्वजनिक कामे

करण्याची शिस्त व पद्धत पाहणे, जमल्यास निरनिराळ्या विदुषी व पुढारी स्त्रियांच्या ओळखी करून घेण्याची संधी मिळविणे, यापैकी साधेल त्या प्रकाराने स्वत:चा फायदा करून घेत असे. कित्येक वेळा ओरेयली ही मजूर-वर्गाची एक पुढारी म्हणून गणली जात असल्यामुळे, तिला एखाद्या ठिकाणी बोलावणे आले म्हणजे शक्य असल्यास ती मलाही आपल्याबरोबर घेऊन जाऊन; निरनिराळ्या ठिकाणी ओळखी करून देई. काही वेळेला ओरेयली आपल्या मित्रमंडळींना आपल्या घरी चहाला बोलवी त्या निमित्ताने त्यांना चहा देण्याच्या वेळी अनायासेच माझी ओळख करून देण्यात येई. न्यूयॉर्कमध्ये अभ्यास करणारे हिंदी विद्यार्थीही मला आपल्या घरी बोलावून निरनिराळ्या ठिकाणी ओळख करून देत. अशा रितीने मला न्यूयॉर्कचे व न्यूयॉर्कच्या सभोवतालच्या निरनिराळ्या प्रकारच्या अमेरिकेतील समाजस्थितीचे, सूक्ष्मा अवलोकन करावयास सापडले. यातच निरनिराळ्या ठिकाणी जाऊन मी पुण्यातील माझ्या विधवाश्रमाकरिता फक्त न्यूयॉर्कमध्येच ३००० रुपये मिळविले.

अमेरिकेत निरनिराळ्या संस्था, संघ व मंडळे यांचे वार्षिक व सहामाहीचे समारंभ भोजनोत्तर होण्याची वहिवाट असे व समारंभाच्या वेळी होणारी निरनिराळी भाषणे भोजनप्रसंगीच करण्याची तिकडे चाल आहे. एकदा जगातील अतिशय प्रसिद्ध अशा न्यूयॉर्कमधील हॉटेल वाल्डोर्फ आस्टोरिया (Hotel Waldrf Astoria) या नावाच्या हॉटेलात जेवण्याकरिता जमलेल्या सोरॉसिस क्लबाच्या (Sorosis Club) ५०० स्त्रीसभासदांपुढे मी हिंदुस्थांनातील प्रो. कर्वे यांच्या स्त्री-शिक्षण-प्रसाराच्या प्रयत्नांविषयी थोडक्यात बोलले व हिंगणे येथील संस्थांची माहिती सांगितली. सोरॉसिस क्लब हा केवळ स्वावलंबनाने आपला चरितार्थ चालविणाऱ्या स्त्रियांचाच क्लब आहे व याची स्थापना अमेरिकेत इंग्रजांनी वसाहती स्थापन केल्या त्या काळापासून झालेली असल्याने, या क्लबची कीर्ती फार मोठी आहे. या ठिकाणी बोलण्याची संधी मिळणे ही एक मोठ्या मानाची गोष्ट आहे, असे अमेरिकन लोक समजतात.

असेच एकदा एका स्त्रियांच्या सभेपुढे व्याख्यान देत असताना वर्गणी मिळविण्याकरिता, प्रो. कर्वे यांना दरवर्षी पायाने प्रवास करावा लागतो; ही माहिती मी इतर माहितीबरोबर सांगितली. व्याख्यानानंतर तिकडील पद्धतीप्रमाणे प्रो. कर्वे पायी चालण्याऐवजी मोटार का वापरीत नाहीत, असा एक बाईने मला प्रश्न विचारला. गरिबीमुळे त्यांना मोटार विकत घेणे शक्य नाही असे मी सांगितले. प्रो. कर्वे यांना एखादी मोटार भेट म्हणून पाठविली तर ती घेतील की नाही, असा प्रश्न एका बाईने मला विचारला. या भेटीचा प्रो. कर्वे अवश्य स्वीकार करतील, असे मी सहज उत्तर दिले. व्याख्यानात झालेली प्रश्नोत्तरे मी अगदी विसरून गेले. पण त्या ठिकाणी व्याख्यान ऐकावयास आलेल्या काही श्रीमंत बायकांनी पुढे बरीच खटपट करून, एका मोठ्या फंडाच्या सेक्रेटरींस विनंती करून; प्रो. कर्वे यांना खरोखरीच

एक मोटार अमेरिकेतून भेट म्हणून पाठविली. या मोटारीचा उपयोग एरंडवणे येथील मुलीच्या कॉलेजातील प्रोफेसरांस नेण्या-आणण्याकरिता होत असे.

अशा रितीने न्यूयॉर्कमधील ब्रिनमन क्लब, टीचर्स कॉलेज ऑफ न्यूयॉर्क व गोमाँ क्लब, अशा निरनिराळ्या शिक्षणविषयक व थोर संस्थांपुढे मला बोलण्याची संधी मिळताच, प्रो. कर्वे यांच्या स्त्रियांच्या युनिव्हर्निटीविषयी माहिती सांगण्यास व पुढील पैसे मिळविण्याचे काम करण्यास मी त्या संधीचा उपयोग करून घेतला. अशा रितीने माझे दिवस निरनिराळे अनुभव मिळविण्यात व संस्थेकरिता मदत मिळविण्यात जात असता, 'यंग इंडिया'च्या ऑफिसात वाटण्यात आलेले महात्मा गांधी यांनी लिहिलेले 'नॉन को-ऑपरेशन' वरील पुस्तक हिंदुस्थानात कसली चळवळ सुरू आहे; हे दाखविण्याकरिता मी ओरेयलीला वाचावयास दिले. हे पुस्तक वाचून, हिंदू लोकांनी जसा इंग्लंडमधील तयार झालेल्या कापडावर बहिष्कार घातला आहे, तसाच बहिष्कार अमेरिकेतील आयरिश लोकांनी आयर्लंडला मदत करण्याकरिता इंग्लंडमधून येणाऱ्या चहावर घालण्याची चळवळ सुरू करावी, असे तिच्या मनाने घेतले. लगेच दुसऱ्या दिवशी ओरेयलीने तेथील आयरिश लोकांची सभा बोलावून 'चहावर बहिष्कार' (Non-Cooperation with English Tea) या विषयावर व्याख्यान दिले व सर्व आयरिश लोकांनी एक चहाफंड काढून जाव्हा व सुमात्रा या बेटांत उत्पन्न होणाऱ्या डच टी अगर इंग्लंडखेरीज इतर देशांतून उत्पन्न होणारा चहा विकत घेऊन त्याचा खप वाढवावा व अशा रितीने चहाची विक्रीच आपल्या हातांत घेऊन राहिलेला नफा आयर्लंडला पाठवून द्यावा, असे ठरले. ओरेयलीने अशा रितीने इंग्लंडखेरीज इतर देशांतील चहा मागवून, तो खपविण्याचे काम आपल्या देखरेखीखालीच सुरू केले. इंग्लिश चहावरील बहिष्काराच्या चळवळीचा जोराने प्रसार करण्याकरिता, निरनिराळ्या सभा भरवून ओरेयली आपल्या आयरिश देशबांधवांकडून डच चहापान करवू लागली. या मोहिमेमुळे न्यूयॉर्कमधील बहुतेक आयरिश कुटुंबांनी इंग्लीश चहाऐवजी डच चहा सुरू केला व चळवळीचा फायदा म्हणून दोन-तीन महिन्यांत मिळविलेले हजार डॉलर, तिने आयर्लंडला मदत म्हणून पाठवून दिले. हे तिचे काम बरीच वर्षे सुरू होते.

ओरेयलीच्या घरच्या रमणीय शुद्ध वातावरणात राहून मी माझ्या आयुष्याचे बाकीचे दिवस मोठ्या आनंदात काढले असते व ओरेयलीही मला कायमची ठेवून घेण्यास फार उत्सुक होती; पण हिंदुस्थानातील कर्तव्याचे पाश मला ओढीत असल्यामुळे ओरेयलीच्या घरी सव्वा वर्ष आनंदात काढल्यावर परत हिंदुस्थानात जावे असे मला वाटू लागले. माझे वयही बरेच झालेले होते. शिवाय तिकडल्या थंडीमुळे मला थोडा संधिवातासारखाही विकार सुरू झाला होता. अण्णांचेही हिंदुस्थानात निघून येण्यासंबंधी पत्र आलेच होते. अशा स्थितीत आपल्या नातेवाईक मंडळींना निदान आपले हातपाय चालत आहेत, तोपर्यंत भेटण्याची आलेली संधी

व्यर्थ दवडू नये व राहिलेले आयुष्याचे दिवस हिंदुस्थानातील विधवांच्या सेवेत घालवावेत, या स्वार्थ व परमार्थाच्या हेतूने प्रेरित होऊन मी परत जावयाचे ठरविले. ओरेयलीने माझी जाण्याची तयारीही सर्व नीटपणे करून दिली व आता खरोखरच तिला सोडून जाणार हे पाहून तिला व तिच्या आईला फार वाईट वाटू लागले. मी जाणार हे कळल्याबरोबर मला न्यूयॉर्कमधील हिंदी विद्यार्थ्यांनी, मिसेस शीहीबाईने व इतर मित्रमडंळींनी निरनिराळ्या चहापार्ट्या दिल्या व प्रेमाचे निरोप दिले. मला आता परत माझ्या अमेरिकन मित्रमंडळींना भेटावयास येता येणार नाही, म्हणून मीही अमेरिकन मित्रमंडळींचा शेवटचा निरोप घेतला.

तारीख २० एप्रिल १९२० रोजी मी व्हाइट स्टार लाइनच्या 'ऑलिपिंक' बोटीने लिव्हरपूलला यावयास निघणार होते. बंदरावर त्या दिवशी मला पोचविण्यास ओरेयली, मिसेस शीही, हिंदी विद्यार्थी व इतर अमेरिकन परिचित मित्रमंडळी जमा झालेली होती. कोणी मजकरिता फुले, कोणी पुस्तके, कोणी मेवामिठाई कोणी फळफळावळ, इत्यादी प्रवासोपयोगी वस्तू आणल्या होत्या. त्या मला अर्पण करताना व हातरुमाल हलवून हस्तांदोलन करून मला प्रेमाचा निरोप देताना, माझ्या अमेरिकेतील देशबांधवांना मजविषयी वाटणारे नि:स्वार्थी प्रेम पाहून माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. 'परमेश्वरा, यांचे उपकार मी आता कसे फेडू?' अशी त्या दीनदयाळ जगच्चालक प्रभूची करुणा भाकून मी माझ्या ध्येयमूर्ती झालेल्या अमेरिकेच्या किनाऱ्याला शेवटचा प्रणाम केला व पोचवावयाला आलेली मंडळी दिसेनाशी झाल्यावर केबिनमध्ये माझ्या निरनिराळ्या वस्तू लावण्याकडे लक्ष गुंतवले.

✿ ✿

# मातृभूमीस परत

व्हाईट स्टार लाइनची 'ऑलिंपिक' बोट फार मोठी व अत्यंत व्यवस्थित अशी आहे. मला आता समुद्रप्रवासाची सवय झालेली होती. शिवाय प्रवासात कोणत्या गोष्टीची काळजी घ्यावी याचे मला अनुभवजन्य ज्ञान असल्यामुळे, माझा स्वदेशी परत येताना सर्व प्रवास फारच मौजेचा व अत्यंत सुखावह असा झाला.

मी यावेळी सेकंड क्लासमधून प्रवास करीत होते व माझ्या केबिनमध्ये मला डॉ. बहादुरजी या नावाच्या एक पार्शी बाई सोबतीला होत्या. त्यांच्या संगतीत माझे प्रवासाचे दिवस फार आनंदात गेले. या बोटीवरही मला ब्रेड, लोणी, फळे व भात यांवरच दिवस कंठावे लागत असत; परंतु हा आहार आता माझा नेहमीचाच झाल्यामुळे, पूर्वीप्रमाणे मला त्याविषयी विशेष अडचण अशी भासली नाही. सातआठ दिवसांच्या समुद्रप्रवासानंतर आमची बोट लिव्हरपूलला येऊन पोहोचली. लिव्हरपूलला बोटट्रेनमध्ये बसून मी डॉ. बहादुरजींबरोबर लंडनला आले व तेथे हिंदु हॉस्टेलमध्ये (Hindu Hostel) उतरले. या ठिकाणी आमच्या आश्रमाची माजी विद्यार्थिनी कु. द्वारका भालचंद्र (आता नागपूरच्या सौ. रमाबाई तांबे) भेटली व तिचा मला बराच उपयोग झाला. लंडनला जमल्यास पंधरा दिवस राहावे, पाहण्यासारखी ठिकाणे असतील ती पाहावीत व साधल्यास आश्रमाच्या वर्गणीचे काम थोडे फार करावे, अशा हेतूने मला राहावयास कोठे सोयीस्कर खोली मिळेल काय, या तपासात मी होते. पण यासंबंधी अमेरिकेतल्या मानाने लंडनला मला अनेक गैरसोयी आढळून आल्या. लंडनमधील खोल्यांचे भाडे अधिक व त्या मानाने व्यवस्था असमाधानकारक असा मला अनुभव आला. शेवटी अमेरिकेतील माझ्या एका हिंदी मित्राने त्याच्या पंजाबी बॅरिस्टर मित्रास दिलेले पत्र उपयोगी पडले. मला ज्यांचे पत्र मिळाले होते ते पंजाबी विद्यार्थी बॅरिस्टर होते व त्यांनी माझी सोय, शीख लोकांनी, शीख व प्रवासी यांच्याकरिता लंडनमध्ये स्थापन केलेल्या 'भूपेंद्रनाथ धर्मशाळे'जवळ

एक भाड्याची खोली घेऊन केली. त्या वेळी लंडनमध्ये संप चालू असल्याने, कोळशांचा फार तुटवडा पडलेला होता व यामुळे मला राहावयास दिलेल्या खोलीत पुरेशी उष्णता नसल्याने रात्री थंडीमुळे माझे बरेच हाल होत असत. या खोलीत मी पाच आठवडे होते, दुपारचा वेळ मी बहुतेक निरनिराळ्या ओळखीच्या मंडळींच्या भेटी घेण्यात घालवीत असे व संध्याकाळी परत खोलीत निजावयास येत असे.

लंडनमध्ये असताना 'शेक्सपिअर हट' या नावाच्या हिंदी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात मी एकदा 'अनाथ बालिकाश्रमावर' व्याख्यान दिले व २० पौंड वर्गणी मिळविली. हिंदुस्थानाबद्दल कळकळ बाळगणारे व प्रो. कर्वे यांच्या परिचयाचे मिस्टर पोलक व सेंट निहालसिंग यांची मी गाठ घेतली. आमच्या पंजाबी बॅरिस्टरांच्या मदतीने ब्रिटिश म्युझियम व जुना बकिंगहॅम राजवाडा मला पाहावयास मिळाला.

लंडनहून मी पॅरिसला जावयास निघाले. अमेरिकेतून निघताना पत्ता मिळालेल्या, पॅरिस येथील मोत्यांच्या एक गुजराथी व्यापाऱ्यास, अमक्या गाडीने येत आहे अशी, तार केली. पॅरिसला स्टेशनवर मला नेण्यास हे व्यापारी आले होतेच; ते मला आपल्या घरी घेऊन गेले. त्यामुळे पॅरिसला माझे लंडनसारखे हाल झाले नाहीत, पॅरिसला मी त्यांच्याकडे पाच आठवडे होते.

मी पॅरिसला असताना एक मुलींची नमुनेदार प्राथमिक शाळा पाहिली व दुसरी एक बोर्डिंग असलेली शाळा पाहिली. पॅरिसला असताना आमच्या मित्रांच्या साहाय्याने माझ्या तेथील बऱ्याच विद्वान मंडळींच्या ओळखी झाल्या. यापैकी प्रो. आन्टोलोली ब्राझ, डॉक्टर चेंटिल, मॅडम चेनू, मॅडम बुव्हाइस, ही प्रमुख मंडळी होत. फ्रेंच लोकांना हिंदुस्थानाबद्दल बरीच सहानुभूती वाटत आहे व ते आपणांस मदत करावयास तयार आहेत, असे त्यांच्या परिचयावरून मला आढळून आले. पॅरिसला त्यावेळी माझ्या विनंतीमुळे तेथील सर्व व्यापारी मित्रमंडळींच्या साहाय्याने 'असोसिएशन द हिंदूस द पारी' या नावाची एक संस्था हिंदुस्थानातील फ्रान्समध्ये येणाऱ्या स्त्री-प्रवाशांना मदत करण्याकरिता अस्तित्वात आलेली आहे. पॅरिसमध्ये सध्या असणाऱ्या, परलोकवासी दादाभाई नौरोजी यांची नात कुमारी नौरोजी या संस्थेच्या सेक्रेटरी होत्या. पॅरिसमधील मित्रमंडळींकडून आश्रमाला मदत मिळावी, असा माझा हेतू होता. परंतु त्यावेळी हिंदुस्थानांत जाण्याकरिता तेथे आलेले डॉ. रवींद्रनाथ टागोर यांचे स्वागत करण्याकरिता, पॅरिसमधील भारतवासीयांकडून वर्गणी जमा होत असल्याने मला आपले काम करावयास सापडले नाही.

डॉ. टागोर यांच्या झालेल्या पॅरिस येथील स्वागतप्रसंगी मी हजर होते. त्या वेळी टागोर यांचा सन्मान झाल्यानंतर त्यांनी जे उत्तरादाखल भाषण केले, ते मला अजून चांगले स्मरते. मी त्याचा सारांश वाचकांकरिता थोडक्यात खाली देत आहे. त्यांच्या भाषणानंतर मीही त्या समारंभात भाषण केले.

''माझा जो तुम्ही सन्मान केला त्याबद्दल मी आपला आभारी आहे. पाश्चात्त्य

देशांत आमची प्रसिद्धी झाली, म्हणजे नंतर आमची ओळख स्वदेश बांधवांना व्हावी यावरून स्वदेशात चांगल्या गोष्टीचे मापन कोणत्या मापाने होत असते, याची कल्पना केली पाहिजे. आम्ही सर्व जे आज इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविण्याची धडपड करतो, त्याच्यापेक्षा अल्प श्रमातही स्वकीय भाषांचे ज्ञान आम्हांला करून घेण्याची संधी असता, तिकडे आम्ही दुर्लक्ष करतो. हिंदुस्थानातील भाषा परस्परांच्या बहिणी आहेत व त्यांची आज इंग्रजी भाषेकरिता पायमल्ली चालली आहे, हे ठीक चिन्ह नाही.''

मी, रवींद्रनाथ व त्यांची सून यांच्याबरोबरच मार्सेलीसहून ता. २ जुलैच्या सुमारास सेकंड क्लासने पी. ओ. कंपनीच्या मोरिया बोटीने मुंबईस यावयास निघाले. माझ्या केबिनमध्ये मला सोबतीला एक पंजाबी बाई होती. आमच्या बोटीवर पंचवीस हिंदी विद्यार्थीही होते. या विद्यार्थ्यांबरोबर रवींद्रबाबू करीत असलेल्या काव्य-शास्त्र-विवेचनात आमचा सर्वांचा वेळ मोठ्या आनंदाने जात असे. अनेक वेळा तासांचे तास चांदण्याच्या प्रकाशात आम्ही सर्व हिंदवासी रवींद्रबाबूंचे उपदेशामृत ऐकण्यात घालविले आहेत. त्या रात्री व ते प्रसंग मी कधीही विसरणार नाही. अशा रितीने रवींद्रबाबूंच्या साहचर्यात मी ता. १५ जुलैला मुंबईस पुन्हा येऊन पोहोचले. हिंदुस्थानच्या किनाऱ्याला माझे पाय लागणार, या विचाराने माझ्या मनांत निरनिराळ्या विचारांनी काहूर उत्पन्न केले. मुंबईस उतरल्यावर लगेच दोनतीन दिवसांनी मी हिंगण्यास अनाथ बालिकाश्रमात माझ्या पुढील कामाला लागण्याकरिता जाऊन दाखल झाले.

✿ ✿

# सामाजिक प्रश्नांवर माझे काही विचार

हिंदुस्थानातील पुढारी स्त्री-पुरुषांनी आपली मते सामाजिक प्रश्नांवर वेळोवळी प्रसिद्ध केली आहेत. सुधारकांनी तर या निरनिराळ्या प्रश्नांवर सामाजिक परिषदांतून ठरावही पास केले आहेत. इतरांप्रमाणे मला पुस्तकी ज्ञानही नाही व एखाद्या विश्वविद्यालयाची पदवीही पण नाही, म्हणून अशा विषयावर लिहिण्याइतके जे ज्ञान लागते ते मजजवळ नाही. पण संस्थेच्या कामाकरिता बरीच वर्षे प्रवास करावा लागल्याने समाजातील निरनिराळी दृश्ये पाहावयास सापडली. युरोप-अमेरिकेतील प्रवासामुळे तिकडला समाज व आपला समाज यांची तुलना करावयास सापडली. इतरांना कधी न मिळणारा असा जो अनुभव मला मिळाला त्याच्या मदतीने माझी काही मते मी सर्वांपुढे मांडणार आहे. त्याचा उपयोग निरनिराळ्या सामाजिक प्रश्नांचा विचार करताना थोडाबहुत होईल, अशी मला आशा आहे.

स्त्रियांच्या सार्वजनिक जीवनाचे दोन भाग करिता येतील. अविवाहित स्त्रियांपेक्षा विवाहित स्त्रियांची संख्या केव्हाही अधिकच असणार. कुटुंब-पोषणाकरिता पुरुषांना घराबाहेर उद्योग करून पैसे मिळवावे लागतात व स्त्रियांना घरात राहून कुटुंबरक्षण करावे लागते. सध्याच्या महागाईमुळे पुरुषांना निरनिराळी कामे पूर्वीपेक्षा अधिक करावी लागतात व त्यामुळे त्यांचा बहुतेक वेळ घराबाहेरच जातो. उद्योगधंद्यात पडलेल्या पुरुषांच्या कामाच्या वेळाही निश्चित नसल्याने अशा पुरुषांना घरात राहण्यासही वेळ नसतो. अशा स्थितीत मुलाबाळांचा भार सर्वस्वी स्त्रियांवरच पडतो.

अलीकडे घरातील मुलांना शिष्टाचार (ज्याला इंग्रजीत 'गुड मॅनर्स' म्हणतात) लावण्याचा प्रयत्न जितका व्हावयास पाहिजे तितका केला जात नाही. पैसे घरात आणून टाकण्याखेरीज पुरुषवर्गाचा घराशी विशेष संबंध राहत नाही. नोकर-चाकरांशी व मुलांशीही त्यांचा विशेष संबंध येत नाही. म्हणून गृहाला व कुटुंबाला

नीट वळण व शिस्त लावण्याची जबाबदारी विवाहित स्त्रियांवर येऊन पडली आहे. स्त्रिया या देशांतील भावी माता असल्यामुळे त्यांना संसारोपयोगी असे सर्व शिक्षण दिले पाहिजे.

प्राथमिक स्वरूपाचे वैद्यक, बालसंगोपन, पाकशास्त्र, बाग तयार करणे, घरे स्वच्छ ठेणे, अन्नसामग्रीची खरेदी व संग्रह, गायन, धार्मिक विधी व आचार इत्यादी सर्व महत्त्वाच्या विषयांची माहिती स्त्रियांना दिली पाहिजे.

हल्लीच्या शिकलेल्या मुलींचे ज्ञान मुलांप्रमाणेच असते व त्याचा त्यांना संसारात यत्किंचितही उपयोग होत नाही. अलीकडील शिकलेल्या मुलींचे संसार आमच्या अशिक्षित स्त्रियांच्या संसारापेक्षा विशेष चांगले असलेले आढळून येत नाहीत. सध्याच्या स्त्रियांचे शिक्षण बऱ्याच अंशाने पुरुषांच्या शिक्षणाच्या वळणावर जात चालले आहे; त्याला वेळीच आळा घातला पाहिजे.

हल्लीच्या कित्येक कुटुंबांतून असे दिसते की, घरच्या गृहिणीवर घरातील शहाणे नोकरचाकर आपलाच हुकूम चालवितात. त्याप्रमाणे घरातील मुले देखील आईचा कोणत्याच प्रकारे मान ठेवीत नाहीत. कोकणात जुन्या परंपरेने चालणाऱ्या घरांमध्ये अशी स्थिती दिसून येत नव्हती. घरातील मुले आईला वाटेल तशी उत्तरे देऊन घरात आरडाओरड करताना आढळून येतात व आपला सर्व वेळ हुतूतू हा मामा करण्यात घालवितात. माझे असे म्हणणे नाही की, मुलांनी सदोदित बाहुल्याप्रमाणे कोनाड्यात बसून राहावे. आईने त्यांना ठरावीक वेळेला अभ्यास व खेळ नेमून दिला पाहिजे व तसे त्यांच्याकडून वागवून घेतले पाहिजे. स्वत: आईने आपल्या अंगी नियमितपणा व शिस्त आणल्यास घरातील मुलांच्या व नोकरचाकरांच्या जीवनालाही चांगले वळण लागेल.

घर ही एक शाळा आहे. गृहिणी व गृहस्थ हे त्या शाळेवरील मुख्य शिक्षक आहेत. त्यांनी घरातील मुलाबाळांना व नोकरचाकरांना गृहशिक्षण द्यावयाचे आहे. स्वत: शिक्षकांनीच गांभीर्य सोडून घरातील माणसांना शिक्षा लावावयाचे सोडून दिल्यास, नोकरचाकर व मुलेबाळे यांमध्ये बेबंदशाही माजल्यावाचून राहणार नाही. कित्येक ठिकाणी अशी बेबंदशाही माजलेली माझ्या नजरेस आली आहे. ५० वर्षांपूर्वीच्या आमच्या घरात आम्हांला जे शिक्षण मिळून, टापटीप व नीटनेटकेपणाच्या ज्या सवयी लावल्या जात असत, तशा रितीची व्यवस्था सध्याच्या घरातून फारच थोड्या ठिकाणी आढळून येत असते.

पूर्वीची आपली कुटुंबपद्धती सध्या विस्कळीत होऊ पाहत आहे. पूर्वीची मोठी कुटुंबे विभागत जाऊन सध्या राजा, राणी व युवराज एवढ्यावरच कुटुंबसंख्या येऊ पाहत आहे. पाश्चिमात्य समाजात कुटुंबे नाहीशी होऊन हॉटेलांची संख्या वाढत आहे; त्याचप्रमाणे विवाहितांपेक्षा अविवाहितांची संख्या वाढत चालली आहे; यावरून आपण धडा घेणार की त्यांचाच कित्ता गिरविणार? या बाबतीत आपल्या

समाजाची स्थिती मोठी चमत्कारिक होत चालली आहे.

आपला देश उष्ण असल्यामुळे आरोग्यसंबंधी सर्व ठिकाणी अज्ञान असल्यामुळे आणि आपली स्थिती फार गरिबीची असल्यामुळे, आपल्या देशात युरोपियन राहणीचे अनुकरण झाल्यास त्याचे परिणाम एकंदर समाजावर अहितकारक झाल्यावाचून राहणार नाहीत असे वाटते. युरोपियन राहणीमधील स्वच्छता, टापटीप, गृहशिक्षण, गांभीर्य, इत्यादी चांगल्या गुणांचे अनुकरण होण्याऐवजी वरवरच्या फॅशनचेच अनुकरण सध्या आपल्या समाजात होत आहे.

जुने अथवा नवे असे कोणतेच धार्मिक आचार घरात होत नसल्यामुळे आपल्या कुटुंबांतून नैतिक उच्च भावनांची वाढ जशी व्हावयास पाहिजे तशी होत नाही. सध्या काही चांगली व नमुनेदार कुटुंबे सापडतील, पण ती सोडून दिल्यास बऱ्याच ठिकाणी अर्धवट युरोपियन व अर्धवट हिंदू अशी राहणी पाहावयास सापडते. अशी स्थिती असल्याने पुढे आमच्या कुटुंबसंस्थेचे काय होणार, म्हणून काळजी उत्पन्न झाली आहे. युरोपातील स्त्रिया संसार सांभाळून अनेक सार्वजनिक कामे करितात. उदाहरणार्थ, वर्तमानपत्रांत लेख देणे, सभांस जाणे, व्याख्याने देणे, बालसंगोपनाच्या व शिशुशिक्षणाच्या चळवळी चालविणे, शहरांतील आरोग्य वाढविणे, स्त्रियांच्या दु:खासंबंधी विचार करणे, इत्यादी अनेक कामे करतात.

आपल्या देशात या कामांचा बोजा सर्व शिकलेल्या कुमारिका व विधवा यांच्यावरच पडतो. परंतु या कामांत विवाहित स्त्रिया जर भाग घेतील तर घरच्या पुरुषांना ही कामे करावयास उत्तेजन मिळून, ही सर्व कामे उत्तम रितीने पार पडतील. विवाहित स्त्रिया इकडे कोणत्या ना कोणत्या कारणामुळे पुरुषांजवळ कुरकुर करीत असतात, त्यामुळे शिकलेले नवरे व मुलगे आपला बहुतेक रिकामा वेळ क्लबांत घालवितात. मधल्या वेळचा चहाही, ही मंडळी घर जवळ असूनही बाहेरच घेण्याची वहिवाट चालू ठेवितात. घर म्हणजे एक खाणावळ अशीच स्थिती पुष्कळ ठिकाणी दिसून येत असते. पाश्चिमात्य देशांप्रमाणे घरी येण्यात पुरुषांना एक प्रकारचे आकर्षण वाटले पाहिजे. तसे ते वाटते का, याचा प्रत्येकाने आपल्या मनाशीच विचार करावा.

आपली मुले व आपल्या घरचे पुरुष यांना घर हे सुखाचे आगर व समाधानाचे साधन वाटले पाहिजे. तसे ते करण्याची खटपट स्त्रीवर्गाकडून व्हावयास पाहिजे. आपल्या घराची शोभा वाढवावी व घरातील आरोग्य कसे वाढवावे, घर आनंदमय कसे करावे, या गोष्टींची माहिती प्रत्येक गृहिणीने करून घेतली पाहिजे. गृहव्यवस्था या विषयाबरोबर वरील माहिती मुलींच्या शाळांतून मुलींना दिली जाईल, अशी व्यवस्था केली पाहिजे.

आपल्या देशात स्त्रियांच्या सौंदर्यभावनांची वाढ जशी व्हावयास पाहिजे तशी झालेली दिसत नाही. या बाबतीत पाश्चिमात्य देशांतील स्त्रियांपासून आमच्या 7Rp 3

स्त्रियांनी बरेच शिकण्यासारखे आहे. लग्नाच्या पहिल्या दिवशी तिकडील वधूवर आपल्या पोशाखाची व सौंदर्याची जितकी काळजी घेतात, तितकीच काळजी लग्न होऊन पाचदहा वर्षे झाली तरी घेत असतात. आपण सुंदर दिसावे, नीटनेटके असावे व आपल्या पतीचे सर्व लक्ष आपणाकडेच वेधून घ्यावे, अशी महत्त्वाकांक्षा तिकडे दिसून येते व पतीदेखील लग्न होण्यापूर्वी आपल्या भावी पत्नीची मनधरणी करण्याकरिता जितका प्रयत्न करील तितकाच प्रयत्न लग्न झाल्यावरही तो करण्यात कसूर करणार नाही. याच्या अगदी उलट आमच्याकडे स्थिती आढळून येते. गृहिणीचा घरातील पोशाख अगदी गबाळ्यासारखा असावयाचा. यासंबंधी नीटनेटके रहा असा जर उपदेश कधी करावयाचा प्रसंग आला, तर "आता काय पाहावयास का कोणी येणार आहेत? पाहावयाचे होते ते सर्व पाहून झाले." लग्नमुंजीकरिता व मिरवणुकीला जाताना जितकी पोशाखाची काळजी घेण्यात येते, त्याच्या शतांशानेही घरात पतिपत्नी आपल्या पोशाखाची काळजी घेत नाहीत. 'आता काय लग्न झालं आहे.' असे उद्‌गार ऐकू येतात. पत्नीने विवाहानंतरही आपल्या सौंदर्याची व पोशाखाची काळजी घेतली, तर त्यापासून पतीला खात्रीने आनंद वाटेल. त्याचप्रमाणे पतीने पत्नीची मर्जी सांभाळण्याचा प्रयत्न विवाहानंतरही चालू ठेविला, तर त्यामुळे पत्नीची प्रसन्नता अधिक वाढेल. पाश्चिमात्य देशांत ही एक कला म्हणून पतिपत्नीकडून त्याचा विकास केला जातो व यामुळे नीरस व दुःखमय संसारातही तिकडील दांपत्यास नावीन्य अनुभवावयास सापडते. इकडील पतिपत्नींनी याचे अनुकरण करण्यासारखे आहे. म्हणजे वैवाहिक आयुष्य अधिक प्रेममय व सुखावह वाटेल. व त्यापासून जगातील आनंद व सुख वाढेल.

पाश्चिमात्य देशांतील स्त्रिया घरातील स्वच्छता जिवापाड मेहनत घेऊन ठेवीत असतात. घरात नेहमी शांतता नांदेल व समाधान वाढेल अशी व्यवस्था तिकडे ठेवण्यात येते. याच्या उलट आमच्या इकडील कित्येक श्रीमंतांच्या घरांतूनदेखील सांदीकोपऱ्यांतून वर्षानुवर्षे साचलेला केर, कोळ्यांची जाळी व न धुतलेले चहाचे पेले सापडतात. खिडक्यांची तावदाने व घरातील पेट्या यांच्यावर वर्षातून एकदा-देखील हात फिरविण्याची वहिवाट फारच थोडे ठिकाणी आढळून येते. कित्येक वेळा घरातील जिन्नसही नीटपणे झांकून ठेवण्याची काळजी घेतली जात नाही यामुळे आरोग्याची हानी होत असते.

आपल्या घरातील शौचकूप व विलायतेतील शौचकूप यांच्या बाबतीत कितीतरी अंतर आढळून येते. युरोपात शौचकूप स्वच्छ ठेवण्याची काळजी घेतात. आपल्या देशांत या ठिकाणी विड्यांचे तुकडे पडलेले, मोऱ्या तुंबलेल्या, इत्यादी किळसवाणे प्रकार आढळून येतात. शौचकूप नीट व स्वच्छ ठेवण्याची मी नेहमी काळजी घेत असे व संस्थेतील शौचकूप मी अनेक वेळा जातीनिशी स्वच्छ केलेले आहेत. या बाबतीत स्वतःच्या उदाहरणाने दुसऱ्यांना धडा घालून देण्याचा प्रयत्न केला आहे.

अमेरिकेतून हिंदुस्थानात आल्यावर मी पहिल्या प्रथम जेव्हा हिंगण्यात गेले त्यावेळी पहिले काम जे मी हाती घेतले ते शौचकूप साफ करण्याचे होते. माझे उदाहरण पाहून, त्यावेळी मला कित्येक विद्यार्थिनींनीही जातीने येऊन मदत केल्याची मला आठवण आहे.

या सर्व गोष्टी या ठिकाणी सांगण्याचे कारण एवढेच की, आपल्या घरातील मोऱ्या, शौचकूप आपणांस साफ ठेविता आले नाहीत, तर मग आपणास आपली घरे कशी साफ ठेविता येतील. ही मला नेहमी काळजी वाटे. खरी घाण घाणीचे काम करण्यात नसून, घाणीमध्ये राहणे हीच खरी घाण आहे; हा समज आमच्या मनावर बिंबला तर आरोग्य ठेवण्याच्या बाबतीत आम्हांला बरीच काळजी घेता येईल. अमेरिकेत यासंबंधी जितकी जाणीव दिसून येते, तितकी जाणीव इकडे दिसून येत नाही.

✿ ✿

# आमची विवाहपद्धती

आमची विवाहपद्धती समाजस्थैर्याकरिता अस्तित्वात आली आहे. कोणतीही विवाहपद्धती पूर्णपणे निर्दोष असू शकणार नाही. ज्या विवाहपद्धतीमुळे अविवाहितांच्या पेक्षा विवाहितांची संख्या वाढेल ती विवाहपद्धती योग्य असे म्हणावे लागेल. पूर्वीची बालविवाहपद्धती जाऊन गरिबीमुळे म्हणा अथवा शिक्षणामुळे म्हणा, प्रौढ विवाहपद्धती अमलात येऊ लागली आहे. पण प्रौढ म्हणजे किती प्रौढ याची व्याख्या ठरविणे जरुरीचे आहे. प्रौढ विवाहाची मर्यादा काहीच न ठरल्यास जरठ-कुमारी-विवाह देखील प्रौढ विवाहाच्या व्याख्यात येऊ शकतील. विवाहाच्या वेळी मुलीचे वय १६ ते २० पर्यंत व मुलांचे वय २५ ते ३० पर्यंत असावे. आईबापांनी यावेळी योग्य वधूवर पाहून विवाह घडवून आणावेत व ते पुढे फार लांबणीवर टाकू नयेत. विवाह पुढे लांबणीवर पडल्यास मुलांमुलींना अविवाहित राहावे लागेल व त्याचे दुष्परिणाम त्यांना भोगावे लागतील. म्हणून ठरावीक मर्यादेच्या आत विवाह घडवून आणणे, हे गृहसौख्याच्या दृष्ट्या अत्यंत श्रेयस्कर आहे.

मुलामुलींनी वैयक्तिक स्वातंत्र्याच्या मोहास बळी न पडता ज्यांनी आपणांस जन्म दिला व शिक्षण देऊन वाढविले, त्यांच्या शहाणपणावर विश्वास ठेवून सुखी होण्याचा प्रयत्न करावा. पालकांनीही मुलांमुलींना या बाबतीत जगातील आपल्या अनुभवाचा फायदा करून द्यावा. स्वरूप, पदवी व श्रीमंती यांनाच फाजील महत्त्व दिले गेल्यास पुष्कळ मुलांमुलींना अविवाहितच राहावे लागेल. पूर्वीचा बालविवाह व पाश्चिमात्यांचा प्रीतिविवाह या दोन टोकांमधील विवाहपद्धती आपणांस अधिक उपयुक्त होणार आहे. जपानांत देखील हीच पद्धती लोकप्रिय झाली आहे. मुलांनी आपली राहणी अधिक खर्चाची करून विवाह करणे लांबणीवर टाकणे या मार्गाचा अवलंब करू नये. मुलींनीही अव्यवहार्य अटी घालून मरेपर्यंत अविवाहित स्थितीत राहण्याचे ठरवू नये. सर्व मुलींना आय.सी.एस. नवरे मिळणे अशक्य आहे. चांगले

स्थळ आले असताना परीक्षा पास होण्याची सबब सांगणे गैरवाजवी होईल. अल्पवयी पण एक-दोन मुले असणाऱ्या विधुराबरोबर लग्नच करणार नाही, त्यापेक्षा अविवाहितच राहीन असे म्हणणेदेखील अव्यवहारीपणाचे होईल. विवाहाशिवाय कोणाही व्यक्तीस पूर्णत्व येत नाही. शिक्षणाचा उपयोग स्त्रियांनी आपले घर सुधारण्यात करून दाखविला, तरच त्या शिक्षणापासून देशाचे व राष्ट्राचे हित साध्य करता येईल. आपल्या मुलीने अविवाहित राहणे हे मुलींना शिक्षित करण्यापेक्षाही फार मोठी जबाबदारी अंगावर घेण्यासारखे आहे, असे पालकांना वाटले पाहिजे. मुलीने विवाह न करिता नोकरी करीत राहणे हे मोठे भूषणावह आहे, असे पालकांना 3
वाटता उपयोगी नाही. विवाह म्हणजे एक प्रकारची तडजोड आहे. आदर्श विवाह लाखांत तीनचारच सापडतील. इतर विवाह तडजोडीखेरीज सुखावह होणार नाहीत. हे मुलामुलींच्या लक्षात आणून दिले पाहिजे. अविवाहित स्थिती ही विवाहित स्थितीपेक्षा अधिक खर्चाची व अधिक अडचणीची आहे, हे दुसरे सत्यही पालकांनी मुलामुलींच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पाश्चिमात्य देशांप्रमाणे इकडील वैवाहिक आयुष्य अचिरकालिक व केवळ करारी स्वरूपाचे होता उपयोगी नाही. कर्तव्य, स्वार्थत्याग, या तत्त्वांचा पाया विवाहाला असेल, तर विवाह हे चिरकालिक होऊन, त्याचा देशाला व भावी वंशाला उपयोग होईल.

✿ ✿

# स्त्रियांच्या संस्था व त्यापुढील प्रश्न

आज देशात निरनिराळ्या राजकीय व औद्योगिक संस्था चालू आहेत. देशातील स्त्रीशिक्षणसंस्था देखील एक प्रकारे सार्वजनिक संस्थाच आहेत. फरक एवढाच की देशातील इतर सार्वजनिक संस्थांकडे लोकमताचे जसे आज लक्ष आहे तसे लक्ष स्त्रीशिक्षणसंस्थांकडे नाही, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. स्त्रीशिक्षणसंस्थांतील एखाद्या विद्यार्थिनीचा अथवा शिक्षकिणीचा विवाह झाला म्हणजे मात्र त्या संस्थेवर अनेक ठिकाणांहून कुत्सित टीका केली जाते.

खरे पाहिले असता महाराष्ट्रात काम करीत असलेल्या स्त्रीशिक्षणसंस्था कोणाही एका व्यक्तीच्या मालकी हक्काच्या नसून, त्या सार्वजनिक आहेत व त्या संस्थांवर लोकनियुक्त मॅनेजिंग कमिट्यांची देखरेख आहे. लोकांनी त्या संस्थांचे सभासद होऊन आपले प्रतिनिधी या मॅनेजिंग कमिट्यांवर नेमून पाठविले पाहिजेत. सध्या तसे होत नाही. मॅनेजिंग कमिटीत निवडून येणाऱ्या स्त्री-पुरुषांवर बहुजनसमाजाचा विश्वास असेल, तर त्यांना आपले काम अधिक चांगल्या तऱ्हेने करून दाखविता येईल.

स्त्रीशिक्षणसंस्थांनी शीलवान, देशाभिमानी व सुसंस्कृत मुली तयार कराव्या अशी लोकांची अपेक्षा असते. स्त्रीशिक्षणसंस्थेत अभ्यास करणाऱ्यांनी आपल्या शिरावर किती मोठी जबाबदारी आहे हे नेहमी लक्षात ठेविले पाहिजे. हिंदुस्थानात पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या शीलाकडे लोकांचे लक्ष अधिक असते, म्हणून कॉलेजातील व हायस्कूलांतील मुलींनी आपले वर्तन शाळा व कॉलेजातील मुलांप्रमाणे न ठेविता आपली वागणूक शालीनतेची व अधिक नम्रपणाची ठेविली पाहिजे.

आपला पोशाख, आपले वागणे, हे कोणत्याही प्रकारे सदोष आढळून येणार नाही, असे सभ्यपणाचे ठेविले पाहिजे. आपणांस शिकविणारे शिक्षक मग ते विवाहित असोत अगर अविवाहित असोत त्यांच्याजवळ आपला संबंध अगदी

कामापुरता ठेविला पाहिजे, कारण या बाबतीत थोडी जरी सलगी अधिक दिसली, तर विद्यार्थिनीवर्ग व बाहेरील जनता यांच्यामध्ये अनेक गैरसमज पसरू लागतात.

संस्थेसंबंधी काम करीत असता, असा प्रश्न विचारण्यात येतो की, संस्थेत स्त्री-पुरुष शिक्षकांची संख्या किती आहे! स्त्रियाच शिक्षक का नेमीत नाही? माझ्या दृष्टीने सध्या बी.ए.,एम.ए. झालेल्या स्त्रिया फार कमी आहेत व त्यांपैकी ज्यांना नोकरी करावयाची इच्छा आहे, त्यांचा उपयोग पगार अधिक मिळत असल्यामुळे सरकारी संस्थांनाच अधिक होत असतो. खाऊनपिऊन सुखी असणाऱ्या सुशिक्षित स्त्रियांचे लक्ष सार्वजनिक संस्थेत कमी पगारावर काम करण्याकडे अजून जितके लागावे तितके लागत नाही. अशा अनेक अडचणींमुळे सध्या पुरुष-शिक्षक व प्रोफेसर्स नेमून शिक्षणाची सोय करावी लागते. पुरुष शिक्षकांकडून स्त्रीशिक्षणाचे काम नीटपणे व्हावे म्हणून त्यांच्या नोकरीला थोडाफार कायमपणा द्यावा लागतो व अशा रितीने १०-११ वर्षे त्यांनी कामे केल्यावर लायक स्त्रीशिक्षक मिळाल्याबरोबर त्यांना एकदम काढून टाकणे कठीण असते.

पुरुषांनी स्त्रीशिक्षणसंस्थेत काम करावे ही गोष्ट लोकांना अजून जितकी पसंत असावयास पाहिजे तितकी पसंत आहे, असे वाटत नाही. अशा स्थितीत पुरुष-शिक्षकांनी व पुरुष अधिकारीवर्गाने स्त्रीशिक्षणसंस्था चालविताना फार काळजी घेतली पाहिजे. या बाबतीत कशी वागणूक ठेवावी याचे प्रो. कर्वे यांनी उत्तम उदाहरण घालून दिले आहे. हे उदाहरण आमचे सर्व बंधू लक्षात ठेवतील अशी आशा आहे.

स्त्रीशिक्षणसंस्थेत काम करणाऱ्या स्त्रीशिक्षकांच्यावर पुरुषशिक्षकांच्यापेक्षा अधिक जबाबदारी येऊन पडते. मुली पुरुषशिक्षकांपेक्षा स्त्रीशिक्षकांचे अधिक अनुकरण करितात, म्हणून विशेषत: स्त्रीशिक्षकांनी आपली वागणूक आदर्शवत ठेवून संस्थेत सर्व कामे शिस्तीने चालतील, अशी काळजी घ्यावी.

✿ ✿

# अबलोन्नतीची भावी दिशा

हिंदुस्थानातील स्त्रियांची अनेकदृष्ट्या वाईट स्थिती आहे व ती सुधारावी म्हणून सुधारकांचे सारखे प्रयत्न चालले आहेत. युरोपातदेखील अबला-दास्यविमोचनाची चळवळ गेल्या दोन-तीन शतके सारखी चालू आहे. युरोपातील स्त्रियांनी आर्थिक स्वातंत्र्य मिळविले आहे; पण त्यामुळे त्यांचे दास्यविमोचन जे व्हावयाचे, ते झाले नाही. स्त्रीदास्यविमोचन म्हणजे पुरुषांपासून स्त्रियांनी अगदी स्वतंत्र व स्वावलंबी होणे, असा अर्थ करावयाचा असल्यास हे दास्यविमोचन निसर्गत: अशक्य व सामाजिकदृष्ट्या अनिष्ट व अव्यवहार्य आहे.

आज हिंदुस्थानातील स्त्रियांना कायदेशीरदृष्ट्या काही हक्क मिळावयाचे आहेत यांत शंका नाही; पण हे दु:खविमोचन पुरुषांशी सहकार्य करूनच अधिक लवकर घडवून आणता येणार आहे. पुरुषांच्या दास्यांतून मोकळे होण्याकरिता स्त्रियांनी नोकरीचे दास्य मात्र पत्करू नये. युरोपातील स्त्रियांची आर्थिक स्वातंत्र्यामुळे झालेली शोचनीय स्थिती पाहून, आमच्या देशातील भगिनींनी चांगला बोध घ्यावा व अबला दास्यविमोचनाच्या आपल्या कल्पनांची पुनर्घटना करावी अशी माझी त्यांना नम्र विनंती आहे. पुरुषांनी स्त्रियांवर अन्याय केले असतील, तर त्यांचे निराकरण चळवळ करून करावयास हरकत नाही. सुधारकांच्या प्रयत्नांनी सतीचा कायदा, पुनर्विवाहाचा कायदा, संमतिवयाचा कायदा, इत्यादी अनेक कायदे जे पास झाले आहेत ते या चळवळीचीच प्रत्यक्ष उदाहरणे आहेत. आणखीही कित्येक कायदे जे व्हावयाचे असतील ते अवश्य पास करून घेण्याचा प्रयत्न करावा; पण यापुढील अबला दास्यविमोचनाची चळवळ युरोपातील चळवळीचे अनुकरण म्हणून चालविण्यात येऊ नये. युरोपातील चळवळीमुळे स्त्री-पुरुषांत एक चढाओढ सुरू झाली असून, स्त्रियांनी पुरुषांच्या सर्व कर्तव्यक्षेत्रात प्रवेश करून आपली जी कर्तव्यक्षेत्रे गृह व कुटुंब त्यांपासून काही प्रसंगी स्वत:स पारखे करून घेतले आहे, अशी स्थिती

हिंदुस्थानात उत्पन्न होता उपयोगी नाही.

हिंदुस्थानात प्रत्येक स्त्रीने सामान्यत: उत्तम भगिनी, उत्तम माता व उत्तम पत्नी होण्याचे ध्येय आपणापुढे ठेविले पाहिजे व स्त्रियांना जे शिक्षण द्यावयाचे त्याचा हेतू वरील ध्येयाशी सुसंगत असावयास पाहिजे. युरोपांत स्त्री-पुरुषशिक्षणात प्रकृतिभेद व कर्तव्यक्षेत्रभेद यांमध्ये फरक करण्यात यावा, अशी चळवळ सुरू झाली आहे व तिकडील शिक्षण स्त्रियांना माता व गृहिणींची कर्तव्ये बजावण्यास * जितके उपयुक्त व्हावयास पाहिजे तितके होत नाही, असे तिकडील काही विद्वान सध्या म्हणू लागले आहेत. ज्या मुलींची लग्ने झाली आहेत व ज्या मुली आज तिकडे संसार करीत आहेत, त्यांची गृहव्यवस्था आपल्या इकडील मुलींनी अनुकरण करण्यासारखी आहे.

हिंदुस्थानातदेखील कर्तव्यभेदाच्या दृष्ट्या स्त्री-पुरुषशिक्षणात काहीच फरक न केल्यास इकडेही युरोपप्रमाणे स्त्रियांवर वाईट परिणाम झाल्यावाचून राहणार नाहीत. आजच असे वाईट परिणाम कित्येक ठिकाणी उच्च शिक्षण मिळविलेल्या स्त्रियांवर झालेले आढळून येऊ लागले आहेत. वेळीच सावधगिरी ठेवून आपण जपानचे अनुकरण स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत करण्याची सध्या वेळ प्राप्त झाली आहे.

हिंदुस्थानातील स्त्रिया सुमाता व सुगृहिणी व्हाव्यात म्हणून प्रो. कर्वे यांनी भारतवर्षीय महिला-विद्यापीठ स्थापन केले आहे. ही चळवळ अत्यंत योग्य वेळी सुरू झालेली आहे, असे म्हणावयास हरकत नाही. या चळवळीकडे सुशिक्षितांचे जितके लक्ष लागावे तितके लागत नाही; ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. गरीब आई-बापांना शिक्षणामुळे उत्पन्न झाली बेकारी डोळ्यांपुढे दिसत असता, ते आपल्या मुलींना अथवा बायकांना पुढे नोकऱ्या करिता येतील या मोहाने मुलांच्या कॉलेजात पाठवीत असतात. विवाहेच्छू मुलींना नोकऱ्या लावून दिल्यामुळे त्या मुलींची धड ना प्रपंच, ना परमार्थ, अशी स्थिती होते. स्त्रियांच्या विवाहित स्थितीपेक्षा त्यांची नोकरी ही त्यांची मोठी गुलामगिरी आहे. या पैशाच्या गुलामगिरीपेक्षा संसारातील प्रेमाची गुलामगिरी स्त्रियांनी अधिक पसंत करावयास हरकत नाही. स्त्रियांच्या बाबतीत सुमाता व सुगृहिणी होण्याच्या ध्येयापेक्षा आर्थिक स्वातंत्र्य मिळविणे हे कमी प्रतीचे ध्येय आहे. स्त्रियांनी घरगुती उद्योगधंदे (Cottage Industry) घरी राहून अवश्य करावेत. स्त्रियांचे विवाह झाले तरी त्यांनी नर्सिंग, डॉक्टरणी व शिक्षकिणीची कामे करावयास अडचण पडणार नाही. उलट ही कामे त्यांना अधिक उत्साहाने करिता येतील असे वाटते. खेड्यापाड्यांतील व मोठ्या शहरांतीलदेखील सामाजिक परिस्थिती इतकी बिकट असते की, सुशिक्षित स्त्रीची विवाहित स्थिती,

---

* यासंबंधी विशेष माहिती प्रो. कर्वे यांचे आत्मवृत्त (पान ४७४-४९४) यात दिली आहे. ही माहिती सर्व वाचकांनी अवश्य वाचावी.

अविवाहित स्थितीपेक्षा कमी त्रासाची व कमी दु:खाची आहे असे आढळून आल्यावाचून राहत नाही. सामाजिक निंदा, उपहास, मत्सर, इत्यादी अनेक गोष्टींपासून अविवाहित स्त्रियांना आपले रक्षण करून घ्यावयाचे असते, व त्याला सोपा उपाय म्हटला म्हणजे स्त्रियांनी विवाहित स्थिती पत्करणे हाच होय. स्त्रियांना अविवाहित राहून समाजातील कार्ये करावयाची असतील, तर त्यांना नातेवाइकांच्या आश्रयाला राहूनच बरीचशी कामे नीटपणे करिता येतात.

स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या चळवळीस कायमपणा येण्याकरिता पुढे अनेक प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. 'स्त्रियांचा अभ्यासक्रम पुरुषांच्या अभ्यासक्रमाहून भिन्न असावा' असे ठराव दरवर्षी अखिल भारतीय स्त्रीपरिषदेकडून पास होत आहेत; यावरून लोकमताचा कल कोणत्या चळवळीकडे आहे हे दिसून येत आहे. या दृष्टीने स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीला कायमपणा आणणे हेच प्रो. कर्वे यांचे चिरकालिक स्मारक होणार आहे. सर्व बंधू-भगिनी याकरिता प्रयत्नांची पराकाष्ठा करून हिंदुस्थानातील स्त्रीशिक्षणाला राष्ट्रीय वळण देण्याचा थोडा तरी प्रयत्न करतील, अशी आशा आहे.

✿ ✿

# परिशिष्टे

## परिशिष्ट १
## सामाजिक परिषदेत स्त्रीशिक्षणाच्या ठरावावरील पार्वतीबाई आठवले यांचे भाषण

प्रस्तुतचा ठराव पास झाला, असे कधी म्हणता येईल की, जेव्हा आम्ही जास्त कर्तव्यदक्ष बनू तेव्हा. कोणत्याही कामात व्रत किंवा नियम हा पाहिजे. ठरावाला होकार देताना त्याचा चित्तवृत्तीवर परिणाम न होईल, तर 'बोलणे फोल झाले, डोलणे वाया गेले' असे म्हणावे लागेल. स्त्रियांना खरे ज्ञान दिले पाहिजे. त्या सभेस येऊन पुरुषांजवळ बसू लागल्या म्हणजे सुधारणा होत नाही. मी बायकांतच बोलणार होते, पण काय करू? प्रसंग हा असा आला आहे! स्त्रिया तरी कशा? त्या नाटकाला जातील, पण सभेला यावयाच्या नाहीत. आम्ही विधवा संन्यास घेतो; परंतु गृहस्थांची घरे आमच्या संन्यासवृत्तीला कामी येत नाहीत. त्यांचे विलास दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत. आज या गृहस्थांच्या घरी नाही भजन, नाही पूजन. पूर्वी हे दोनदा जेवीत असत, तर आज दिवसातून चारदा जेवीत आहेत. चहा, कॉफी यांचे पेले दिवसभर धुता धुता आम्ही दमलो. आजच्या स्त्रीशिक्षणाचा पाहिजे तसा चांगला परिणाम होत नाही. स्त्रियांचा पोलके, बंड्या असा धेडगुजरी पोशाख बनला आहे. त्यांची फुग्यांची जाकिटे पाहिली म्हणजे गरती बायका कोणत्या व एरवीच्या कोणत्या ते ओळखता येत नाही. माझे बोलणे आपणाला कडू वाटेल, पण ज्याने संन्यास घेतला, त्याला कोणाची पर्वा नाही. सारांश, आम्हांस गृहस्थांच्या घरी ठेवणार तर वसिष्ठासारखे गुरू द्या.

आमच्यासाठी विधवागृहे तरी बांधा किंवा तुमची घरे पवित्र आश्रम करा. आजमितीला बी. ए.,एम.ए. झाल्यावर पुरुषांची लहान मुलींशी लग्ने होऊ लागली आहेत. साठ वर्षांचे म्हातारे लहान मुलींबरोबर लग्न करितात. तसेच पाळण्यातील लग्नांच्या चालीमुळे व अशाच कारणांनी आज विधवा पुष्कळ होऊ लागल्या आहेत. तर पुरुषांनी तरी चतुर्थाश्रम घेऊन आपल्या घरांचे आश्रम बनवावे किंवा आपद्धर्म म्हणून विधवांसाठी काही संस्था काढाव्या. आत्मसंयमन हा आमचा निवृत्तिधर्म होय, तर चांगल्या रितीने वागून प्रत्येक घर विधवांना योग्य होईल, असे करा व सद्‌विद्या देऊन त्यांची मानसिक उन्नती करा. जर अशी घरे होणार नाहीत,

तर विधवागृहे तरी द्या. प्रो. कर्वे यांची अशी एकच संस्था आहे. तिला मदत करा व तिचा उपयोग करून घ्या. त्या संस्थेसाठी सर्व विधवांच्या वतीने मी आपणापाशी भिक्षा मागत आहे.

*('केसरी, १० जानेवारी १९०५)*

✿ ✿

## परिशिष्ट २
## पत्रकर्त्याच्या स्फुट सूचना

यंदाच्या काँग्रेसप्रमाणे सामाजिक परिषदेचे सर्व कामही पूर्ण सुरळीतपणे पार पडणार होते, परंतु एका स्पष्टवक्त्या बाईच्या निर्भय उद्‍गारांनी सुधारक कंपूमध्ये बरीच दाणादाण उडवून दिली. श्रीमती पार्वतीबाई आठवले यांचे नाव आज महाराष्ट्रातील सर्व लोकांस ऐकून माहीत झालेले आहे. प्रो. कर्वे यांच्या अनाथ बालिकाश्रमाकरिता आपले सर्व जीवित खर्ची घालावयाचे, असा निश्चय या बाईंनी केला असून, याप्रमाणे त्या वरील आश्रमाच्या उत्कर्षाकरिता कायावाचामनेकरून झटत आहेत. मद्रासपर्यंत लांबचा प्रवास करून व ठिकठिकाणी व्याख्याने देऊन त्यांनी आश्रमाकरिता बराच पैसा गोळा केला आहे. अशा योग्यतेच्या स्त्रीला सामाजिक परिषदेतील एखाद्या ठरावावर बोलण्यास आव्हान झाले, ते ठीकच. या बाईंचे भाषण कोणत्या तऱ्हेचे होणार, हे जर परिषदेच्या पुरस्कर्त्यांस पूर्वीच कळले असते, तर त्यांना भाषण करण्याची सवलतही परिषदेत मिळती की नाही याची आम्हांस शंका आहे. शिवाय, परिषदेच्या पहिल्या बैठकीच्या दिवशी न्या. चंदावरकर यांनी जे जोराचे व लांबलचक भाषण केले, त्यांत पार्वतीबाईंच्या नावाचा त्यांनी धन्यवाद गाइला होता. अशा बाईंचे भाषण आपणास सर्वस्वी अनुकूलच होईल, असा सुधारकाग्रणींचा समज असेल, परंतु परिषदेत जी पांचपन्नास मिळमिळीत व पानचट भाषणे झाली, त्या तोडीचे यांचे भाषण न होता, निर्भीड व स्पष्टवक्तेपणाचा स्वीकार करून पार्वतीबाईंनी सुधारकांचे व सुधारलेल्या बायकांचे दोष उघड दाखवून जेव्हा परिषदेच्या बैठकीत 'बांब शेल' टाकला, तेव्हा सर्व सुधारकांच्या तोंडचे पाणीच पळाले. आपलेच दात आणि आपलेच ओठ. बाईंच्या नावाचा न्या. चंदावरकरांसारख्यांनी धन्यवाद गाइलेला व यांना आग्रहाने भाषण करण्यास विनंती केलेली. बाईंचे भाषण तर असे झणझणीत झाले. भरसभेत तर त्यांचे भाषण बंद करण्याची कोणाची छाती नाही. तेव्हा मोठ्या कष्टाने अर्धापाऊण तास या बाईंच्या

तीव्र वाक्प्रहारांच्या वेदना सुधारकचमूस सोसाव्या लागल्या. परंतु आता या बाईंविरुद्ध सुधारक मंडळीने मोठे काहूर माजविले आहे, असे समजते. मुंबईतील नटव्या बायकांच्या पोलक्यांवर व उलट्या केसांवर जो बाईंनी भडिमार केला, त्याने तर पोशाखी सुधारकांच्या तळव्याची आग मस्तकाला गेली. सुधारणा ही इंग्रजी पेहरावात किंवा इंग्रजी थाटात नाही, तर ती कृतीमध्ये आहे व अभागी विधवा स्त्रियांनी होता होईल, तो संन्यासवृत्ती स्वीकारूनच आपल्या जीविताचे सार्थक करावे, असा जो श्रीमती पार्वतीबाईंनी आपल्या भगिनींस उपदेश केला, तो जरी काही सुधारकांस पसंत पडला नाही, तरी सर्व समंजस आणि विचारी गृहस्थांना त्यातील सत्य व रहस्य 'यावच्चंद्रदिवाकरौ' मान्य झालेच पाहिजे. आपले भाषण श्रोतृसमाजास कदाचित कडू लागेल, असे त्या वेळेसच बाईंनी सांगून ठेवले होते. ते त्याप्रमाणे कागदी सुधारकांना कडू लागले आहे आणि त्यांनी निरर्थक या निस्पृही बाईंविरुद्ध काहूर उठविले आहे. परंतु या कृतीने बाईंचे काही नुकसान न होता सुधारकांचे उलट जगात हसे होईल, अशी आमची पक्की खात्री आहे.

*('केसरी, १७ जानेवारी १९०५)*

✿ ✿

## परिशिष्ट ३
## पार्वतीबाईंची चिकाटी आणि प्रसंगावधान

२५ वर्षांचे वय होईपर्यंत यांची *(पार्वतीबाईंची)* पाटी-पुस्तकाशी गाठ नव्हती. त्यांनी अतिशय कष्टाने अभ्यास करून ट्रेनिंग कॉलेजचे पहिल्या प्रतीचे म्हणजे पंचवीस रुपयांचे सर्टिफिकेट मिळवले. त्यांना सरकारची स्कॉलरशिप होती व ३ वर्षे सरकारची नोकरी करणे भाग होते; परंतु आमच्या अर्जावरून सरकारने विशेष ठराव करून पार्वतीबाईंना आश्रमात काम करण्याला परवानगी दिली.

पार्वतीबाई आश्रमात आल्याबरोबर त्या आश्रमाच्या लेडी सुपरिंटेंडेंट झाल्या. त्यांच्यासंबंधाने ईश्वरी योजना काही निराळीच होती. लेडी सुपरिंटेंडेंटच्या कामाला अधिक योग्य स्त्रिया पुढे मिळाल्या. नंतर आश्रमासाठी वर्गणी मिळवण्याचे काम आपल्याला साधते की काय, ते पाहण्याचा त्यांनी प्रयत्न केला व त्यात त्यांना कल्पनेबाहेर यश आले. स्वभावत:च पार्वतीबाई धीट व चिकाटीने काम करणाऱ्या आहेत. अभ्यासाने त्यांना सभांत चांगली भाषणे करता येऊ लागली व त्यांच्या कळकळीचा लोकांच्या मनावर चांगला परिणाम होऊ लागला. सरासरीने वर्षाची

सुमारे तीन हजार वर्गणी त्या जमवतात. मराठी भाषा जाणणाऱ्या लोकांच्यातच त्या हिंडतात, असे नाही, तर कानडी मुलूख, तेलंगण, गुजरात व संयुक्त प्रांत यामध्येही त्यांनी अनेक अडचणी सोसून काम केले आहे. द्रव्यबळाच्या दृष्टीने पार्वतीबाई या आज अनेक वर्षे आश्रमाचा आधारस्तंभ आहेत.

पार्वतीबाईंच्या अंगी धीटपणा व समयसूचकता हे गुण विशेष आहेत. एकदा सातारा येथे सभेत त्यांचे व माझे अशी एका सामाजिक विषयावर भाषणे झाली. पुढे अध्यक्षांनी आपल्या विरुद्ध भाषणाने श्रोत्यांच्या मनावर विपरीत परिणाम केला. मी स्वस्थ बसलो, परंतु पार्वतीबाई धैर्याने पुढे आल्या व अध्यक्षांच्या परवानगीने भाषण करून अध्यक्षांचे म्हणणे खोडून काढून त्यांनी पुन्हा लोकमताचा प्रवाह आपल्या बाजूला वळवला. एकदा बनारसच्या कॉन्फरन्सच्या वेळी काशीबाई, पार्वतीबाई व मी असे तिघे बनारस येथे गेलो होतो. त्या वेळी सर्व लोक गडबडीत असल्यामुळे आश्रमासंबंधाने कोणाजवळ बोलणे काढण्याला आम्हांला धीर होईना. परंतु अगदी काही केल्यावाचून परत जावे लागते, हे पार्वतीबाईच्याने पाहवेना. त्यांनी अखेरीला बंगाली गृहस्थांच्या क्यांपमध्ये जाऊन मोडक्यातोडक्या हिंदुस्थानी भाषेत आपले विचार कित्येक मंडळींना कळवले व भोजनोत्तर अर्धा तास आश्रमाची हकिकत ऐकून घेण्याचे त्यांनी कबूल केले. नंतर पार्वतीबाईंनी काशीबाईंना ही हकिकत कळवून त्याजकडून इंग्रजीत आश्रमाची माहिती सांगितली व धडपड करून त्या मंडळीतून ४० रुपये वर्गणी जमवली.

पार्वतीबाई या जबर उद्योगी आहेत. त्यांची चिकाटीही वर्णनीय आहे. त्यांना इंग्रजी येत नाही यामुळे वर्गणीच्या कामी त्यांना फार अडचण येते.

*('आत्मवृत्त', धोंडो केशव कर्वे, दुसरी आवृत्ती १९२८, प्रकरण ४०, 'अनाथ बालिकाश्रमाला स्वार्थत्यागी सुशिक्षित स्त्रियांची जोड', पृ. क्र. २५५ ते २५८)*

✿ ✿

# परिशिष्ट ४
# पार्वतीबाईंमुळे वादळ

श्रीमती पार्वतीबाई आठवले यांनी १९०४ साली आश्रमासाठी वर्गण्या मिळविण्याच्या कामाला आरंभ केला. त्याच वर्षाच्या अखेरीला राष्ट्रीय सभा व राष्ट्रीय सामाजिक परिषद यांच्या बैठकी मुंबईला झाल्या. तेव्हा त्यांनी सामाजिक परिषदेत बोलण्याचे धाडस केले. त्या भाषणात त्यांच्या अंगचे धैर्य, समयसूचकता, वक्तृत्व वगैरे गुण

निदर्शनाला आले; परंतु कोते विचार व अदूरदर्शीपणा यांच्या प्राबल्यामुळे आपण काय बोलतो, याचे भान त्यांना राहिले नाही. त्यांनी सुधारकांवर आणि विशेषत: मुंबईतील स्त्रीवर्गावर शस्त्र उचलले. त्यांचे आचारविचार आणि पोशाखांच्या तऱ्हा वगैरे संबंधाने खरमरीत टीका केली. पार्वतीबाईंच्या आयुष्याची २५ वर्षे खेडेगावात गेलेली होती व पुढील सातआठ वर्षे पुण्यात परंतु शाळेच्या कोपऱ्यात गेलेली. अशा बाईला सुधारक वर्ग आणि मुंबईतील पुढे गेलेला स्त्रीवर्ग यांचे वागणे अत्याचाराचे वाटावे, यात नवल नव्हते; पण त्यांनी आपली योग्यता व वेळ-अवेळ न पाहता अशा रितीने अनेक लोकांची मने दुखवली. सापाच्या शेपटीवर पाय पडला म्हणजे त्याची जी अवस्था होते, ती पार्वतीबाईंच्या भाषणाने कित्येकांची झाली. त्या वेळी हजर असलेले लोक तो प्रसंग कधी विसरणार नाहीत. वर्तमानपत्रांतून त्याजवर गहजब होऊ लागला व अशा बाईला आश्रमातून काढून टाकावे, अशा उघड सूचना होऊ लागल्या. खाजगी पत्रांचा तर मजवर भडिमारच झाला. हे वादळ कसे शांत होते, याची मला मोठी काळजी पडली. पार्वतीबाईंचा अविचार नाहीसा होऊन कार्य करून त्या सुधारणेच्या कार्याचा एक आधारस्तंभ होऊन राहतील, अशी मला आशा होती. ती बऱ्याच अंशी सफल झाली आहे व आणखी सफल होण्याची चिन्हे दिसत आहेत. पण सर्व गोष्टी हळूहळू क्रमाने व्हावा लागतात. उतावळेपणाने कार्य बिघडण्याचा संभव असतो. हळूहळू सर्व स्थिरस्थावर झाले; परंतु पुष्कळांचा बरीच वर्षे पार्वतीबाईंवर कटाक्ष होता.

*('आत्मवृत्त' : धोंडो केशव कर्वे, दुसरी आवृत्ती, १९२८, प्रकरण ४६, 'आश्रमावरील काही कठीण प्रसंग', पृ. क्र. ३०१-३०२.)*

✿ ✿

## परिशिष्ट ५
## पार्वतीबाईंची धडाडी

ज्यांच्या मदतीवाचून आश्रमाचा एक पाय लंगडा झाला असता, त्या पार्वतीबाईंच्या धाडसासंबंधाची हकीकत दिल्यावाचून हे आश्रमवृत्त पुरे होऊ शकणार नाही... आश्रमाच्या १९२० च्या रिपोर्टात पुढील उल्लेख मीच केला आहे."पार्वतीबाईंची इहलोकीची यात्रा बरीच सफल झाली होती. प्रौढ वयात शिकावयास आरंभ करूनही त्यांनी शिक्षकाचे तिसऱ्या वर्षातील पहिल्या प्रतीचे सर्टिफिकेट मिळवलेच होते. त्यांच्या एका तपाच्या निरपेक्ष सेवेने एका मोठ्या उपयोगी संस्थेच्या-अनाथ बालिकाश्रमाच्या

उन्नतीला बरीच मदत झाली. त्यांचा एकुलता एक मुलगा एम. ए. होऊन त्यांच्याच प्रोत्साहनाने आश्रमाचा आजन्म सेवक झाला होता व त्याची नुकतीच युनिव्हर्सिटीच्या कॉलेजच्या प्रिन्सिपॉलच्या जागी नेमणूक झाली होती. आपल्या चलाख लहानग्या नातवाचे लाड पुरवण्याचेही सुदैव त्यांना लाभले होते. तेव्हा आपण समाजाच्या व कुटुंबाच्या ऋणातून मुक्त झालो, असे त्यास वाटू लागले व अशा स्थितीत मृगजळाप्रमाणे दूरदूर सरणाऱ्या आशेच्या नादी लागून आपल्या जिवाला मुकावे लागले, तरी हरकत नाही, अशी त्यांच्या मनाची तयारी झाली होती. आपण अंधारात उडी घेत आहोत, आपले वय ४६ वर्षाचे आहे, चरितार्थासाठी आपणास अगदीच अपरिचित अशा परक्या देशात काम करावे लागणार, भाषेच्या अभावी मुक्यासारखी आपली स्थिती होणार व कसलाही प्रसंग ओढवला, तरी त्यातून सुटण्याला आपणाजवळ द्रव्यबळ नाही, या सर्व गोष्टींची पूर्ण जाणीव असतानाही आश्रमाच्या एका पैशालाही न शिवता जे कार्य होईल ते करावयाचे, असा निश्चय करून, त्यांनी आपणाला संकटाच्या दरीत लोटून दिले. ज्या संकटांना तोंड देण्यास मी स्वत: तयार झालो नसतो, त्यात त्यांना लोटण्यास बऱ्याच अंशानी मी कारण झालो. क्रमाक्रमाने त्यांच्या मनाची तयारी माझ्या प्रोत्साहनाने झाली व असे करणे निर्दयपणाचे होते, हे मला कबूल केले पाहिजे. माझ्या अपराधाची तीव्रता कमी करणारी काय ती एकच गोष्ट आहे. ती ही की, पार्वतीबाईंमध्ये काही विशेष गुण आहेत, अशी माझी कल्पना आहे आणि विशेष प्रसंगावाचून त्या गुणांच्या उत्कर्षाला वाव मिळत नाही. तेव्हा तिकडे जाण्यासाठी त्यांना भर देण्यात त्यांच्या अंगच्या विशेष सामर्थ्याच्या विकासाला क्षेत्र सापडावे, हा एक हेतू होता. तथापि त्यांच्या मार्गातल्या अडचणींमुळे त्यांना कदाचित जिवालाही मुकावे लागेल, हे मला स्पष्ट दिसत होते. मजकडून होणाऱ्या मदतीसंबंधाने मात्र मी त्याजमध्ये भलतीच आशा उत्पन्न केली नाही. अमेरिकेत जाणे व तिकडून परत येणे याबद्दलचा प्रवासखर्च व त्याहून अधिक फारच थोडी द्रव्याची मदत देण्याचे मी कबूल केले... पार्वतीबाईंनी ऑगस्ट १९१८त जपानच्या मार्गाने अमेरिकेत जाणाऱ्या बोटीत पाय ठेवला व ता. ५ ऑक्टोबर रोजी त्या अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरल्या.

तेथे पार्वतीबाई उघड्या डोळ्यांनी तर्कित व अतर्कित संकटांना तोंड देण्याला पुढे सरसावत होत्या व त्यांच्या भाराखाली दडपून जाण्याचीही वेळ आली होती. पहिले वर्ष सव्वावर्ष त्यांना शरीराच्या अस्वास्थ्यात, पैशाच्या टंचाईत व काळजीत काढावे लागले. त्यानंतर त्यांची परिस्थिती सह्य होऊ लागली व अलीकडे त्यांची स्थिती बरीच समाधानकारक आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. दिवसातून काही वेळ त्यांना उपयुक्त कामी लावता येतो. ओ'रायली या उपनावाच्या मायलेकींच्या लहान कुटुंबात त्यांना आश्रय मिळाला आहे. त्या कुटुंबात त्यांची सुखाने राहण्याची सोय झाली आहे. तरी उपजीविकेसाठी त्यांना अजूनही काम करावे लागतेच. कुमारी


171257

ओ'रायली या पन्नाशीच्या असून कामगार वर्गाच्या हितासाठी झटणाऱ्या आहेत. गेल्या वर्षी सगळ्या जगाची कामगार परिषद वॉशिंग्टन येथे भरली. त्या परिषदेस त्यांनी पार्वतीबाईंना आपल्या खर्चाने नेले होते व तेथील बऱ्याच संस्था त्यांनी त्यांना दाखवल्या. पार्वतीबाईंनी आपला फुरसतीचा काही वेळ तिथल्या हिंदी व अमेरिकन स्त्री-पुरुषांना भेटून आश्रमाला काही मदत करण्यासाठी त्यांची मने वळवण्यात घालवला. अशा रीतीने त्यांनी आश्रमासाठी चारशे डॉलर वर्गणी जमवली. परत येते वेळी प्रवास खर्चात उपयोगी पडावी म्हणून सदर रक्कम मी तेथे त्याजवळच ठेविली आहे व तिची त्यावेळची किंमत १४०० रुपये आश्रमाकडे जमा केली आहे. हे १४०० रुपये व पुढे आणखी जमवल्यास ते सर्व अमेरिकन स्कॉलरशिपफंड म्हणून आश्रमात कायमचे शिल्लक राहावेत व त्याच्या व्याजाचा उपयोग गरीब विधवांच्या शिक्षणासाठी व्हावा, अशी माझी इच्छा आहे. हे एक पार्वतीबाईंच्या धाडसाचे व अमेरिकन औदार्याचे स्मारकच होऊन राहील... ओ'रायली मायलेकी व पार्वतीबाईंना अनेक प्रकारे मदत करणारे हिंदी व अमेरिकन लोक यांचे मी या ठिकाणी संस्थेचे व स्वत:चे तर्फे मन:पूर्वक आभार मानतो. या प्रकरणाचा शेवट एका वेळी वाटत होता तेवढा हृदयभंजक होणार नाही, अशी आशा वाटते. सुरक्षितपणे हिंदुस्थानात परत येण्याचे नशिबी असल्यास पार्वतीबाई ही मनोवेधक हकिकत लिहून सर्वांना सादर करतील, यात शंका नाही. पण काळाच्या उदरात काय आहे कोणी सांगावे?"

पार्वतीबाईंचे बाकी राहिलेले दिवस अमेरिकेत विशेष कष्टावाचून गेले. परत येताना लंडन, पॅरिस वगैरे शहरे पाहण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांनी एकंदर सुमारे चार हजार रुपये वर्गणी जमवली व २ वर्षांपूर्वी आणखी दीड हजार रुपये त्यांनी पूर्वी मिळवलेल्या वर्गणीदारांनी पाठवून दिले. ही सर्व रक्कम अमेरिकन स्कॉलरशिप फंड म्हणून आश्रमाच्या कायमच्या शिलकीत जमा आहे. पार्वतीबाईंचा इंग्रजी भाषा शिकण्याचा हेतू सफल झाला नाही. त्या परत आल्या, त्या वेळचे त्यांचे मोडकेतोडके इंग्लिश होते, तेही नाहीसे झाले आहे. तथापि पाश्चात्त्य लोकांच्या सहवासाचा त्यांच्या विचारांवर परिणाम झालेला आहे. परत आल्यावर पार्वतीबाईंनी पुन्हा आश्रमाची वर्गणी जमवण्याचे काम सुरू केले. पार्वतीबाईंचे चरित्र म्हणजे एक कादंबरीच आहे. हे चरित्र लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

*('आत्मवृत्त' : धोंडो केशव कर्वे, दुसरी आवृत्ती १९२८, उत्तरार्ध, प्रकरण २, 'अनाथ बालिकाश्राचे गेले एक तप', पृ. क्र. ४६५ ते ४६८.)*

✿ ✿

प्रिय वाचक,

आमचे हे पुस्तक आपल्याला कसे वाटले, किती आवडले, आवडले नसल्यास का आवडले नाही, हे जाणून घेण्याची आम्हांला उत्सुकता आहे. तरी या पुस्तकासंबंधी आपला अभिप्राय थोडक्यात कळवावा, ही विनंती.

'राजहंस' प्रकाशन

पुस्तकाचे नाव : ______________________

वाचकाचे नाव : ______________________

पत्ता : ______________________

दूरभाष/चलभाष : ______________________

ई-मेल पत्ता : ______________________

संपादक
राजहंस प्रकाशन

आपला वाचक

स्वाक्षरी

सामान्यातल्या असामान्य 'स्त्री'चं हे आत्मकथन !

पार्वतीबाई आठवले!
१८७० मध्ये जन्मलेली,
कोकणच्या खेड्यात लहानाची मोठी झालेली एक निरक्षर स्त्री...
वैधव्यानंतर केशवपन, परावलंबन हे दैवाचे भोग मानून जगणारी!
पण मुलाच्या काळजीनं पुण्यात बहीण बाया कर्वे यांच्याकडे
म्हणजेच मेहुणे धोंडो केशव कर्वे यांच्या घरी आली
आणि तिचं सारं जगच बदललं.
या सामान्य स्त्रीतले असामान्य गुण प्रकटले.
कर्वे यांचा 'अनाथ बालिकाश्रम' हे तिचं जीवनकार्य झालं.
या संस्थेला मदत मिळवण्यासाठी अनेक हालअपेष्टा सोसत
ती भारतभर फिरली, इंग्लंड-अमेरिकेतही जाऊन आली.
तिनं केलेलं हे आत्मकथन.

# माझी कहाणी

राजहंस प्रकाशन

Mazee Kahanee ₹ 100
9 788174 346018
Rajhans Prakashan Pvt. Ltd.

